यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

२५ नोव्हेंबर २०१६



३२ व्या
पुण्यस्मरणानिमित्त
विनम्र अभिवादन

सुवर्णगाथा ५०
कायदेमंडळातील पाच दशके

मा. खा. शरदचंद्रजी पवार
यांच्या विधीमंडळ व संसदीय कारकिर्दीची अविरत पन्नास वर्षे (१९६७-२०१७)

विशेष उपक्रम - राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धा व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१५

## पद्मविभूषण मा. डॉ. विजय केळकर यांना प्रदान





















# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम. एम. एच. /बी. ओ. एम. - ५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९६, २२८५२०८१, २२०४५६० फॅक्स : २२८५२०८१/८२


## विश्वस्त मंडळ सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| १०. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| ११. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. श्री. डॉ. समीर दलवाई | |
| १४. | मा. श्री. ना. धों. महानोर | |
| १५. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |

### महाराष्ट्र शासन प्रतिनिधी

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

१७. मा. श्री. एन. जे. जमादार
सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार

## कार्यकारिणी मंडळ सदस्य

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. गणपतराव अप्पासाहेब पाटील
१७. मा. श्री. राजेश टोपे
१८. मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
२०. मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
२१. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

### महाराष्ट्र शासन प्रतिनिधी

२२. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

## कार्यकारी समिती

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. अजित निंबाळकर | विश्वस्त सदस्य |
| ७. | मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. | मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |

## विभागीय केंद्र

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, कोकण, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | |
| विभागीय केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख-पाटील |
| विभागीय केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. गो. मा. पवार |
| विभागीय केंद्र, अंबाजोगाई | अध्यक्ष | डॉ. द्वारकानाथ लोहिया |
| विभागीय केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |

## विविध विभाग

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | सहसंयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |

## मध्यवर्ती कार्यालय

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन रंगस्वर | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर श्री. सुशील गुप्तन |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | आस्थापना व्यवस्थापक | श्री. संजय बनसोडे |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परीक्षक | | मे. सी. व्ही. के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | | चार्टर्ड अकाउंटंट |

## संपादकीय

आपल्या आजूबाजूला अनेकविध सामाजिक, आर्थिक, घडामोडी मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. या गतिमान आणि प्रसंगी गोंधळाच्या परिस्थितीत प्रतिष्ठानच्या वार्तापत्राचा हा अंक आम्ही आपल्या हाती देत आहोत. समकालीन परिस्थितीची नोंद करण्या इतपतच या बाबींचा उल्लेख करून संस्थेच्या नियमित कार्याबद्दल आणि त्याच्या विस्ताराबद्दल अधिक बोलूयात.

२०१५-२०१६ या वर्षात महाराष्ट्राने - विशेषत: मराठवाड्याने - भीषण दुष्काळी परिस्थितीला तोंड दिले. या परिस्थितीचा सामना करताना समाजातील विविध घटकांनी आपआपले योगदान दिले. प्रतिष्ठानने देखील या कार्यात यथाशक्ती सहभाग घेतला. मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यात विविध छोट्या-मोठ्या उपक्रमांद्वारे या संकटात सापडलेल्या माणसांना मदत व आधार देण्याचे कार्य केले. त्याविषयी संक्षिप्त स्वरूपात अंकात अहवाल दिला आहे. मात्र पावसाळा संपत असताना झालेल्या जोरदार वृष्टीमुळे पुढील वर्षासाठी सूखद दिलासा मिळाला आहे. तरीही इतर अनेक कारणांमुळे बळीराजाचे आयुष्य अनेक अडीअडचणीतून जात आहे. त्यावर उपाय शोधण्याची व अमलात आणण्याचे नितांत गरज आहे. तसे झाले तरच नवी पिढी शेती क्षेत्रात नव्या उमेदीने येऊ शकेल.

समाजातील दिव्यांग (अपंग) व्यक्तींसाठी प्रतिष्ठान गेली दशकभर अनेक उपक्रम राबवित आहे. कर्णबधिर मुले-मुली व गरजू ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी अमेरिकेच्या स्टारकी फाऊंडेशनच्या मदतीने दर्जेदार श्रवणयंत्रे विनामूल्य प्रतिष्ठानच्या वतीने वितरीत करण्यात येत आहे. आजवर सुमारे पाच हजार व्यक्तींना अशी श्रवणयंत्रे दिली गेली आहेत. याशिवाय अंध बंधु-भगिनींसाठी 'ऑडिओ बुक्स' (बोलकी पुस्तके) नॅब संस्थेच्या सहकार्याने उपलब्ध करून देण्यातही प्रतिष्ठानने पुढाकार घेतला आहे. त्याबरोबरच ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध ठिकाणी आनंद मेळाव्यांचे आयोजन व त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्याची परंपरा प्रतिष्ठानने याही वर्षी जपली आहे.

वाहतूक सुरक्षा, तंबाखू मुक्ती हेही आमच्या काळजीचे विषय आहेत. त्याबाबत सहकारी संस्थांच्या मदतीने आमचे कार्य सुरू आहे. वाहतूक सुरक्षेबाबत केंद्र सरकारने

पुढाकार घेऊन काही उपाय राबविण्याचा प्रयत्न चालविला आहे, ही समाधानाची बाब आहे. तंबाखू मुक्तीसाठी अशीच प्रभावी व खंबीर पावले उचलण्याची गरज आहे.

प्रतिष्ठानने हाती घेतलेल्या इतर अनेक विषयांत कार्य सुरू असतानाच एक नवीन उपक्रम राबविण्याचा संकल्प आपल्या समोर ठेवत आहोत. प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदरणीय पवार साहेबांच्या कायदे मंडळातील कारकिर्दीला येत्या २२ फेब्रुवारी २०१७ रोजी पाच दशकांचा कालावधी पूर्ण होत आहे. अवितरतपणे सतत ५० वर्षे कायदे मंडळातील राज्य व देश स्तरावरील चारही (विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा) सभागृहात पवार साहेबांचे योगदान अमूल्य आहेत. त्यांच्या या कार्यकर्तृत्वाचा संक्षिप्तपणे आढावा घेणारे छोटेखानी पुस्तक, **'पर्व–प्रगतीचे, परिवर्तनाचे'** या शीर्षकाने मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू अशा चारही भाषांमध्ये प्रकाशित केले आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना डोळ्यासमोर ठेऊन हे लिखाण केले आहे. कमीतकमी शब्दात पवार साहेबांची महत्त्वाची धोरणे व निर्णय नव्या पिढी पर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. ही पुस्तिका व पवार साहेबांबद्दलचे इतर साहित्य यावर आधारित राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धा व राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे. **'सुवर्णगाथा ५०' – कायदेमंडळातील पाच दशके** या नावाने आपण हा उपक्रम राबवित आहोत. आपणा सर्वांच्या सहकार्याने व सहभागाने हा संकल्प यशस्वीरित्या पूर्णत्वास जाईल अशी खात्री आहे. या उपक्रमाचे सविस्तर माहितीपत्रक अंकात समाविष्ट केले आहे. याशिवाय लवकरच आदरणीय पवार साहेबांच्या विधान मंडळातील भाषणांचा संपादित ग्रंथ दोन खंडांत प्रकाशित करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

स्व. यशवंतराव साहेबांचे बत्तीसावे पुण्यस्मरण करत असताना राज्य आणि देशातील प्रगतीशील आणि परिवर्तनशील शक्तींना बळ लाभो, हीच आशा आणि अपेक्षा.

सुप्रिया सुळे

**(सुप्रिया सुळे)**
मानद संपादक

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३२व्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन

वर्ष : २० वे / अंक ३८ वा / प्रकाशन : २५ नोव्हेंबर २०१६

सल्लागार

**मा. शरद काळे**

**मा. हेमंत टकले**

मानद संपादक

**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक

**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक

**सुरेश पाटील**

**अनिल पाझारे**

विशेष सहाय्य

**पद्मभूषण देशपांडे**

सहाय्य

**मनिषा खिल्लारे**

**मीनल सावंत**

**प्रज्ञा सागडे**

**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**

विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, सुहास बाभल, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतिश लाड यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार


## अनुक्रमणिका


» आजवरच्या वाटचालीमागील माझी भूमिका ............ ६

» 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१६' - मानपत्र श्री. प्रतापशेठ साळुंखे ............ ९

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

» नवमहाराष्ट्र युवा अभियान ............ ११

» अपंग हक्क विकास मंच ............ १७

» शिक्षण विकास मंच ............ १९

» सृजन ............ २२

» वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान ............ २३

» कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम ............ २४

» महाराष्ट्र महिला व्यासपीठ ............ २९

» यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ............ ३१

» माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ............ ३४

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

» विभागीय केंद्र, कराड ............ ३६

» कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे ...... ३८

» विभागीय केंद्र, नागपूर ............ ४१

» विभागीय केंद्र, कोकण, रत्नागिरी ............ ४७

» विभागीय केंद्र, औरंगाबाद ............ ५८

» विभागीय केंद्र, लातूर ............ ६५

» विभागीय केंद्र, अहमदनगर ............ ६८

» विभागीय केंद्र, सोलापूर ............ ७०

» विभागीय केंद्र, अंबाजोगाई ............ ७१

» विभागीय केंद्र, ठाणे ............ ७३

» दुष्काळनिवारण कार्यक्रम - मराठवाडा ............ ७५

» उमेद ............ ७६

» प्रतिष्ठानची प्रकाशने ............ ७९


हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# आजवरच्या वाटचालीमागील माझी भूमिका

– मा. यशवंतराव चव्हाण

देश, देशातील लोक, त्यांचे जीवन आणि त्यांच्या समोरची संकटे यांचा विचार विधायक दृष्टिकोण ठेऊन सर्वांनाच करावा लागेल. संकटे व्यक्तिगत असोत वा राष्ट्राच्या जीवनातील असोत, ती कसोटी घेण्यासाठीच येत राहतात. अशा वेळी विचाराने दृढ आणि कृतीने स्थिर राहूनच त्यातून निभावून जायचे असते, इतरांना न्यायचे असते. काँग्रेसपक्षावर याची जबाबदारी काहीशी अधिक. सुखावर लक्ष ठेवून किंवा सुखाच्या वेळीच फक्त एकत्र यायचे, एकत्र बसायचे आणि संकटाचे वेळी दोषदिग्दर्शनासाठी कुठे तरी बोट दाखवीत स्वत:ची जबाबदारी झटकायची, किंवा दिसेल तो रस्ता धरायचा, हे काही प्रशस्त नाही. या कातडीबचावू मार्गाचे समर्थन करावयाचे आणि इतरांनाही त्याची महती सांगायची, या क्रियेला, विचाराला किंवा प्रवृत्तीला विधायक कोण म्हणेल? देशात सध्या जी परिस्थिती निर्माण झाली आहे, तिचा खोलवर विचार करून उत्तरे शोधावी लागणार आहेत. एवढेच नव्हे, तर त्यांचा आपल्या कृतीशीही मेळ घालावा लागणार आहे.

गरिबी हा सामाजिक व आर्थिक रोग आहे आणि गरिबांच्या प्रयत्नांनीच तो निपटून काढला जाऊ शकतो, असा विश्वास ‘गरिबी हटाव’ घोषणेच्या मुळाशी आहे. गरिबी हटविण्याचा विश्वास आणि निर्धार गरिबांमध्ये निर्माण करणे, हेच या कार्यक्रमाचे मूळ सूत्र आहे. गरिबी हटविण्यासाठी राजकीयदृष्ट्या काही मांडणी करून कार्यक्रम तयार केला आणि तो समोर ठेवला, तर जनतेत चैतन्यशक्ती निर्माण करता येते हा यातील प्रमुख विचार आहे. या विचाराचे बीजारोपण त्या घोषणेने केले आहे, हे निश्चित. ही घोषणा आणि हा विचार, म्हणजे नव्या क्रांतीचे बीज आहे. हितसंबंधी मंडळी हे ओळखून आहेत. ही घोषणा ऐकायला ठीक आहे, पण त्यामुळे गरिबी हटली का? असा सवाल हा हितसंबंधी वर्ग कुत्सितपणाने करीत असतो. ’गरिबी हटाव’ घोषणा करून सारी फसवणूक चालली आहे, असेही हा वर्ग सांगत आहे. याचा सरळ अर्थ असा आहे, की गरिबी जाऊच शकत नाही, असेच या हितसंबंधी वर्गाला सुचवावयाचे आहे. पूर्वापार चालत आलेला विचार नव्या परिस्थितीत त्यांना आजही त्याज्य वाटत नाही. ’गरिबी हटाव’ घोषणेची हेटाळणी करण्यामागे, पूर्वापार चालत आलेली गरिबी कायम ठेवणे, किंबहुना ती वाढविणे हेच त्यांच्या विचारांचे सूत्र आहे. हितसंबंधीयांच्या मतलबी टीकेने भाळणाऱ्यांना हे समजून घ्यावे लागेल.

काँग्रेस पक्ष हा पुढील काळात ख-या अर्थाने गरिबांचा पक्ष झाला पाहिजे. या पक्षाचा नेता कोण आणि समाजाच्या कोणत्या स्तराचे तो प्रतिनिधित्व करीत आहे, हे पाहणे महत्त्वाचे आहे. ते सामर्थ्य काँग्रेस पक्षाच्या अंगी आहे का, हेही तपासून पाहावे लागेल. याचा स्पष्ट अर्थ असा, की ज्यांची गरिबी हटवायची, त्यांचे प्रतिनिधित्व करणारे नवे नेतृत्व त्याच वर्गातील नव्या पिढीमधून तयार केले पाहिजे. छोटा शेतकरी, शेतमजूर, दलित, हरिजन व कामगार यांचे नेतृत्व करणारे प्रतिनिधित्व काँग्रेस पक्षात जास्तींत जास्त वाढले पाहिजे. नव्हे, तसे ते वाढवावेच लागेल. कारण हे नवे नेतृत्वच देशात समाजवाद प्रस्थापित करील. छोटे शेतकरी, शेतमजूर, दलित वर्ग यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पक्षाच्या रचनेत बदल करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

एक काळ असा होता, की राजकारणात फक्त वकील, शिक्षक, आदी पांढरपेशा वर्गच सक्रिय भाग घेत असे. संपन्न शेतकऱ्यांसंबंधी बोलायचे, तर या वर्गाने पुरोगामी राजकारण कधी हिरीरीने केले, असे मला तरी वाटत नाही. संपन्न शेतकऱ्यांचा वर्ग ब्रिटिश काळात ब्रिटिशांबरोबरच राहिला. कालांतराने सधन शेतकऱ्यांमधील सरंजामदार वर्ग शिंगं मोडून राजकारणात शिरल्याचे आढळते, परंतु आजही हा वर्ग समाजवादाला पोषक कृती करण्यापासून काहीसा अलगपणा बाळगून आहे.

महाराष्ट्रातील लहान व मध्यम शेतकरी वर्गाचे विश्लेषण मात्र वेगळ्या पद्धतीने करावे लागेल. स्वातंत्र्य-लढ्यात तो आघाडीवर होता आणि आजपर्यंत तरी त्याने पुरोगामी विचारांची वाटचाल केली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र काँग्रेसलाच नव्हे, तर अखिल भारतीय काँग्रेस पक्षालाही संघटनेची बांधणी नव्याने करावी लागेल. ही नवी संघटना-वर्गसंघटना म्हटले, तरी चालेल. गरिबांच्या कार्यक्षेत्रातील कार्यकर्त्यांची असेल. अशी नवी संघटना बांधण्यासाठी जुन्या-नव्या काँग्रेस कार्यकर्त्यांनीच पुढाकार घेतला पाहिजे. शेतकरी, कामगार, व दलितांचे प्रश्न हाती घेऊन लढाऊ कार्यक्रमाच्या पायावर या वर्गाला संघटित करावे लागेल आणि ते सुद्धा जनशक्तीचा तेजोमय (dynamic) विचार नजरेसमोर ठेवून !

नवी पिढी म्हणजे आपण अद्ययावत तरुण पिढी म्हणतो. पण तसे कधी नसते. १९४२च्या स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीतलाही माझा हा अनुभव आहे. देशातली सर्वच्या सर्व नवी पिढी एखाद्या कामात स्वत:ला बांधून घेते, असे सहसा घडत नाही. महत्त्वाची आव्हाने येतात, त्यावेळी नवी पिढी कामासाठी पुढे सरसावते. तरुणांपुढे विधायक विचार, ध्येय, कार्यक्रम ठेवला, तर ते संघटितही होतात. मानवतावादी विचार त्यांच्या मनात रुजवला, तर तरुणवर्ग अन्यायाच्या विरुद्ध आणि दलितांच्या बाजूने उभा राहतो, असे आजही आढळते. आजच्या तरुणांच्या ठिकाणीही नैतिक मूल्यांची चांगली जाण आहे; हाच याचा अर्थ. नवी पिढी जागृत आणि प्रामाणिक आहे, तसेच ती राष्ट्रवादाचा विचार कमी महत्त्वाचा मानीत नाही. तरुण मनाला निराशेने ग्रासले आहे, असे म्हटले जाते. याचा मी जो अर्थ करतो, तो असा, की समाजवाद प्रस्थापित करणारा दुसरा पक्ष तयार होईल, की नाही, या शंकेने त्यांना ग्रासले आहे.

प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य वाढत आहे, हे तर खरेच; पण चिंतेची बाब ही, की हे प्रादेशिक पक्ष मूलत: प्रॉपर्टीवादी - खाजगी मालमत्तेचे पुरस्कर्ते - आणि जातीय परंपरा प्रशंसिणारे आहेत. अशा शक्ती आज समर्थपणे उभ्या राहात आहेत, हेही आढळून येते. उलटपक्षी, पुरोगामी व राष्ट्रीय दृष्टिकोण मांडणाऱ्या शक्ती मात्र वाढल्याचे दिसत नाहीत आणि तरुण मनाच्या निराशेचा गैरफायदा अशा प्रतिगामी शक्ती वाढविण्यासाठी केला जात आहे, असाच गेल्या निवडणुकीमध्ये पडताळा आला.

भारताचे आर्थिक, राजकीय, सामाजिक प्रश्न गुंतागुंतीचे आहेत, हे तर स्पष्टच आहे. लोकशाही समाजवादाची प्रक्रिया ही संथ गतीची व सावकाशीची आहे. याचा अर्थ आपल्याला थांबून चालणार नाही. समाजवादी समाजाच्या प्रस्थापनेसाठी लोकांमध्ये विश्वास निर्माण करावा लागेल आणि त्यासाठी अनुकूल अशा पक्षरचनेचाही विचार करावा लागेल. नेतृत्व समाजापासून दूर चालले आहे, याचा अर्थ असा, की लोकशिक्षणाची प्रवृत्ती कमी झाली आहे. नव्या पिढीतील गरीब वर्गातील तरुणांनी पुढे येऊन नेतृत्व ताब्यात घेतले पाहिजे, हाच यावर उपाय आहे, असे मला वाटते. ज्या समाजाचे चित्र आपल्याला

बदलावयाचे आहे; ज्यांची गरिबी नाहीशी करावयाची आहे, त्या वर्गातील तरुणांनीच कोणाच्याही निमंत्रणाची वाट न पाहता पुढे येऊन, नव्या विचारांची कास धरून कामाला जुंपून घेणे जरूर आहे.

पोटनिवडणुका किंवा सार्वत्रिक निवडणुका यांच्या निकालाचे अर्थ जो तो आपापल्या सोयीने लावणारच. पण देशातल्या शहाणपणावर माझा विश्वास आहे. १९६७ च्या निवडणुकांनंतर देशात निरनिराळ्या 'सेनां'चे राजकारण सुरू झाले होते. परंतु त्यातले धोके जसजसे नजरेपुढे येत राहतील, तसतसे संकुचित विचार नाहीसे होण्यास मदतच होईल. प्रादेशिक विचाराचा धोका राष्ट्रवादाला तर आहेच, पण, पुरोगामी विचारालाही तो मोठा अडथळा आहे. कारण प्रादेशिक विचारप्रणालीतून प्रतिगामी वृत्तीचे लोक नेतृत्व करण्यासाठी सरसावतात आणि मोक्याच्या जागा अडवून बसतात. आज तर संकुचित विचारवृत्ती प्रादेशिक वादापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. सर्वच क्षेत्रांत ती पसरली आहे.

चलनवाढ, महागाई व आर्थिक समस्या या सर्वच अविकसित राष्ट्रांसमोरील समस्या आहेत. या प्रश्नांतून बाहेर पडावयाचे, तर शेतकऱ्यांपासून तो कामगार आणि मध्यमवर्गीय संघटित वर्गाने केवळ 'ट्रेड युनियन'चा विचार आणि फायदा आपल्या नजरेसमोर ठेवून चालणार नाही. सर्व क्षेत्रांतील उत्पादन वाढविणे आणि राष्ट्रीय संपत्ती वाढविणे, यावरच आपले सर्वांचे लक्ष केंद्रित झाले पाहिजे. केंद्र सरकारने त्यासाठी काही धोरण निश्चित आखलेले आहे. त्याची पूर्णांशाने अंमलबजावणी होत नाही, ही मोठी उणीव मानावी लागेल. हे काम राज्यांचे किंवा ते काम केंद्राचे, अशी कामाची टोलवाटोलवी होत राहिल्याने साध्य दुरावते. खासगी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमधील कर्मचाऱ्यांमध्ये, तसेच शेतकरी, आणि कामगार यांच्या ठिकाणीही समाजवादाची जाण आणि विश्वास निर्माण करणे हेच मूलभूत कार्य आहे, असे मी मानतो.

पुरोगामी विचाराचे व आचाराचे बोट धरून मी आजवर वाट चालत आलो. देशाला सुखी करण्याच्या शिखराकडे नेणारी ही वाट आपणा सर्वांनाच धरावी लागणार आहे. पुढचा पल्ला एकमेकांच्या साथीनेच गाठावयाचा आहे. 'सर्वे सुखिन: संतु' असे घडण्याची शक्ती लाभावी, हीच सदिच्छा.

**(१० मार्च १९७४ 'केसरी'तील मुलाखतीच्या आधारे)**

❍ ❍ ❍

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१६'

# मानपत्र

मानवी जीवनामध्ये उत्कर्षाचा रस्ता हा कधीच सरळ व निर्विघ्न नसतो. त्यात चढउतार असतात, अचानक येणाऱ्या अडचणी व अनपेक्षित संकटे यामुळे उत्कर्षाकडे होणारी वाटचाल थांबते की काय, अशीही परिस्थिती निर्माण होते. अशा संकटसमयी सर्वसाधारणपणे मानवी प्रतिक्रिया दोन प्रकारची असते. एक म्हणजे, संकटापुढे माघार घेणे व दुसरी म्हणजे, दुर्दम्य इच्छाशक्तीने परिश्रमपूर्वक संकटावर मात करणे. भारतीय युद्धाच्या प्रारंभी भीष्म व द्रोण यांच्यासारखे आचार्य व इतर आप्त-स्वकीय युद्धासाठी जमलेले पाहून अर्जुनासारख्या महावीराने हातपाय गाळले. परंतु, भगवान श्रीकृष्णासारखा सारथी असल्यामुळे त्यांनी अर्जुनाला नाना प्रकारे उपदेश करून त्याच्या मन:स्थितीत इष्ट तो बदल घडवून आणला. त्यामुळे, 'मी हे युद्ध करणार नाही' असे म्हणणाऱ्या अर्जुनाचा मोह दूर होऊन तो युद्धास तयार झाला. आजच्या राज्यस्तरीय पुरस्काराचे मानकरी श्री. प्रतापशेठ साळुंखे यांच्या आयुष्यातही असे अनेक कसोटीचे व निर्वाणीचे प्रसंग आले. परंतु, त्या त्यावेळी आपल्या इच्छा शक्तीने व अविरत मेहनत घेण्याच्या वृत्तीने त्यावर मात करून त्यांनी केवळ आपली व कुटुंबियांची आर्थिक परिस्थितीच सुधारली नाही; तर समाजामध्ये मानाचे स्थान मिळविले.

श्री प्रतापशेठ साळुंखे हे खानापूर तालुक्यातील विटयाजवळच्या पारे नावाच्या एका लहान गावात जन्माला आले. त्यावेळी त्यांच्या वडिलांची व कुटुंबाचीही आर्थिक स्थिती चांगली होती. वडील महादेव साळुंखे हे मद्रासला गलाईचा म्हणजेच सोन्या चांदीचे दागिने शुद्ध करण्याचा व्यवसाय करत असत. तीनही चुलत्यांमध्ये ते एकुलते एक होते व काकींने त्यांना दत्तक घेण्याचे ठरविले होते. परंतु, काकींने अचानक निर्णय बदलला व दुसऱ्याच एका मुलाला दत्तक घेतले. त्यामुळे होती नव्हती ती सर्व संपत्ती गेली. गावातील प्रचंड मोठा वाडा सोडून वडील जुन्या छोट्या घरात आले व थोडी फार शेतीवाडी होती ती करू लागले. परिस्थिती इतकी हलाखीची होती की, एका बाजूला बैल व दुसऱ्या बाजूला दहा/बारा वर्षांचा प्रताप खांद्यावर जू घेऊन कोळपणी करीत. प्रतापला शिक्षणाची आवड होती. परंतु, पाटी घ्यायला पैसे नव्हते. दोन दोन मैल अनवाणी पायाने शाळेला जावे लागे. ही स्थिती पाहून त्यांच्या मामाने प्रतापला गलाईच्या व्यवसायामध्ये घालायचे असे ठरविले. शिक्षण बंद झाले. प्रताप सर्वात थोरला. त्यामुळे वडिलांचा कोलमडलेला संसार सांभाळण्याची जबाबदारी त्याच्यावर आली.

तेरा / चौदा वर्षांचा प्रताप आलेप्पीला आला. बरोबर त्यांचा चुलत भाऊ कृष्णादादा होता. त्याला परिसर माहीत होता. पण, भाषेची अडचण होती. रहायला जागा नव्हती. दोघेही मंदिरातील सभा मंडपाच्या कोपऱ्यात मुक्काम करून होते. तिथेच एक मोकळी जागा मिळवून त्यांनी झोपडीवजा दुकान मांडले. हळूहळू काम मिळायला लागले. परंतु आलेप्पी येथील व्यवसायाची मर्यादा लक्षात घेऊन प्रतापदादांनी दुकान बंद केले व ते कोचीनला गेले. त्यांनी व कृष्णा दादा यांनी कमरेचे चांदीचे कटदोरे विकून गलाईची आयुधे घेतली. हळूहळू इतरांचा विश्वास मिळवून त्यांनी व्यवसाय वाढवला व स्वत:ची भट्टी घातली. पाच/सात वर्षे उत्तम व्यवसाय झाला. त्यामुळे, पारे गावात त्यांनी मोठा बंगला बांधला, गाडी घेतली. परंतु अचानक सुवर्ण नियंत्रण

कायदा आला आणि गलाईच्या धंद्यात अडचणी दिसू लागल्या. तेव्हा त्यांनी भावाला शिकायला पाठवून दिले. त्याचवेळी पारे गावातील घरावर दरोडा पडल्याची वार्ता मिळाली. घरातील सर्व संपत्ती धुऊन निघाली. संकटे एकटी येत नाहीत याचा त्यांना अनुभव आला. कॉफेपोसा (COFEPOSA) कायद्याखाली त्यांना अटक होऊन तुरुंगवास घडला. त्यांचा गलाईचा धंदा इतका उत्तम चालला होता की, दूरदूरच्या ठिकाणांहून त्यांच्याकडे सोने चांदी शुद्ध करण्याकरिता येत असे. त्याचा फायदा घेऊन पुण्या-मुंबईहून येणारा माल पोलिसांनी पकडला की, संबंधित लोक बेलाशक प्रताप दादांचे नाव घ्यायचे. त्यामुळे, तेच या काळ्या धंद्यात आहेत अशा गैरसमजुतीतून त्यांना अटक झाली होती. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी केरळ सरकारकडे विचारणा केली व त्यानंतर चौकशी होऊन प्रतापदादांची निर्दोष सुटका झाली. त्या प्रसंगातून गलाई व्यवसायामध्ये काम करणाऱ्यांची राष्ट्रव्यापी संघटना काढण्याचा विचार पुढे आला व त्यांच्या अध्यक्षतेखाली 'नॅानल गोल्ड ॲन्ड सिल्वर रिफायनर्स ॲन्ड ज्वेलर्स असोसिएशन' निर्माण झाली. गलाईच्या धंद्यातील मर्यादा लक्षात घेऊन प्रतापदादांनी एर्नाकुलम येथे ब्ल्यू डायमंड हॉटेल सुरू केले. 'शालीमार ज्वेलर्स' या नावाने उद्योग सुरू केला व ग्राहकांना प्रमाणित सोने मिळावे यासाठी हॉल मार्कींगची व्यवस्था ही केली. शिवप्रताप पतसंस्था स्थापन केली. शिवप्रताप मंगल कार्यालय सुरू केले. अशातऱ्हेने सुरुवातीच्या गलाई व्यवसायात अडकून न पडता त्यांनी अनेक व्यवसाय हाती घेऊन व्यापक पायावर आपले उद्योगांचे साम्राज्य उभे केले.

शिक्षणाची आवड असूनही शिकता न आल्याने त्यांनी आपल्या पुढच्या पिढीच्या शिक्षणावर विशेष भर दिला. आज त्यांच्या कुटुंबातील सर्वजण उच्चशिक्षित आहेत. कौटुंबिक कलहामुळे त्यांचे आयुष्य पणाला लागले होते. परंतु आपल्या परिश्रमाने व प्रामाणिकपणे केलेल्या व्यवसायाने त्यांनी आपल्या जीवनाचे सोने केले. नुकताच त्यांचा अमृत महोत्सव साजरा झाला. अवघड परिस्थितीतून आर्थिक उत्कर्ष व सामाजिक प्रतिष्ठा मिळविल्यानंतरही त्यांचे पाय जमिनीवरच आहेत. त्यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे 'ज्याला रुपयाची किंमत कळाली, तोच खरा श्रीमंत. पैसा कितीही मिळवा, पण स्वप्नाला व स्वत:च्या गतकाळाला कधी विसरू नका. सतत जमिनीवर रहा. मिळालेल्या पैशाचा सदुपयोग करा. पैशाचा माज येऊ देऊ नका. अन्यथा, आपल्यात आणि सामान्य माणसात अंतर येते. निर्व्यसनी रहा. स्वत:च्या शरीरावर प्रेम करा, मन व मनगट मजबूत करा, म्हणजे, जीवनामध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणीतून तुम्ही तरून जाल आणि जो तरून जातो त्यालाच खऱ्या अर्थाने तरुण म्हणतात.'

आयुष्यात आलेल्या बिकट प्रसंगांवर दुर्दम्य इच्छाशक्तीने मात करून त्यांनी स्वत:ची व कुटुंबाच्या प्रगतीची उच्च शिखरे गाठली. त्याबरोबरच ज्या समाजातून आणि परिसरातून ते उभे राहिले, त्यांच्या ऋणांची जाणीव ठेवून त्यांनी अनेकांना उन्नतीचा मार्ग मिळवून दिला. अशा या असाधारण धैर्याच्या अष्टपैलू उद्योजकाला व समाज धुरीणाला 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१६' पुरस्कार देताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला विशेष आनंद होत आहे.

शरदपवार

मुंबई
दिनांक : २५ नोव्हेंबर २०१६

शरद पवार
अध्यक्ष,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## कार्यवृत्त

### लोकसंवाद
### महाश्वेतादेवी आदरांजली

नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि सम्यक संवाद आयोजित 'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत ३ सप्टेंबर २०१६ रोजी महाश्वेतादेवी यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात तसेच सूत्रसंचालन 'सम्यक संवाद'च्या सोनाली शिंदे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ यांनी केले. महाश्वेतादेवी यांच्या जीवनातील संघर्ष व कार्य या विषयावर चर्चा करण्यात आली. ही चर्चा करतांना प्रा. इलीना सेन यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

महाश्वेतादेवी या फक्त लेखिका किंवा सामाजिक कार्यकर्त्याच नव्हत्या तर त्या एक पत्रकार, साहित्यिक तसेच विचारवंत व आंदोलनधर्मीही होत्या. इ.स. २००२ मध्ये साहित्यातील योगदानाबद्दल यांना 'ऑफिसर ऑफ आर्टस अँड लिटरेचर' हा फ्रान्सचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी किताब जाहीर केला गेला होता. याशिवाय भारतातही त्यांना साहित्य अकादमीने सन्मानित केले आहे. त्यांना इ.स. १९९६ सालचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. अशा त्यांच्या बद्दलच्या बऱ्याच बाबी प्रा. इलीना सेन यांनी मांडल्या. यानंतर सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी 'नून' या कथेचे वाचन केले. कार्यक्रमाचे आभार व कविता वाचन श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले व कार्यक्रमाची सांगता महाश्वेतादेवी यांच्या प्रसिद्ध कादंबरी 'हजार चौरासी की माँ' च्या फिल्म प्रदर्शनाने झाली.

या कार्यक्रमासाठी श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद होता. महाश्वेतादेवी यांच्या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश सावंत, प्रा. महेश कांबळे, पत्रकार समीर परांजपे, नीला उपाध्ये, श्री. सचदेव, शंकर खरात, भारती शर्मा, हेमांगी जोशी, संगीता मालशे, संगीता खरात, सम्यक संवादचे निलेश खानविलकर तसेच इतर मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

### विज्ञानगंगा–

विज्ञान आणि तंत्रज्ञानासंबधी घडलेल्या व घडणाऱ्या चालू घडामोडी लोकांपर्यंत पोहोचाव्या याकरिता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' हा उपक्रम राबवला जातो. विज्ञानाचे प्रमुख कार्य सृष्टीतील संगती जाणणे, तिचे रहस्य उलगडणे हे होय. वस्तुस्थितीतील सुट्यासुट्या घटकांची माहिती होणे याला फारसे महत्त्व नाही; महत्त्व आहे ते या घटकांतील परस्परसंबंधांविषयीचे नियम सापडण्याला. असे नियम सापडणे म्हणजे सृष्टीतील घटकांचा व घटनांचा अर्थ लावणे होय. कोणतीही घटना समजणे म्हणजे ती कोणत्या सृष्टीनियमानुसार होते हे कळणे. काय केले असता काय होईल हे कळले म्हणजे विज्ञानाचे कार्य संपले असे नाही. विज्ञानाचा रोख जे घडते ते कोणत्या सृष्टिनियमानुसार घडते व कसे घडते हे शोधून काढण्यावर असतो. सृष्टीचे रहस्य जाणणे हे विज्ञानाचे ध्येय असते. या 'विज्ञानगंगा' उपक्रमांतर्गत घेण्यात आलेले विषय पुढील प्रमाणे:

- **गुरुत्व लहरी**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा'

कार्यक्रमांतर्गत 'आयुका'चे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ मा. प्रा. संजीव धुरंधर यांचे 'गुरुत्व लहरी' या विषयावर व्याख्यान सोमवार दिनांक. १४ मार्च २०१६ रोजी आयोजित करण्यात आले होते. अंतराळातील कृष्णविवरांच्या टकरीमुळे नुकत्याच शोध लागलेल्या गुरुत्वीय लहरींच्या संशोधनाचा आजवरचा प्रवास, त्यातले अडथळे आणि या शोधात जगभरच्या शास्त्रज्ञांनी उपसलेले अविश्रांत कष्ट, भारतीय शास्त्रज्ञांचे त्यातील योगदान आणि या शोधामुळे विश्वनिर्मितीचे रहस्य उलगडण्यास मिळू शकणारी दिशा यावर 'आयुका'चे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ मा. प्रा. संजीव धुरंधर यांचे 'गुरुत्व लहरी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

## ● टेक्नोव्हिजन – २०३५

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' या कार्यक्रमात 'टेक्नोव्हिजन – २०३५' या विषयावर ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ मा. डॉ. अनिल काकोडकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. सदर कार्यक्रमात भारतासमोरील पुढील प्रश्नांवर विवेचन झाले.

- स्वच्छ हवा आणि पाणी,
- अन्न आणि आहार सुरक्षा,
- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य,
- २४ तास मिळणारी उर्जा, निवारा,
- रोजगाराच्या संधी, दळणवळण,
- राष्ट्रीय सुरक्षा,
- सांस्कृतिक विविधता,
- प्रशासन,
- पर्यावरण

अशा भारतासमोर असणाऱ्या विविध प्रमुख समस्या आणि २०३५ साली त्यांचे स्वरूप कसे असेल, याचा अहवाल डॉ. अनिल काकोडकर यांनी यावेळी मांडला. श्रोत्यांचा यास उत्स्फूर्त सहभाग लाभला होता.

## ● आगामी पावसाळा

भारतात दर तीन ते चार वर्षाने दुष्काळ पडतो, ही गोष्ट फार जुनी आहे. महाराष्ट्रात तर असा दुष्काळ तीन वर्षातून कधी कधी सलगही पडत आला आहे. आणि यंदाचा दुष्काळ तर अधिक कडक होता. त्याचे चटके लातूरच्या निमित्ताने आपण रोज वाचत आहोत. त्यामुळे दरवर्षीच्या मे महिन्यात आगामी पावसाळा कसा असेल याची उत्सुकता सर्व जनतेला असते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांनी संयुक्तपणे सुरू केलेल्या 'विज्ञान गंगा' या मासिक व्याख्यानमालेतील तिसरे व्याख्यान 'आगामी पावसाळा' या विषयावर प्रसिद्ध हवामानातज्ञ डॉ. रंजन केळकर यांनी दिले. 'मॉन्सून' म्हणजे पाऊस नाही, तर मॉन्सून म्हणजे विशिष्ठ मोसमामध्ये वाहणारे नैऋत्य मोसमी वारे, जे येताना पावसाचे ढग घेऊन येतात. भारतातला मॉन्सून हा एक अद्भुत फेनोमिना आहे. भारताचे आणि मॉन्सूनचे फार जुने नाते आहे. इतर युरोपीय देशांमध्ये मॉन्सून नाही. अद्ययावत असणाऱ्या भारतीय हवामान खात्याकडे भारताच्या गेल्या १५० वर्षाच्या पावसाच्या नोंदी आहेत, ज्या या मॉन्सूनची विविध वैशिष्ट्यं सांगतात. जागतिक घडामोडींमध्ये हवामान बदलावर सतत बोललं जातं. परंतु, हवामान बदल सगळीकडे लागू होत नाही. वैश्विक पातळीवर वेगळा बदल होतो, आणि स्थानिक पातळीवर त्याचा परिणाम असतो. मराठवाड्यातील दुष्काळ हा तिथल्या भौगोलिक परिस्थितीमुळे उद्भवतो. नैऋत्य मोसमी वारे तिथून वाहत नाहीत तसेच बंगालच्या उपसगरातून पाऊस घेऊन वाहणारे वारे तिथपर्यंत पोहोचत नाही. म्हणून आपली भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळाकडे 'नियोजनाचा अभाव' म्हणून बघितले पाहिजे. आपला मॉन्सून आपल्याला दरवर्षी चार

महिने भेटायला येत असतो. त्याला जपूया, त्यावर प्रेम करूया, साठवूया, त्याचे जतन करूया आणि दुष्काळाशी सामना करूया, असा संदेश डॉ. केळकर यांनी यावेळी दिला.

- **भौगोलिक स्थलदर्शक प्रणाली (GPS)**

मानवी आयुष्य समृद्ध करण्यासाठी काय करता येईल, हे देखील उपग्रहांच्या निर्मितीचे प्रयोजन होते. असे प्रतिपादन 'इस्रो'च्या 'स्पेस ॲप्लिकेशन सेंटर'चे माजी संचालक डॉ. आर. आर. नवलगुंद यांनी केले. ते 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान' व 'मराठी विज्ञान परिषदे'तर्फे आयोजित 'विज्ञानगंगा' या व्याख्यानमालेत 'भौगोलिक भूदर्शक प्रणाली' या विषयावर व्याख्यान देताना बोलत होते. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यवाह डॉ. शरद काळे व कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ व मराठी विज्ञान परिषदेचे अ. पां. देशपांडे आदी उपस्थित होते.

अन्य ग्रहांवरील जीवसृष्टी तसेच तिथले नैसर्गिक स्त्रोत, अवकाशस्थ घटक आदींच्या अभ्यासासाठीच उपग्रह अंतराळात सोडले गेले. तसेच, आपण, कुठे आहोत आपले अक्षांक्ष-रेखांश यालाच दिशादर्शन म्हणत असून प्राचीन भारतातही भौगोलिक खुणांवरून दिशादर्शन केले जात असे, असे नवलगुंद पुढे म्हणाले.

१९५७ साली रशियाने 'स्पुटनिक' उपग्रह अवकाशात सोडल्यावर अशा दिशादर्शनाची गरज जगाला भासू लागली. यानंतर उपग्रहांच्या निर्मितीवर गांभीर्याने विचार करण्यात आला. 'ग्लोनास' ही रशियाची तर 'गॅलिलिओ' ही युरोपाची, अशा दिशादर्शन प्रणाली नंतरच्या काळात निर्माण झाल्या. मात्र, 'जीपीएस' या अमेरिकी प्रणालीचा त्यांच्या लष्करासाठी वापर होत असल्याने भारताला स्वतः च्या लष्करासाठी ही प्रणाली वापरण्यासाठी मर्यादा आल्या. म्हणूनच भारताने स्वतःची दिशादर्शन प्रणाली निर्माण करण्याचा ध्यास घेतला. यातूनच 'इंडियन रिजनल नॅव्हीगेशनल सिस्टिम' (आयआरएनएसएस) म्हणजेच 'नाविक' या भारतीय प्रणालीचा उदय झाला. या भारतीय प्रणालीद्वारे भारतीयांना उपयुक्त असा माहितीचा खजिना 'भुवन' या पोर्टलवर उपलब्ध आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. असेही त्यांनी नमूद केले.

भारतात सध्या 'एज्युसॅट'मार्फत वैश्विक शाळेच्या संकल्पनेचा महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी स्वीकार केला असून 'टेलिमेडीसीन' या ग्रामीण भागातील नागरिकांवर देशातील चांगल्या डॉक्टरांमार्फत उपचार करण्याच्या संकल्पनेचा प्रसारही देशात झाला आहे. तसेच, भारतातील कृषी व्यवस्थेला महत्त्वाचा हातभार सध्या 'इस्रोने सोडलेले उपग्रह करत असून याचबरोबरीने भूजल-पातळी, सागरी अभ्यास, माशाची उपलब्धता, नद्यांची परिस्थिती आदी अनेक मुद्द्यांवर भारतीय उपग्रह चांगली कामगिरी बजावत असल्याचे नवलगुंद यांनी सांगितले.

- **घनकचऱ्यापासून वीज आणि मिथेनची निर्मिती**

सध्या सगळ्या भारतभर घनकचऱ्याचा भस्मासूर झाला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि बदलत्या राहणीमानामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण वाढत चालले आहे आणि कचरा साठवण्याच्या जागा संपत चालल्या आहेत. त्यामुळे 'इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी' या माटुंग्याच्या संस्थेतील प्रा. अनिरुद्ध पंडित यांनी घनकचऱ्यापासून मिथेन हा जळाऊ वायू आणि पुढे या वायूपासून वीज बनवण्याचे तंत्र विकसित केले आहे.

आता हाच मार्ग भारतभरच्या सर्व नगरपालिकांना अवलंबावा लागणार आहे. केवळ हाच पर्याय शिल्लक राहणार आहे. म्हणून हा विषय अतिशय महत्वाचा असल्यामुळे त्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचणे

गरजेचे आहे. असे मत प्रा. अनिरुद्ध पंडित यांनी यावेळी मांडले. दिनांक ३० जुलै रोजी चव्हाण केंद्र याठिकाणी व्याख्यान्याचे आयोजन केले होते. या व्याख्यानास श्रोत्यांचा उत्तम सहभाग होता.

- **'डावे-उजवे'(अणु रेणूंची संरचना)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद ह्या दोन संस्थांच्या वतीने 'डावे-उजवे' अर्थात अणू-रेणूंची संरचना ही संकल्पना जनसामान्यांसमोर सोप्या भाषेत स्पष्ट करणारे व्याख्यान शुक्रवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान ऐकण्यासाठी उपस्थित श्रोत्यांमध्ये शाळकरी विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती. व्याख्यानानंतर वक्त्यांशी झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात मोठ्यांबरोबरच या विद्यार्थ्यांनीही अतिशय उत्साहाने भाग घेतला. 'दिसायला सारखे असणे वा वाटणे, आणि प्रत्यक्ष सारखे असणे' यात खूप मोठा फरक असतो हे अणू-रेणूंच्या संरचनेमध्ये काळजीपूर्वक लक्षात घ्यावे लागते' हा मुद्दा डॉ. मानसी राजाध्यक्ष यांनी प्रश्नोत्तरादरम्यान अधिक स्पष्ट केला. डॉ. राजाध्यक्ष यांचे व्याख्यान पडद्यावर बदलणाऱ्या अनेक स्लाईड्सच्या मदतीने होत असल्याने श्रोत्यांपर्यंत ते उत्तमरित्या पोहोचले, व अतिशय रंगले.

- **विज्ञान ऑलिम्पियाड**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या व्याख्यानमालेतील सातवे पुष्प २१ सप्टेंबर २०१६ रोजी चव्हाण केंद्र येथे पार पडले. या कार्यक्रमाला शालेय विद्यार्थ्यांची व पालकांची लक्षणीय उपस्थिती होती. विज्ञान ऑलिंपियाड म्हणजे काय व त्यासाठी करावयाची तयारी याची माहिती विद्यार्थी व पालकांना समजेल अशा सोप्या भाषेत प्रा. विजय सिंग यांनी अगदी खेळीमेळीच्या वातावरणातून दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) (NCERT) शैक्षणिक विकासाला गुणात्मक दृष्टिने पाठिंबा देतात, आणि असमानता दूर करण्यासाठी व सर्व विद्यार्थ्यांना एकस्वरूपाचे शिक्षण मिळण्याबाबत विशेष प्रयत्नशील असतात. एनसीईआरटी विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता मान्य करतात व त्यांच्यातील प्रतिभेला राष्ट्रीय प्रतिभा शोध योजनेअतर्गत प्रोत्साहन देतात.

या योजनेचा उद्देश प्रतिभावान विद्यार्थी ओळखणे व त्यांच्या प्रतिभेचे संवर्धन करणे असा होता. म्हणून या योजनेच्या अंतर्गत विज्ञान, सामाजिक विज्ञान, इंजीनियरिंग, चिकित्सा, प्रबंधन आणि कायदा अशा वेगवेगळ्या क्षेत्रांचा समावेश करण्यात येतो. यात गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान व मासिक शिष्यवृत्तीमार्फत आर्थिक मदत दिली जाते. ऑलिंपियाड हे फक्त शालेय विद्यार्थ्यांसाठीच आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही त्यात भाग घेता येत नाही.

**ऑलिंपियाडमधील भारताचा सहभाग**

भारताचा आंतरराष्ट्रीय सहभाग तसा अलिकडचा आहे. गणित (Mathematics) ऑलिंपियाडमध्ये १९८९ मध्ये भारत प्रथमच सहभागी झाला. पुढे पदार्थविज्ञान (सन १९९८), रसायनशास्त्र (१९९९), जैविकशास्त्र (२०००), खगोलशास्त्र (२००४), आणि बालविज्ञान (२००७) असा भारताचा सहभाग वाढत गेला. दरवर्षी सुमारे १५००० ते ५०,००० मुले ऑलिंपियाडसाठीच्या स्पर्धेत सहभागी होतात. ऑलिंपियाडसाठी भारत सरकार संपूर्ण आर्थिक सहाय्य करते व पुरेपूर प्रोत्साहन देते. भारतीय ऑलिंपियाडचे मुख्य केंद्र म्हणजे मुंबईतील होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन (HBCSE) हे होय. HBCSE हे

टाटा इन्स्टीट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चच्या अंतर्गत कार्यरत आहे.

ऑलिंपियाड आणि ऑलिंपिक खेळ यांच्यातले मुख्य साम्य म्हणजे दोन्ही आंतरराष्ट्रीय स्तरावर होतात. मात्र, ऑलिंपिक हे चार वर्षांतून एकदा होते, तर ऑलिंपियाड हे दरवर्षी आयोजित होते. विविध विषयांतील ऑलिंपियाड ही वेगवेगळ्या वेळी व वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित होत असतात. प्रत्येक देशाला त्यात सहा विद्यार्थी पाठवता येतात. हे सहा विद्यार्थी निवडण्यासाठी इतर देशांप्रमाणेच भारतातही स्पर्धा परीक्षा होतात. त्यातील सर्वोत्तम मुले आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाडसाठी निवडली जातात. भारतातून आजपर्यंत सुमारे ४०० मुले आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाडमध्ये गेली व त्यातील ९९ टक्के मुलांनी पदके व प्रमाणपत्रे मिळवली आहेत. ऑलिंपियाडमध्ये अधिकाधिक शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा व आपल्या गुणवंत व चमकदार मुलांची त्यातून निवड व्हावी, यासाठी अधिकाधिक शाळांनी त्यात सहभागी व्हावे असा भारत सरकारचा प्रयत्न असतो. त्या प्रयत्नांना साथ देण्यासाठीच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे मराठी विज्ञान परिषदेच्या सहयोगाने हे शिबीर आयोजित करण्यांत आले होते.

## लोकसंवाद
## चालू जागतिक घडामोडी

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित लोकसंवाद उपक्रमांमध्ये ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी 'चालू जागतिक घडामोडी' यावर मार्गदर्शन केले. आजूबाजूच्या देशांमध्ये घडणाऱ्या घडामोडी भारताच्या दृष्टीने कशा महत्वाच्या आहेत आणि त्यांच्याकडे भारतीयांनी कसं बघितलं पाहीजे, 'ब्रेग्झिट'चा एकूण जागतिक आणि भारतीय सामाजिक, आर्थिक व्यवस्थेवर कसा परिणाम होईल, त्यावर काय उपाययोजना करणे गरजेचे आहे, सध्या सर्वच देशांमध्ये इसिसच प्रभाव वाढत आहे; त्याची कारणे काय असू शकतात तसेच अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक यांसह अनेक प्रश्नांवर त्यांनी प्रकाश टाकला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय – आर्थिक धोरण, समाजकारण याबरोबरच राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, जागतिक संघटना, जातीयवाद, विचारसरणी, मूल्ये आणि आपली राज्यघटना आणि इतर राष्ट्रांशी तुलनात्मक परिस्थिती या विषयांवर श्री. केतकर यांनी यावेळी चर्चा केली.

ज्येष्ठ अर्थतज्ञ मा. अजित रानडे, जेष्ठ माजी सनदी अधिकारी मा. बी. के. अग्रवाल, प्रतिष्ठानचे विश्वस्त समीर दलवाई, ज्येष्ठ पत्रकार पद्मभूषण देशपांडे, विचारवंत व लेखक सुरेश सावंत, क्लाइड क्रेस्टो, नीला लिमये, सामाजिक कार्यकर्त्या भारती शर्मा, संजय बोरगे, रमेश मेनन, क्रीडा क्षेत्रातील सुनील वालावलकर तसेच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाची संकल्पना प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे यांनी स्पष्ट केली. प्रास्ताविक दत्ता बाळसराफ यांनी केले.

## युवा स्वातंत्र्यज्योत रॅली :–

दिनांक १४ ऑगस्ट २०१६ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपुरुषांना अभिवादन करण्यासाठी तरुणांमध्ये स्वातंत्र्य दिनाविषयी आदराची जाणीव व जागृती निर्माण व्हावी यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीची सुरुवात श्री. विजय कसबे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचा उद्देश सहभागींसमोर मांडला. यानंतर प्रमुख पाहुणे मा. विनीत जोगळेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. युवा पिढीच्या

भविष्यात काय काय अपेक्षा आहेत आणि त्यांचे दायित्व काय आहे आणि असावे यावर विवेचन केले. यानंतर त्यांच्या हस्ते ज्योत प्रज्ज्वलित करण्यात आली. 'स्वातंत्र्यदिन चिरायू होवो' अशा घोषणा देत प्रबोधनकार ठाकरे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून रॅली मार्गस्थ झाली.

पुढे सेनापती बापट यांचा पुतळा, शिवाजी पार्क येथील शिवाजी महाराज यांचा पुतळा, सावरकर स्मारकातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा यांना अभिवादन व पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदानास उजाळा दिला गेला.

चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून श्री. आप्पा पाटील व श्रीमती चित्रा वाघ यांनी सहभागींना संबोधित केले. यानंतर श्री. सुरज भोईर यांनी गायलेल्या उत्स्फूर्त गीतांनी तसेच भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे जाहीर वाचन करून शेवटी राष्ट्रगीत गायन केले. श्री. विजय कसबे यांनी शेवटी पाहुण्यांचे व सहभागींचे आभार मानून रॅलीची सांगता केली.

या युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीकरिता श्री. उमाकांत जगदाळे, श्री.राकेश कांबळे, श्री. रमेश मोरे, श्री. रमेश सांगळे, श्री. अर्जुन बचुटे, श्री. राजकुमार चव्हाण, श्री. नारायण परब, श्री. जयंत, प्रज्ञा व शरदिनी सागडे आणि निर्मला कसबे यांसह सुमारे १०० जणांचा सहभाग लाभला.

❍ ❍ ❍

# अपंग हक्क विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर आणि संघटक म्हणून सौ. सुकेशिनी मर्चंडे-शेवडे काम पाहतात.

- **पुणे (इंदापूर) :** दिनांक ४ जुलै, २०१६ पुणे. जिल्ह्यातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर : स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील १,००० श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुले यांना मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर, इंदापूर शाह सांस्कृतिक सभागृह, इंदापूर, पुणे येथे दिनांक ४ जुलै, २०१६ रोजी संपन्न झाले. या शिबिरात दौंड, पुरंदर, बारामती येथील ग्रामीण व शहरी भागातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुलांनी याचा लाभ घेतला.

या कार्यक्रमासाठी स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका या संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक पुण्यात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पूर्वतयारी म्हणून सर्व स्वयंसेवकांना विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, निलेश राऊत, सुबोध जाधव व स्टारकीच्या समन्वयकांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी मा. आ. दत्तामामा भरणे, इंदापूर, मा. अप्पासाहेब जगदाळे, मा. प्रदीपदादा गारटकर, मा. महारुद्र पाटील, मा. सौ. सुनंदा पवार (विश्वस्त, ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट), मा. सौ. शुभांगी पवार, मा. रेहनाताई मुलानी, मा. सचिन सकपाळ, मा. शुभम निंबाळकर, मा. सौ. वनिता बनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

२) पुणे (बारामती) दिनांक १९ व २० ऑगस्ट, २०१६: पुणे जिल्ह्यातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर : स्टारकी फाऊंडेशन, अमेरिका, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील १,३०० श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुले यांना मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर आप्पासाहेब पवार सभागृह, बारामती येथे दिनांक १९ व २० ऑगस्ट, २०१६ रोजी संपन्न झाले. या शिबिरात सातारा, सांगली, उस्मानाबाद, सोलापूर, या जिल्ह्यांतील विविध तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या शिबिरातील कर्णबधीर मुलांची व ज्येष्ठ नागरिकांच्या कानाची तपासणी आणि कर्ण साचाच्या मोजमापाचे शिबिर अनुक्रमे दि. ५ जुलै, २०१६ रोजी बार्शी (सोलापूर), दि. ६ जुलै,२०१६ रोजी (उस्मानाबाद), दि. ७ व ८ जुलै,२०१६ रोजी (बारामती), दि. ९ जुलै,२०१६ रोजी (पुणे) येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी स्टारकी फाउंडेशन, अमेरिका चे अध्यक्ष श्री. बिल ऑस्टीन आणि त्यांच्या पत्नी टॅनी ऑस्टीन तसेच या संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक अमेरिकेहून बारामतीत उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पूर्वतयारी म्हणून सर्व स्वयंसेवकांना विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, निलेश राऊत, सुबोध जाधव आदींनी मार्गदर्शन केले. दिनांक १९ व २० ऑगस्ट, २०१६ रोजी सकाळपासूनच पुणे जिल्ह्यातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक आणि निवड केलेल्या विशेष शाळा व त्यांचे कर्णबधीर विद्यार्थी आप्पासाहेब पवार सभागृहात येण्यास सुरुवात झाली. प्रत्येक शाळांनी त्यांचे विद्यार्थी ३ ते १४ वयोगटातील विद्यार्थी गटनिहाय क्रमाने बसवले होते. आलेल्या प्रत्येक कर्णबधीर विद्यार्थ्याला व श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिकांना अगोदरच दिलेल्या व सविस्तर फॉर्मसह त्यांच्या क्रमानुसार नोंदणी करण्यात आली. नोंदणी झालेले विद्यार्थ्यांचे व ज्येष्ठ नागरिकांचे कान स्वच्छ आहेत किंवा नाही याची पडताळणी करण्यात आली. तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांचे कान स्वच्छ करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्वच्छ केलेल्या कानामध्ये अगोदरच मोजमाप घेऊन तयार करण्यात आलेले कानाचे मोल्ड (कर्णाचे) बसविण्यात आले. मोल्ड बसविण्यात आलेले विद्यार्थ्यांना हॉलमध्ये क्रमानुसार बसवण्यात येत होते. विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी कार्टुन फिल्मची व्यवस्था करण्यात आली. एक-एक करून विद्यार्थ्यांना स्टेजवर बोलावून त्यांना श्रवणयंत्र बसवण्यात येत होते. प्रत्येक श्रवणयंत्राची नीट तपासणी करून ते विद्यार्थ्यांना दिले जात होते. या आधुनिक डिजिटल श्रवणयंत्राची निगा कशी राखावी, त्याचा वापर कसा करावा, त्याची स्वच्छता कशी राखावी, वापर नसताना ते कशा प्रकारे ठेवावे याची माहिती विशेष शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. संपूर्ण माहिती देऊन झाल्यावर विद्यार्थ्यांना शेवटी त्यांच्या श्रवणयंत्रासाठी आवश्यक असणारे पाऊच व पुढील सहा महिने पुरतील एवढे सेल देण्यात आले होते. श्रवणयंत्र व्यवस्थित काम करत असल्याबद्दलची खात्री करून विद्यार्थ्यांना पुस्तिका देण्यात येत होती. पुणे जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. दूषित पाण्याचा कोणालाही त्रास होऊ नये, याकरिता सर्वांसाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्टारकीचे कर्मचारी असो वा शिक्षक, विद्यार्थी सर्वांना त्यांच्या जागेवर जेवण, चहा व पाणी मिळण्याची व्यवस्था सर्व स्वयंसेवकांनी यथोचित पार पाडली.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाठी मा. शरदचंद्र पवारसाहेब, मा. अजितदादा पवार, मा. खा. सुप्रियाताई सुळे, मा. राजेंद्र पवार, सौ. सुनंदा पवार, सौ. सुनेत्रा पवार, मा. रणजीतदादा पवार, सौ. शुभांगी पवार, मा. विठ्ठलशेठ मनियार, मा. एन. के. पाटील, आयुक्त, (अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे) आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांचा स्मृतिचिन्हे आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबईचे राज्य संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. निलेश राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस अपंग सेलचे राज्य प्रमुख मा. श्री. सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, डॉ. कल्याणी मांडके आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबादचे कर्मचारी वृंद, स्वयंसेवक, अपंग हक्क विकास मंच, मुंबई व पुणे विभागाचे कार्यकर्ते, स्वयंसेवकांची टीम कार्यरत होती.

❍ ❍ ❍

# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी २००८ साली 'शिक्षण विकास मंच'ची स्थापना झाली. मा. सुप्रिया सुळे ह्या मंचच्या निमंत्रक आहेत. मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे, विशेष सल्लागार बसंती रॉय, संयोजक दत्ता बाळसराफ, समन्वयक सुरेश पाटील, प्रा. माधव सुर्यवंशी व सदस्य म्हणून नजमा काझी, शुभदा चौकर, विलास कांबळे हे मदत करतात, मिनल सावंत, मनिषा खिल्लारे सहाय्यक म्हणून काम पाहतात. शिवाय राज्यातील शिक्षण तज्ञ, मुख्याध्यापक, शिक्षक हेही वेळोवेळी शिक्षण विकास मंचच्या कामास सहकार्य करीत असतात. शिक्षण विकास मंचच्या सुरुवातीपासूनच्या मार्गदर्शक डॉ. कुमूद बन्सल यांचे ५ सप्टेंबर २०१५ रोजी आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांनी घालून दिलेल्या वाटेवरच मंचची यशस्वी वाटचाल सुरू आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कामामुळे राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळा सकारात्मक कार्याचा ठसा शिक्षण विकास मंचने उमटविला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचाकडून **२३ एप्रिल २०१६ रोजी 'शालेय विद्यार्थ्याचे मूल्यमापन'** या विषयावर शिक्षणकट्ट्यावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. शालेय विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करावे याबाबत चर्चा करण्यासाठी मा. कृष्णकुमार पाटील (सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ) उपस्थित होते.

घोकंपट्टी आणि पाठांतर करण्यापेक्षा भाषा विषयाचे ज्ञान वाढविण्यासाठी शिक्षण मंडळ यंदा प्रथम-भाषा, द्वितीय-भाषा व संयुक्त भाषा या विषयाच्या कृतिपत्रिका काढणार आहे, याचीही माहिती त्यांनी शिक्षणकट्ट्यावर दिली. या संदर्भातील प्रशिक्षण प्राथमिक शिक्षकांना जून-जुलै महिन्यात देणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. भाषा विषयात 'घोका आणि ओका' या पद्धतीला फाटा देऊन त्याऐवजी कृतीवर भर देणार असल्याचे मा. कृष्णकुमार पाटील यांनी सांगितले.

भाषा परीक्षेच्या स्वरूपातील बदल सांगताना त्यांनी पुढील माहिती दिली: २० मार्कांची तोंडी परीक्षा आणि ८० मार्कांची लेखी परीक्षा पूर्वीप्रमाणेच असेल. प्रथम भाषा शिकविताना शिक्षकांनी केवळ वाचन आणि पाठांतराकरिता मर्यादित न ठेवता धड्यातील व्याकरण, भाषाभ्यास, वाचन, उपक्रम, स्वाध्याय आदी घटकांची उजळणी करून घ्यावी. कृतिपत्रिकेत विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिताना भाषा आकलन होणे आवश्यक आहे. खरोखरच भाषाज्ञान, भाषाकौशल्ये आत्मसात केली आहेत की नाहीत, हे समजण्यासाठी कृतीयुक्त प्रश्न विचारले जाणार आहेत. निबंध लिहिताना विद्यार्थी वाचून पाठांतर करून लिहितात. त्याऐवजी एखादे वाक्य दिले जाईल आणि कल्पनाशक्तीचा वापर करून विद्यार्थी त्याचे वर्णन करेल. यामुळे विद्यार्थ्यास भाषेचे ज्ञान, जाण याचीही माहिती मिळेल.

शिक्षणकट्ट्यात शिक्षकांनी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत सुरू असलेल्या विविध चाचण्यांसदर्भात सरकार जागरुक नसल्याच्या तक्रारी केल्या. प्रश्नपत्रिकेतील स्वरूप आणि रचना यात कौशल्याचा अभाव असल्याचेही नमूद केले.

विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षण देण्याऐवजी त्यांचे मूल्यमापन करण्यात येत आहे; ही पद्धत चुकीची आहे असे मत यावेळी मुख्याध्यापक सुचेता भवाळकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास 'शिक्षण विकास मंचा'चे संयोजक डॉ. वसंत काळपांडे, मुख्य मार्गदर्शक श्रीमती बसंती रॉय, एनसीईआरटीचे राज्य समन्वयक रमाकांत काठमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. नजमा काझी, राज अलोनी, फादर ज्यूड, फादर स्वामी, शैलजा मुळे, डॉ. समीर दलवाई, शुभदा चौकर, पत्रकार पूजा पेडणेकर, विनम्रता बोरवणकर, पवन होल्याळकर आणि विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समन्वयक माधव सूर्यवंशी यांनी सर्वांचे आभार मानले.

**'कट्टा शिक्षणाचा' २३ जुलै २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई शिक्षण विकास मंच, शिक्षणकट्टा अंतर्गत वेगवेगळ्या शैक्षणिक विषयांवर चर्चा होत असते. यावेळी चर्चा २३ जुलै २०१६ रोजी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०१६' यावर करण्यात आली. या कार्यक्रमास शिक्षणतज्ञ मा. किशोर दरक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक मा.सुप्रिया सुळे, डॉ. समीर दलवाई, आणि प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ यांची प्रमुख उपस्थिती होती. या कट्ट्याच्या संयोजक बसंती रॉय यांनी 'शैक्षणिक धोरणाचे स्वरूप' समजावून सांगितले. तसेच किशोर दरक यांनी मुलांच्या भविष्याच्या दृष्टीने घ्यावयाची सुरक्षा, मुलांचे हक्क आणि कायदे, पालकांची जागरुकता, शिक्षकांची प्रशिक्षणे यावर मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षण कट्ट्याचे माधव सूर्यवंशी, 'नवमहाराष्ट्रा'चे मीनल सावंत, मनीषा खिल्लारे, महेश साळवी उपस्थित होते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१६ - **७ ऑगस्ट २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या शिक्षण विकास मंचावरील शिक्षण कट्टा यावर उपक्रमात 'राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०१६' यावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. या चर्चेचा पहिला भाग तेवीस जुलै रोजी झाला होता. उर्वरीत विषयावर ७ ऑगस्ट रोजी अभ्यासपूर्ण चर्चा झाली.

शाळेचे अभिन्न अंग असलेल्या शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याशी निगडित विषयावर मुख्यत्वे चर्चा झाली. शिक्षक, मुख्याध्यापक यांची निवड कशी केली जावी, त्यांचे प्रशिक्षण, बढती, वेतन आदी संदर्भात या धोरणात काय तरतूदी आहेत आणि यात काय बदल आवश्यक आहेत यासंबंधीचे विचारमंथन करण्यात आले. ही चर्चा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मध्ये पूर्ण दिवस सुरू होती. या चर्चेची सुरुवात 'शिक्षण कट्ट्या'च्या निमंत्रक श्रीमती बसंती रॉय, यांनी केले तर आभार समन्वयक माधव सूर्यवंशी यांनी मानले.

❍ ❍ ❍

**शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांच्या वतीने दरवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त २५ नोव्हेंबर रोजी आयोजित केली जाणारी राज्यस्तरीय शिक्षण परिषद या वर्षी काही कारणाने शनिवार ७ जानेवारी २०१७ रोजी मुंबईत चव्हाण सेंटर येथे आयोजित करण्यात येणार आहे. कृपया याची नोंद घेऊन सहकार्य करावे.**

**- डॉ.वसंत काळपांडे, मुख्य संयोजक,**
**शिक्षण विकास मंच**

## Suggestions by ShikshanVikas Manch, Mumbai, Maharashtra.

Shikshan Vikas Manch is an educational forum of Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.It works under the chairmanship of Smt. Supriya Sule, M.P. Shikshan Vikas Manch of Yashwantrao Chavan Pratishthan has been working in the field of education since last eight years with a view to enhancing its quality.We have organized a number of activities including seminars, workshops, conferences and adoption of zilla parishad primary schools with the goal of improving quality of school education in mind.

**CONSULTATIONS HELD :**

The core team of Shikshan Vikas Manch was pursued by the representative of educational fraternity to organize a special consultation session on the proposed National Policy on Education 2016. Accordingly three sessions of consultations were held on 7th July 2016, 23rd July 2016 & 7th August 2016 respectively.

The group included Teachers, Principals, NGO's, Journalists, Management representatives, Parents, Academicians & Educational activists . About 100 members shared & deliberated their views in the discussion. After extensive interactions the suggestions were listed with due consensus.

Following suggestions emerged through the deliberations of the Group considering the consensus.

Suggestions by Shikshan Vikas Manch, Mumbai, Maharashtra

- The Title says, 'Some Inputs for Draft National Education Policy – 2016'. We presume that these are just the highlights and hence we expect the Government will also release the entire draft of the National Education Policy – 2016 before finalizing it.
- The Preamble has skipped the Constitutional Provisions of Democracy and Social Justice.
- Pre-school Education- (4.1) - Pre-school Education should be from age 3 years to 6 years. Pre-school Education should be covered under Right to Education (RTE).
- 4.2.1 -For Ensuring the safety and protection of children, the policy initiatives are good, but it will require effective implementation at every level.
- 4.2.6- Idea of engaging trained counsellors in school is welcome, but it should be included in the staffing pattern and making it mandatory in all the schools.
- 4.3.3 – RTE Provision regarding No Detention up to 8th should be continued. Onus of non-performance of students lies on teachers as the responsibility of Remedial teaching is ignored by and large. Weekly workload of 45 hours for teachers, as per provisions of RTE schedule should be implemented in true spirit. There is no evidence to prove that Detention of children helps learning and retention.
- 4.3.4- More efforts needs to be taken for effective implementation of CCE, through teacher training programs, both Pre and In-service.
- 4.4.1 – The criteria/norms for Non-viable schools should be defined for merging (composite schools), considering the geographical constraints.
- 4.8.2– The Skill Development Program will be implemented in 25 % of the schools an higher Education Institutions, however this can be done gradually, subject to availability of placement opportunities.
- 4.10.1 – While facilitating selection and recruitment of teachers, Principals and other academic cadres, Govt. will ensure that the role of School managements to make appropriate choice.

❍ ❍ ❍

# सृजन

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या 'सृजन' विभागातर्फे शालेय विद्यार्थीचा व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करून त्यांचे विद्यार्थी जीवन समृद्ध व्हावे याकरिता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येते. सर्जनशीलता अविष्कार विद्यार्थ्यांबरोबर घडवून यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना व संयोजन सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहेत.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या 'सृजन' विभागातर्फे नागपंचमीनिमित्त सर्पमैत्री अभियान' राबविण्यात आले. यशवंतराव चव्हाण केंद्राच्या सांस्कृतिक सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेमध्ये Slide Show, Photo Exhibition च्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना सापांच्या जाती, सापांचे शेतीमधील महत्व म्हणजे शेतकऱ्यांना होणारी मदत, सापांबद्दलचे समज-गैरसमज तसेच अंधश्रद्धा आणि निसर्गाचा समतोल, या विषयांवर सर्पमित्र मा. सुनील कदम यांनी मार्गदर्शन केले. त्याला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या शंकांचे सुनीलजी कदम यांनी सहज निरसन केले. या वेळी सृष्टीज्ञान संस्थेच्या संगीता खरात, आणि प्रतिष्ठानचे व कार्यशाळेचे समन्वयक श्री. विद्याधर खंडे व सहकारी उपस्थित होते.

**गांधी जयंती-**

सुजन विभागातर्फे 'गांधी जयंती' साजरी..

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागातर्फे २ ऑक्टोबर गांधी जयंतीनिमित्त ११ शाळेतील विद्यार्थ्यांना गांधीजींविषयी माहिती सांगणारा लघुपट दाखविण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गांधीजींविषयी घडलेले वेगवेगळे किस्से सांगितले. त्यातील ११ विद्यार्थ्यांना मा. खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवविण्यात आले. या कार्यक्रमात ७७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

❍ ❍ ❍

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान

## कार्यवृत्त

जागतिक तापमान वाढीमुळे होणाऱ्या हवामानातील बदलांचा सामना करण्याची क्षमता निर्माण करणे ही या शतकातील अत्यंत आवश्यक गोष्ट बनली आहे. विशेषत: शेती-माती-पाणी-जैवविविधता-ऊर्जा यासंदर्भात बदलत्या हवामानाशी जुळवून किंवा त्याविरुद्ध टिकून राहणाऱ्या उपाययोजना पुढे आणणे आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचे आव्हान आपल्यासमोर उभे आहे.

'वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान' मार्फत हे आव्हान पेलणारी भावी पिढी घडविण्याचा प्रयत्न शालेय पातळीवर केला जात आहे. गेली पाच वर्षे मुंबई आणि पुण्यातील शाळांमधून आजवर हजारो विद्यार्थ्यांबरोबर यासंदर्भात विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. याच उपक्रमातील पुढील पाऊल म्हणजे मुलांचे हवामान अध्ययन केंद्र होय. हवामान बदलाचा परिणाम महाराष्ट्राचे पर्जन्यमान, शेती, माती, ऊर्जा, कचरा निर्मुलन आणि जैवविविधता या संदर्भात ठळकपणे लक्षात येत आहे. गाव असो की शहर, सर्वांनाच कमी अधिक प्रमाणात हवामान बदलाचा फटका बसत आहे. हे लक्षात घेऊन मुंबई, पुणे, ठाणे, पालघर, रायगड आणि बीड जिल्ह्यातील विविध शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांबरोबर जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल या पर्यावरणातील समस्यांविषयी जाणीव-जागृती केली जाणार आहे. साधी सोपी उपकरणे तयार करून पाऊस मोजणे, तापमान मोजणे, मातीची व पाण्याची गुणवत्ता ओळखणे, जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी वृक्षसंवर्धन करणे, ऊर्जेच्या पर्यायी स्त्रोतांचा अवलंब करणे असे अनेक उपक्रम केले जातील. या उपक्रमांच्या अंमलबजावणीतून स्थानिक पातळीवरील हवामान अध्ययन केंद्र आकारास येईल. यामार्फत प्रकल्पात सहभागी मुलांमध्ये हवामान विषयक शास्त्रीय अध्ययन, माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरणाचे कौशल्यसुद्धा विकसित होईल.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विविध कार्यकर्त्यांबरोबर बैठका घेऊन शाळांची निवड व कार्यक्रमाचे वेळापत्रक आखण्यात आले. ऑगस्ट महिन्यात सर्व शाळांना प्रकल्प सहभागासाठी पत्रं पाठविण्यात आली.

शाळांचा उत्तम प्रतिसाद या प्रकल्पाला मिळाला व लगेचच शाळांमध्ये प्रकल्पातील विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली. पहिल्या सत्रात हवामान बदल म्हणजे काय? हवामान कसे मोजायचे? हवामानावर परिणाम करणारे विविध घटक व हवामान मोजावयाची विविध उपकरणे कोणती याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच साध्या प्लास्टिकच्या बाटलीपासून पर्जन्यमापक बनवून त्यात पाऊस कसा मोजायचा याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे स्ट्रॉ आणि पेन्सिल वापरून वातकुक्कुटाची संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. त्या अनुसार वातकुक्कुट तयार करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुटीमध्ये करण्यासाठी देण्यात आला. उत्तम बनविलेला वातकुक्कुट शाळेच्या गच्चीवर लावला जाईल व त्यानुसार होकायंत्र वापरून वाऱ्याची दिशा ओळखायला विद्यार्थी शिकतील.

याव्यतिरिक्त प्रकल्पांतर्गत रेन गेज (पर्जन्यमापक), ॲनराइड बॅरोमीटर (हवेचा दाबमापक), तापमापक, दिशादर्शक होकायंत्र, हायड्रोमीटर (आर्द्रतामापक) अशा शास्त्रीय पद्धतीने हवामान मोजावयास मदत करणाऱ्या उपकरणांचा संच प्रत्येक शाळेत कार्यरत करणार असून त्यांच्या नोंदी घेण्याची जबाबदारी त्या शाळेतील संबंधित शिक्षक व विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

❍ ❍ ❍

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम

## कार्यवृत्त

समाजातील गोरगरीब, दीनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरून भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

सन १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने ''यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम'' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व सामाजिक कार्यकर्ते काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य सचिव म्हणून श्री. मा. म. बा. पवार हे काम पाहत आहेत. दिनांक १-९-२०१६ पासून श्रीमती शोभा लोंढे या कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमच्या सदस्य असून त्या या कामासाठी पूर्ण वेळ मदतनीस आहेत.

- **फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम चालते.**

- समाजातील गोरगरीब तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

- प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करून गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

- काहीवेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

- पक्षकारांच्या तंट्यामध्ये सामोपचाराने आपसात तडजोड घडवून आणणे.

- विधी विषयामध्ये संशोधन करून प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारूप तयार करून वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

- विधी विषयामध्ये संशोधन करून प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारूप तयार करून वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

- सर्वसामान्य लोकांना वेळोवेळी कायद्यांची विशेष माहिती करून देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

- सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करून देण्यासाठी वरचेवर विधी साक्षरता (Legal Awareness) कार्यशाळेची आयोजन करणे.

- विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी म्युट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे तसेच अशा विद्यार्थीसाठी 'वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करणे.

- संबंधित न्यायालयाच्या सहकार्याने व त्यांच्या संयुक्त विद्यमाने त्या न्यायालयामध्ये प्रलंबित

असलेल्या प्रकरणामध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी लोकन्यायालय किंवा लोक अदालतचे आयोजन करणे.

- न्यायालयामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी प्रयत्न करणे.

- **फोरमच्या बैठका :–**

कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. या बैठकांना फोरमचे जास्तीत जास्त सदस्य उपस्थित राहतात. त्यानुसार गेल्या १ एप्रिल ते ३१ सप्टेंबर २०१६ या सहा महिन्यामध्ये फोरमच्या ६ मासिक बैठका झाल्या. या ६ बैठकामध्ये एकूण अंदाजे १०६ विषयांसंबंधी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या बैठकांना एकूण ४३ सदस्य उपस्थित होते. त्याप्रमाणे प्रत्येक बैठकीला सरासरी १० सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये ॲड. श्री. भूपेश सामंत, ॲड. श्री. निलेश पावस्कर, डॉ. नं.ब. पाटील, ॲड. मधुकर उगले या मा. सदस्यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

- **फोरमच्या उपसमितीच्या बैठका :** वेळोवेळी विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी फोरमच्या उपसमित्या गठीत केल्या जातात. या समित्यांमध्ये सक्रिय सदस्यांचा उपसमित्या गठीत केल्या जातात. या समित्यांमध्ये सक्रिय सदस्यांचा समावेश केला जातो. अशा उपसमित्यांनी दिलेल्या अहवालानुसार फोरमचे निर्णय घेण्यात येतात.

- **विभागांची बैठक :** १६ ऑक्टोबर २०१६ मध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा भरविण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागाच्या प्रतिनिधीची बैठक मा. सरचिटणीस श्री. शरद काळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १२ जुलै २०१६ रोजी बोर्ड रुममध्ये संपन्न झाली. बैठकीला १६ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ४१ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

- **ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींची बैठक :** १६ ऑक्टोबर २०१६ मध्ये आयोजण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यासंबंधी विचार करण्यासाठी वांद्रे ते दहिसर या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींची बैठक ज्येष्ठ, नागरिक संघ वजिरानाका बोरीवली (पश्चिम), वजिरा यांचे ज्येष्ठालय, जानुजा अपार्टमेंट समोर, चांगुले स्मशानभूमी जवळ, राम मंदिर रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई येथे बुधवार दिनांक २७ जुलै २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता श्री. विजय औंधे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला प्रतिष्ठानच्यावतीने सर्वश्री म.बा. पवार, संजय बनसोडे व शैलेश चव्हाण उपस्थित होते. तसेच बैठकीला ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अंदाजे ६५ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ४१ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

- **कायदेविषयक सल्ला केंद्र :** गोरगरीब व गरजू लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या दुसऱ्या मजल्यावरील ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या सहा महिन्यामध्ये या केंद्रात एकूण २६ बैठका झाल्या. या बैठकांमध्ये एकूण ३५ लोकांना (महिला व पुरुष) तोंडी सल्ला देण्यात आला. सल्ल्याचे विषय अंदाजे विवाह, घटस्फोट, हुंडा, पोटगी, वारसा हक्क, भागिदारी, कामगार कायदा, माहितीचा अधिकार, सेवा नियम, सहकारी कायदा, पंजीकरण, मुद्रांक, फौजदारी, कौटुंबिक अत्याचार, ग्राहक संरक्षण,

भांडे नियंत्रण, मोफा कायदा, गृहनिर्माण इत्यादी विषयासंबंधी होते. आपली प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्यासाठी मोफत वकीलाची सेवा मागणाऱ्या लोकांना शासनाचे संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले. या केंद्राचे काम सर्वश्री श्री. म. बा. पवार, श्री. भूपेश सामंत व श्रीमती प्रितिंदर सिंग इत्यादी वकिलांनी पाहिले.

● **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :–** दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते सायं. ७.०० या वेळात समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत.

● **आपल्या कायद्याची माहिती करून घ्या.** (Know your Law' lecture series) **:–** या व्याख्यानमालेअंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतीचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार आणि सायबर कायदा या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

● **वकीलांची व्यवससायिक नीतिमत्ता या विषयावर चर्चासत्र :–** विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतिमत्ता (Professional Ethics of Lawyers) या विषयाबाबत नवीन होतकरू वकीलांना जाणीव करून देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

● **विधी साक्षरता कार्यशाळा :–** लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्याची माहिती करून देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ – पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृह निर्माण संस्थेचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थेचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सहा महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१.१) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम आणि सातारा बहुजन सेवा संघ नायगाव, दादर (पूर्व), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दिनांक १० एप्रिल २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत नायगाव – भोईवाडा येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

१.२) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व अंधश्रद्धा निर्मूलन समिति केशव गोरे स्मृती ट्रस्ट, गोरेगाव (पश्चिम), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दिनांक २४ एप्रिल २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत गोरेगाव येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष उपस्थित होते. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष अविनाश पाटील हे कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

१.३) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम आणि मैत्री संस्था (ग्रॅन्ट रोड), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दिनांक ८ मे २०१६ रोजी

सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत ग्रॅन्ट रोड येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष उपस्थित होते. श्री. सुरज भोईर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

१.४) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व स्वयंम फाउंडेशन, कुलाबा, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दिनांक २८ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत म्युनिसिपल हायस्कूल-कुलाबा येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी व हिंदी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष उपस्थित होते. श्री. उज्वल जाधव अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

● **विधी साक्षरता कार्यशाळेत शपथ कार्यक्रम व निबंधांना बक्षिसे :-** सर्व विधी साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मुलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहीत मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेतल्या जातात. तसेच विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात. बक्षिसे संबंधित विद्यालये किंवा महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविली जातात. विद्यालयाच्या किंवा महाविद्यालयाच्या समारंभामध्ये संबंधित विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात.

**१२) विधी साक्षरता कार्यशाळे मध्ये शिकविलेले कायदे :-** विधी कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करून देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होतो: १. भारतीय संविधान, २. विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७, ३. हुंडाबंदी अधिनियम, १९६१, ४. भारतीय दंड संहिता, १८६०, ५. ग्राहक संरक्षण कायदा, १९८६, ६. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, ७. हिंदू वारसा हक्क कायदा, १९५६ व इच्छापत्र कायदा ८. गुंतवणूकीसंबंधीचे नियम, ९. कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा, २००५, १०. माहितीचा अधिकार कायदा, २००५, ११. हिंदू विवाह कायदा, १९५५, १२. मुस्लिम कायदा, १३. पोटगी संबंधीचे कायदे, १४. महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, १९६३, १५. हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६, १६. हिंदू दत्तक व पोटगी अधिनियम, १९५६, १७. संपत्ती हस्तातरण अधिनियम, १८८२, १८. विशेष विवाह कायदा, १९५४, १९. बाल विवाह बंदी अधिनियम, २००७, २०. महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम, १९९८, २१. न्यायालयाची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वो च्च न्यायालयापर्यंतची माहिती), २२. स्त्रीयांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, २३. विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation), १९९५ २४. स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मंतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental

Retardation and Multiple Disabilities Act, १९९९) २५. अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६, (The Immortal Traffic (Prevention) Act, १९५६) २६. राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम, १९७१, २७. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, २८. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७, २९. महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम, १९९९, ३०. महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८२, ३१. मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), ३२. मुस्लीम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम, १९८६ ,३३. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन आणि पुर्नविकास) अधिनियम, १९७१, ३४. भारतीय वारसा हक्क कायदा, १९२५, ३५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, ३६. मुंबई मुद्रांक कायदा, १९५८, ३७. गृहनिर्माण संस्थांचे विनियम ३८. अनुसुचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९, ३९. मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती, १९३७, ४०. नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५, ४१. भारतीय मुद्रांक कायदा, १८९९, ४२. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८, ४३. प्रसूती विषयक लाभ अधिनियम, १९६१, ४४. सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०, ४५. अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, ४६. मोटार वाहन अधिनियम, १९८८, ४७. जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९, ४८. मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३, ४९. महाराष्ट्र भांडे नियंत्रण अधिनियम, १९९९, ५०. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६, ५१. माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम, २००७, ५२. मुंबई पोलीस अधिनियम, १९५०, ५३. जादूटोणा विरोधी कायदा, २०१३, ५४. हिंदू मायनॉरिटी अॅन्ड गार्डीयन शिप अॅक्ट, १९५६, गार्डीयनशिप अॅन्ड वॉर्डस् अॅक्ट, ५६. कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी, तक्रार व निवारण) अधिनियम, २०१३, ५७. The Sexual Harassment of Women at Work Place (Prevention, Prohibition and Redressal) Act 14 of 2013.

खालील वक्त्यांनी विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

१. श्री. म.बा. पवार
२. श्री. प्रमोद ढोकळे
३. अॅड. निलेश पावस्कर
४. अॅड. हेमंत केंजारळकर
५. अॅड. अजय केतकर
६. अॅड. भूपेश सामंत
७. डॉ. जे.बी. पाटील
८. श्रीमती शिवानी शेलार
९. प्रा. नारायण राजाध्यक्ष
१०. अॅड. प्रकाश देशमुख
११. श्री. दिलीप तळेकर
१२. श्रीमती सुशिला मुंडे

- **पुढील आर्थिक वर्षामध्ये खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरले आहे.**

१. पोलिसांसाठी ३ दिवसांची विधी कार्यशाळा
२. विद्यार्थ्यांसाठी म्युट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन
३. वकीलांची व्यावसायिक नीतिमत्ता यावर चर्चासत्र
४. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी विधी साक्षरता कार्यशाळा

❍ ❍ ❍

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारिरीक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना पवार व संगीता गवारे यांचे सहकार्य असते. सध्या मुंबई मध्ये ४० ते ६० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थांचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहित व्हावी व लोकांमध्ये हौसिंग व्यवस्थेविषयी जागृती व्हावी या हेतूने महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे जून २०१० सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्राक्षिण दिले जाते. या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, ॲड्, प्रमोद कुमार, मा. विजय सामंत व सहकारी व क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ/अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगलं काम करू शकतात व आपल्या स्वत:च्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करू शकतात. आतापर्यन्त २० ते अगदी ७० वर्षाच्या व ६०० च्या वर प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. त्यांना परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्यात येते. या प्रशिक्षणाचा १८ वा वर्ग दिनांक ६ जून ते २२ जुलै २०१६ या कालावधीत पूर्ण झाला. १९ प्रशिक्षणार्थिनींनी हे प्रशिक्षण पूर्ण केले.

हल्लीच्या धकाधुकीच्या जीवनात स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देण्यास महिलांना वेळ नाही. व त्या स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात व त्यांचे दुष्परिणाम फार त्रासदायक होतात. तेव्हा आपल्या आरोग्याविषयी सतर्क राहणे फार गरजेचे आहे हे लक्षात घेऊन आरोग्याविषयी काय काय काळजी घ्यावी, दिनचर्या व आहार कसा असावा, तसेच विविध शारिरीक व्याधी व त्यावरील उपाय व या व्याधी होऊच नये म्हणून घेण्यात येणारी दक्षता यावरील आयुर्वेदीक उपचार पद्धती या विषयी दोन दिवसांची आरोग्य कार्यशाळा दिनांक २/८/२०१६ व दिनांक ११/८/२०१६ रोजी पोद्दार मेडिकल आयुर्वेदिक कॉलेजमधील तज्ञ डॉक्टर समवेत घेण्यात आली. त्यामध्ये स्त्री स्वास्थ्य, नेत्रआरोग्यम्, स्वास्थ्य संरक्षणम्, घरगुती फेस पॅक आणि साबण यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. एकूण ६४ महिलांनी सहभाग घेतला.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी गणेश उत्सवासाठी ओरिगामी इको फ्रेंडली कार्यशाळा दिनांक २२/८/२०१६ रोजी घेण्यात आली. यामध्ये कागदापासून गणपती, उंदीर व मोदक, फुले शिकवण्यात आली. ३० लोकांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

एकविसाव्या शतकातील स्त्री नोकरी व घर सांभाळून स्वत:च्या व्यक्तिगत सौंदर्याबाबत जागरुक झाली आहे. याच उददेशाने व्यक्तिगत सौंदर्य प्रसाधान म्हणजेच Personal Grooming चे विनामूल्य प्रात्यक्षिक मंगळवार, दि. ३०/८/२०१६ रोजी आयोजित केले होते. ६५ महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. व महिलांच्या खास आग्रहास्तव पाच दिवसांची कार्यशाळा दि. २६/९/२०१६ ते ३०/९/२०१६ या कालावधीत आयोजित केली होती. त्यामध्ये १० महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. यात महिलांना त्वचा, केसाची निगा, मेकअप, केशभूषा या बाबतचे प्रशिक्षण देण्यात आले.

दिनांक २२/९/२०१६ रोजी आयरिस फोल्डींग, टी बॅग फोल्डींग, पेपर क्युलिंग, थ्रेड वर्क या विविध पेपर फोल्डींगच्या पद्धतीने शुभेच्छा पत्रे व पाकिटे यांच्या सजावटीचे विनामूल्य प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. ३० जणांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. व काहींच्या आग्रहास्तव दि. २३/९/२०१६ रोजी टी बॅग फोल्डींगचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. त्यामध्ये १० प्रशिक्षणार्थिंनी या प्रशिक्षणाचा सहभाग होता.

❍ ❍ ❍

# राष्ट्रीय ग्रंथालय

## कार्यवृत्त

आधुनिक जगात झालेल्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे, शिक्षण, व्यापार, उद्योगधंदे संशोधन आणि विकास या क्षेत्रात क्रांतीकारक बदल झाले आहेत. विविध प्रकारच्या संस्था व संघटनेची निर्मिती झाली आहे. या सर्व ठिकाणी चालणारे कार्य चांगल्या रीतीने चालावे म्हणून त्यांना नव्या व अद्यायावत माहितीची सतत गरज असते. अशा माहितीच्या आधारेच या संस्थेच्या पर्यायाने समाजाचा सर्वांगीण विकास होत असतो. म्हणून 'माहिती' हा आजच्या जगातील परवलीचा शब्द बनला असून माहितीला राष्ट्रीय संपत्ती म्हटले जाते. अशा या संस्थाना माहितीविषयक गरजांच्या परिपूर्तीसाठी विविध क्षेत्रात अद्ययावत स्वरुपाची ग्रंथालये स्थापना केली आहे, या ग्रंथालयांना विशेष ग्रंथालय म्हणतात. अशी ग्रंथालय संस्थेशी संलग्न असतात. त्या संस्थेच्या ध्येय्यधोरणाला अनुसरून काम करीत असतात, यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय, प्रतिष्ठानच्या ध्येयधोरणाशी अनुसरून असल्याने हे ग्रंथालय एक 'विशेष' ग्रंथालय म्हणून, कार्यरत आहे.

**ग्रंथसंग्रहः**

ग्रंथालयाने काही महत्त्वाच्या विषयाची वृत्तपत्रीय कात्रणे वाचकांना हाताळता यावी याकरिता व्यवस्थित बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवण्यात आली आहेत. विद्यार्थी, संशोधक यांच्याकरिता अद्यावत माहितीकरिता नियतकालिकांची बांधणी करून संदर्भाकरिता ठेवली आहेत. ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयावरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश, गॅझिटीयर, ॲटलास, इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळ्या कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरून नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात. ग्रंथालयीन नियमानुसार ग्रंथालयाची मांडणी केली आहे. ग्रंथालयाचा वाचकांकरिता जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच पुस्तके शोधण्याकरिता मशीन कॅटलॉगच्या सहाय्याने वाचकांना मदत होते. डीडीसी-२३ (डेव्हीडेसियल क्लासिफिकेशन) नुसार ग्रंथाचे वर्गीकरण केले आहे. मुख्य वर्गांक आणि त्याचे उपवर्ग यानुसार ग्रंथाची मांडणी केलेली आहे. सर्व ग्रंथ याच पद्धतीप्रमाणे कपाटात ठेवण्यात आले असून त्यामुळे संगणकीय सहाय्याने साहित्य शोध जलद गतीने व अचूक घेता येतो.

**ग्रंथालयाचे विभाग :**

ग्रंथालय लहान असो वा मोठे, त्यात ग्रंथनिवडीपासून तर ग्रंथाच्या देवघेवीपर्यंत विविध प्रकारची कामे केली जातात यामध्ये निवड केलेल्या ग्रंथांची खरेदी करणे, त्यांची दाखल नोंद वहीत नोंद करणे, त्याच्यावर ग्रंथालय शास्त्रानुसार प्रक्रिया करणे, वर्गीकरण तालीकीकरण करणे आणि हे सर्व झाल्यावर वर्गीकरण पद्धतीनुसार ग्रंथ कपाटावर मांडून तो 'देवघेव' करण्यासाठी उपलब्ध करून देणे ह्या प्रक्रिया येतात. ह्या सर्व प्रक्रिया ग्रंथालयात एका विशिष्ट पद्धतीनुसार आणि नियमानुसार चालतात.

**ग्रंथोपार्जनः-** यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह समृद्ध करण्यासाठी सर्वात प्रथम ग्रंथालयासाठी कोणते साहित्य खरेदी करायचे, यांची निवड केली जाते. त्यानुसार ते साहित्य खरेदी केले जाते.

**१) equisition :** ग्रंथखरेदी संबंधात आलेल्या सूचना काळजीपूर्वक हाताळणे, उपार्जन विभागाचे पहिले काम आहे.

उपार्जन प्रक्रियेचे संगणकीकृत पद्धतीचे पुढीलप्रमाणे उपपद्धतीमध्ये विभाजन होते:

१. ग्रंथ खरेदी सूचना हाताळणी

२. ग्रंथ खरेदी पद्धती

३. देयक हाताळणी

४. वेगवेगळे डेटाबेस हाताळणे व अद्यावत ठेवणे

५. उपार्जन प्रक्रिया कमीत कमी वेळेत पूर्ण करता येते

**ग्रंथापस्कार : २) वर्गीकरण**

ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक ग्रंथाचे त्याच्या विषयानुसार वर्गीकरण करून त्याला एक स्थानांक किंवा मागणी अंक दिला जातो. स्थानांकामुळे त्या ग्रंथाचे कपाटावरील स्थान निश्चित होते. ग्रंथाचे हे स्थान किंवा ग्रंथसंग्रहाची कपाटावरील मांडणी विषयानुरूप होण्यासाठी ग्रंथालयात वर्गीकरण पद्धती वापरली जाते. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयात वर्गीकरण DDD - २३ नुसार करण्यात आले आहे. या प्रमाणबद्ध प्रणालीनुसारच पुस्तकांची तसेच वाचन साहित्याची मांडणी करण्यात आलेली आहे. संगणक वापरून वर्गीकरणाचे काम आणखी चांगल्याप्रकारे करणे शक्य झाले आहे. त्यामध्ये

१. ग्रंथालयात वर्गीकरणास लागणारे मार्गदर्शक तक्ते संगणकात साठवून ठेवणे.

२. संगणकाचे बुद्धीचातुर्य वापरून अचूक वर्गांक शोधणे

३. वेगवेगळ्या वर्गांकाचे संयुक्तीकरण करणे.

४. पुस्तकाच्या विषयानुरूप असलेले शोधशब्द संगणकातील शोधशब्दावलीतून शोधून काढून वर्गांक तयार करणे. इ. कामांचा समावेश होतो. तसेच संगणकीय वर्गीकरण पद्धतीमुळे वाचन साहित्य शोधण्यास वाचकाला तसेच सेवक वर्गाला सोपे झाले आहे.

**तालीकीकरण :** ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती देणारे साधन म्हणजे तालिका. ग्रंथालयातील तालिकेमुळे (Catalogue) ग्रंथाची उपलब्धता कळते. त्या ग्रंथाचे ग्रंथालयातील स्थानही समजते. ग्रंथालयातील तालिका (Library Catalogue) हे एक उपयुक्त साधन आहे. उपायोजकाला त्यांचा ग्रंथ मिळवून देण्यास तालिकेचा उपयोग होतो. तालिकाही विशिष्ट ग्रंथालयातील विशिष्ट ग्रंथालयापुरती मर्यादित असते. तालिकेचे काम प्राणभूत तालिका संहितेनुसार केले जाते. तालिकेमध्ये सविस्तर ग्रंथवर्णन केले आहे. या कामामध्ये मुख्य नोंदी, पूरक नोंद व अंशात्मक नोंदी तयार करणे. या प्रत्येक नोंदीतील माहिती ग्रंथातून शोधून काढणे. प्रत्येक विभागातील माहितीचे शीर्षक तयार करणे, ई दैनंदिन कामे यशवंतराव चव्हाण ग्रंथालयात तालिका तयार करताना केले जाते.

OPAC संगणकाच्या सहाय्याने शोधप्रक्रिया सोयीची व वाचकांच्या आवडीची होते. किंबहुना प्रतीप्राप्तीचा दर्जा उच्च असतो. शिवाय विविध प्रकारे शोध सोयी उपलब्ध होतात.

OPAC हा छोट्याशा लॅन स्वरुपात ग्रंथालयात व ग्रंथालयाबाहेर म्हणजे संस्थेच्या इतर विभागात उपलब्ध करून दिला आहे. वाचकांच्या दृष्टीने सोयीस्कर आहे. या स्वरुपात कॅटलॉग इंटरनेटवर उपलब्ध केलाआहे. संस्थेच्या बाहेरही तो आपल्या वाचकांसाठी इतर ग्रंथलयासाठी किंवा जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून पाहणे शक्य झाले आहे. सध्या आपल्या ग्रंथालयात WEBOPAC कार्यरत आहे.

WEBOPAC च्या माध्यमातून आपण वेगवेगळ्या साहित्यासंबधी शोध प्रक्रिया /प्रति प्राप्तीची सोय उपलब्ध करू शकतो.

उदा.

१. ग्रंथ, प्रबंध, कॉन्फरंस, प्रेसिडिंग, संदर्भग्रंथ तसेच सिरीयल इ.

२. नियतकालिके अ) सध्याच्या वर्षाची ब) पूर्वी पासूनची क) नियतकालिक संघतालिका

यशवंतराव
चव्हाण
प्रतिष्ठान,
मुंबई

# सुवर्णगाथा ५०

कायदेमंडळातील पाच दशके

## मा. खा. शरदचंद्रजी पवार

यांच्या विधीमंडळ व संसदीय कारकिर्दीची अविरत पन्नास वर्षे (१९६७-२०१७)

अभिव्यक्ती नव्या पिढीची!

# राज्यस्तरीय शालेय
# निबंध स्पर्धा

**मा. मुख्याध्यापक,**
सप्रेम नमस्कार

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. खा. शरदचंद्रजी पवार यांच्या संसदीय कारकिर्दीला दि. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. सलग पन्नास वर्षे राज्याच्या व देशाच्या कायदे मंडळात कार्य केलेले मा. खा. शरदचंद्रजी पवार हे एकमेव नेते ठरलेले आहेत. गेल्या पन्नास वर्षांत एकही दिवस असा नाही, की ते विधिमंडळ अथवा संसदेचे सदस्य नव्हते. या पाच दशकांमध्ये आदरणीय पवारसाहेबांच्या हस्ते अनेकविध निर्णय झाले, अनेक प्रकल्प उभे राहिले. सर्वसामान्य माणसाचा विकास केंद्रस्थानी मानून आदरणीय पवारसाहेबांनी सलग पन्नास वर्षे सातत्याने विविध कार्य सुरू ठेवले आहे. आदरणीय पवारसाहेबांचे हे कार्य व विचार महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याकरिता साहेबांच्या कायदे मंडळातील पन्नाशीच्या निमित्ताने **राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धा** आयोजित करण्याचे प्रस्तावित करीत आहोत. पुरोगामी व आधुनिक महाराष्ट्राचे स्वप्न पाहणाऱ्या आदरणीय पवारसाहेबांचे परिवर्तनवादी विचार सातत्याने त्यांच्या लेखनामधून, भाषणांमधून आणि त्यांनी केलेल्या विविध कार्यामधून आपणास दिसून येतात. भावी पिढीला ते विचार समजावेत, त्यांच्यात ते विचार रुजावेत व शालेय विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेऊन पुरोगामी महाराष्ट्राचे स्वप्न साकार करावे, याकरिता ही स्पर्धा आयोजित केली आहे.

या निमित्ताने शालेय विद्यार्थी आदरणीय पवारसाहेबांचे कार्य, त्यांनी घेतलेले निर्णय, त्यांनी केलेले लेखन, साहित्य व विचार अभ्यासून त्यांची मते आपल्या लिखाणातून मांडू शकतील. पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत निबंधाच्या माध्यमातून हातभार लावू शकतील. म्हणून 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई'तर्फे हा प्रयत्न!

आपल्या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वी करावी, ही नम्र विनंती.

आपली,



**सुप्रिया सुळे**
कार्याध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## स्पर्धेचे नियम व अटी

- मा. खासदार शरदचंद्रजी पवार यांच्या गेल्या पन्नास वर्षांच्या संसदीय कारकिर्दीवर आधारित पुस्तिकेचे आपल्या शाळेत वाटप करण्यात येईल. या पुस्तिकेच्या आधारे विद्यार्थ्यांना निबंध लिहिणे सोयीचे होईल.
  दि. १३ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर २०१६ दरम्यान सदर पुस्तिका आपल्या शाळेत उपलब्ध होईल.
- निबंध ८०० ते १,००० शब्दांचा असावा. विहित शब्दमर्यादेपेक्षा अधिक शब्दांच्या प्रवेशिका विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- निबंध मराठी, हिंदी, इंग्रजी किंवा उर्दू भाषेत व स्वहस्तलिखितच असावा.
- स्वहस्ताक्षरातील निबंध सुवाच्य अक्षरात असावा.
- निबंधामध्ये शुद्धलेखनाच्या चुका असू नयेत, तसेच निबंधामध्ये खाडाखोड असू नये.
- निबंधलेखनासाठी केवळ निळ्या अथवा काळ्या शाईचा वापर करण्यात यावा.
- निबंधलेखनासाठी कोरा कागद वापरण्यात यावा.
- निबंध पाठपोट लिहिलेला नसावा.
- निबंधासाठी नमूद करण्यात आलेल्या विषयांना अनुसरूनच लिखाण करण्यात यावे. विषयबाह्य लिखाणाचा विचार करण्यात येणार नाही.

## महत्त्वाच्या सूचना/अटी

- निबंधाच्या शेवटच्या पानावर रिकाम्या जागेत मा. मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व शाळेचा शिक्का असणे बंधनकारक आहे. त्याशिवाय प्रवेशिका ग्राह्य धरण्यात येणार नाही.
- स्पर्धेचा निकाल केवळ विजेत्या स्पर्धकांनाच पत्राद्वारे शाळेच्या पत्त्यावर कळविण्यात येईल.
- पाठविण्यात आलेल्या प्रवेशिकांमधील निबंध प्रसिद्ध/प्रकाशित करण्याचा अधिकार आयोजकांचा असेल. याबाबत भविष्यात स्पर्धकाला कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेता येणार नाही.

## निवड समिती

- निबंधाची तपासणी प्रतिष्ठानच्या वतीने नेमण्यात आलेल्या तज्ज्ञांच्या निवड समितीद्वारे करण्यात येईल.
- निकालाबाबत निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.
- स्पर्धेच्या नियम व अटींमध्ये ऐनवेळी बदल करण्याचा हक्क निवड समितीला असेल.

## स्पर्धेचे स्वरूप

संपूर्ण राज्यभरात शालेय विद्यार्थ्यांकरिता निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येईल. इयत्ता ८ वी ते १० वीतील विद्यार्थी या स्पर्धेत सहभाग नोंदवू शकतील. सदरील स्पर्धा ही मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू या चार भाषांमध्ये घेण्यात येईल. ही स्पर्धा जिल्हापातळीवर होईल. ८ डिसेंबर २०१६ ही निबंध पाठविण्याची शेवटची तारीख असेल. जिल्हास्तरीय फेरीत (३६ जिल्हे) प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ दोन स्पर्धकांची निवड करण्यात येईल. निबंध स्पर्धांचे पारितोषिक वितरण जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात संयुक्तरीत्या केले जाईल. जिल्हास्तरीय फेरीतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना बारामती येथे दि. १३, १४ व १५ जानेवारी २०१७ रोजी पारितोषिक वितरण कार्यक्रमाकरिता आमंत्रित करण्यात येईल. या विजेत्या स्पर्धकांना मा. खासदार शरदचंद्रजी पवार यांच्यासमवेत संवाद साधण्याची, तसेच बारामती येथील विविध संस्था पाहण्याची संधी उपलब्ध होईल.

### जिल्हास्तरीय फेरीसाठी विषय

- **भारतीय क्रीडाविश्वाचे पालक – मा. शरद पवार**
- **साहित्य, कलारसिक – मा. शरद पवार**
- **स्त्री–सक्षमीकरणाचे पुरस्कर्ते – मा. शरद पवार**
- **आधुनिक कृषिक्रांतीचे शिल्पकार – मा. शरद पवार**
- **सर्वोत्तम संसदपटू – मा. शरद पवार**

### पारितोषिके : जिल्हास्तरीय फेरी

• मराठी निबंध स्पर्धा • हिंदी निबंध स्पर्धा • इंग्रजी निबंध स्पर्धा • उर्दू निबंध स्पर्धा

- **प्रथम पारितोषिक : रुपये ३,०००**, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह
- **द्वितीय पारितोषिक : रुपये २,०००**, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह
- **तृतीय पारितोषिक : रुपये १,०००**, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह
- **उत्तेजनार्थ दोन पारितोषिके : प्रत्येकी रुपये ५००**, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह
- **प्रत्येक स्पर्धकास सहभागाचे प्रशस्तिपत्र**

### पारितोषिके : राज्यस्तरीय फेरी

• मराठी निबंध स्पर्धा • हिंदी निबंध स्पर्धा • इंग्रजी निबंध स्पर्धा • उर्दू निबंध स्पर्धा

- **प्रथम पारितोषिक : रुपये १०,०००**, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह
- **द्वितीय पारितोषिक : रुपये ७,०००**, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह
- **तृतीय पारितोषिक : रुपये ५,०००**, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह
- **उत्तेजनार्थ दोन पारितोषिके : प्रत्येकी रुपये ३,०००**, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह
- **प्रत्येक स्पर्धकास सहभागाचे प्रशस्तिपत्र**

- निबंध लिहून पूर्ण झाल्यांनतर शाळेत जमा करण्याची अंतिम तारिख ८ डिसेंबर २०१६ राहिल.
- स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाबाबत विजेत्यांना कळविण्यात येईल.
- जिल्हास्तरीय फेरीतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना बारामती येथे दि. १३, १४ व १५ जानेवारी २०१७ रोजी राज्यस्तरीय अंतिम स्पर्धेकरिता व पारितोषिक वितरण कार्यक्रमाकरिता आमंत्रित करण्यात येईल. या विजेत्या स्पर्धकांना मा. खासदार शरदचंद्रजी पवार यांच्यासमवेत संवाद साधण्याची, तसेच बारामती येथील विविध संस्था पाहण्याची संधी उपलब्ध होईल. संबंधित विद्यार्थी व त्याच्यासमवेत एक पालक अथवा शिक्षक यांचा प्रवासखर्च एस. टी. बसच्या दरानुसार आयोजकांकडून देण्यात येईल.
- सदर प्रवासखर्च विजेत्यांना समारंभस्थळी रोख रकमेच्या स्वरूपात देण्यात येईल. त्यासाठी एकेरी प्रवासाचे तिकीट व्यवस्थापनाकडे सादर करावे लागेल.
- जिल्हास्तरीय विजेत्यांना राज्यस्तरीय अंतिम फेरीचे विषय १५ दिवस आधी कळविण्यात येईल. सदरील विजेत्यांनी बारामती येथे येऊन अंतिम फेरीचे निबंध लिहायचे आहेत.

• **स्पर्धा समन्वयक : मा. महेश तपासे** • **स्पर्धा संयोजक : मा. संग्राम कोते (पाटील)**

## स्पर्धा केंद्र – संपर्क व्यक्ती

• मुंबई विभाग :

१) **बृहनमुंबई** : आदिती नलावडे : ९९८७०५२२४६, श्रद्धा भास्करन : ९६१९९०१०३०, मनीषा पवार : ९९६७२८२३३९.

२) मुंबई उपनगर : **उत्तर मध्य मुंबई** : पूजा देसाई : ९६१९१५६४९२.
**उत्तर पश्चिम मुंबई** : आदिती नलावडे : ९९८७०५२२४६.
**उत्तर मुंबई** : समरीन अन्सारी : ७६७८०४७८६९.
**ईशान्य मुंबई** : आदिती नलावडे : ९९८७०५२२४६.

• कोकण विभाग :

१) **ठाणे जिल्हा** : श्री. अभिजीत पवार : ९९८७२३१५७७, श्री. महेंद्र पाटील : ९७६३११५८५८, श्री. मयुर साळुंखे : ९१७२२९५५५५, मोनिका माधुरी : ९५०६२२२३२१, प्रियंका सोनार : ८१०८५२५०६४.
**नवी मुंबई** : श्री. सुरज पाटील : ९८२०१८१७३२.
**कल्याण-डोंबिवली** : अमृता नारकर : ९६१९०४३१४१.
**भिवंडी** : श्री. अनिल गायकवाड : ९८७०४१४९९९, छाया मसतुड : ९८२३८९९६६४. **उल्हासनगर** : श्री. संतोष पांडे : ९०२२२९२२२७.
**अंबरनाथ-बदलापूर** : श्री. अभिजीत कुरंजुळे : ८८८८४४३०००, प्रियांका दामले : ०७७२००८४४११
**मीरा-भाईंदर** : श्री. साजिद पटेल : ९८२०००३७७०, दीपाली पटेल : ९९२०३३८६१४.

२) **पालघर जिल्हा** : श्री. मिलिंद देशमुख : ९७६५३१३१३१.
**वसई-विरार** : श्री. अशफाक खान : ९८२३६१४७८६.

३) **रायगड जिल्हा** : श्री. उदय जवके : ९९७००५०९६१, मीनाक्षी रणपिसे : ८९८३५१५३०२, आदिती तटकरे : ९८३३१२५३२३.

४) **सिंधुदुर्ग** : श्री. विनोद जाधव : ९४२३८१८५६९, रंजिता वेनगुलकर : ९४०५२९९१३२.

५) **रत्नागिरी** : श्री. राजेंद्र आमरे : ९०२८९४७११४, श्री. विक्रांत जाधव : ९९५७३८१३७५, विशाखा बिरवटकर : ९६७३२८२८४२

• उत्तर महाराष्ट्र विभाग :

१) **अहमदनगर** : श्री. अभिषेक खंडागळे : ९८९०५६३६३३, अमृता कोळपकर : ९९२१६६२१०१

२) **नाशिक** : श्री. दीपक वाघ : ९०११४३५५५५, अमृता पवार : ९७६५००६०००, प्रियंका शर्मा : ८१८००७४७७७, प्रेरणा बालकुडे : ९८३२२६५१५०.

३) **धुळे** : श्री. यशवर्धन कदमबांडे : ९५४५७६३२६३.

४) **जळगाव** : श्री. रिकू चौधरी : ९७६६४५१७७७, श्री. रोहन सोनवणे : ९५४५२००००९, कल्पिता पाटील : ८६५७०६९६६६, डिंपल पाटील : ७०८३४२११८१.

५) **नंदुरबार** : श्री. बबलू कदमबांडे : ९६३७००६६०६, अर्चना गावित : ९१४५६३३४८४

• मराठवाडा विभाग :

१) **औरंगाबाद** : श्री. राहुल तायडे : ९८६०८२२१५५, श्री. फिरोज पठाण : ९७६७२६१५००, ज्योती पठाडे : ९७६३१४६१२४

२) **जालना** : पंकज बोराडे : ९४२३३३६९८२, योगिता चंद : ८६५७५३५१९४

३) **बीड** : श्री. नेताजी साळुंखे : ९४२२०८५९१८, प्रिया डोईफोडे : ९०७५८५३०००.

४) **परभणी** : श्री. सुमंत वाघ : ९१७५०१५१४५, श्री. सिद्धांत हाके : ९७६६९१४९९९.

५) **लातूर** : श्री. आशिष वाघमारे : ९१६८५३१०१०, श्री. विशाल विहिरे : ८००७३२१०१०

६) **नांदेड** : श्री. कैलास गोरठेकर : ९४०३९१५५५२, श्री. विश्वजीत पावडे : ९९२१४२३०००

७) **उस्मानाबाद** : श्री. राजसिंह निंबाळकर : ९४२२०६९८६४, सक्षणा सलगर : ८३०८५०८५४१, स्मिता लोंढे : ९९२१९५०२९०.

८) **हिंगोली** : श्री. सुजय देशमुख : ८६००६७६७६८, रत्ना महाले : ९४२०८८६६१३.

• पश्चिम महाराष्ट्र विभाग :

१) **कोल्हापूर** : श्री. अवधूत अपराध : ९९६०१५५५५७, अक्षता राऊत : ९८६०७०२८८५.

२) **सातारा** : श्री. अतुल शिंदे : ९७३०८२४६५६, श्री. गजेंद्र मुसळे : ९९७०५०६०२९, श्वेताली मोहिते : ९१७५८२९४३०.

३) **सांगली** : श्री. रणजित पाटील : ९५९५७९९००९, श्री. स्वप्नील जाधव : ९७६५५५२४४४, स्मिता पाटील : ९६७३२३९९९९, अर्चना कदम : ९८६०७०२८८५.

४) **पुणे** : श्री. ऋषी परदेशी : ७८७५९५९१३१, श्री. जितेंद्र इंगवले : ९८९०६२६४६८, श्री. सुनिल गव्हाणे : ९३७२३३३३५७, अर्चना घारे : ९५६११९३२२४, मनाली भिलारे : ९८२३५४३४१०, आश्विनी खाडे : ९९२२३७९२४१, वर्षा जगताप : ९९७००३७५१३

५) **सोलापूर** : श्री. अजिंक्यराणा पाटील : ८३०८८८८८८८, श्री. संकेत ढवळे : ९४२०६४३१११, सायली शेंडगे : ९८२३५७०२४४, यशोदा ढवळे : ७७०९१६१११

• विदर्भ विभाग :

१) **नागपूर** : श्री. शैलेंद्र तिवारी : ९८५०३३७२९३, श्री. राहुल कांबळे : ९५७९५६२२२१, ईरा खान : ९१७२१५७४७८.

२) **वर्धा** : श्री. अभिषेक वडतकर : ८०८७३६०४४९

३) **चंद्रपूर** : श्री. सुजित उपरे : ९९२२६४३७७७, मेघा रामगुंडे : ८६९८२०७७९६.

४) **गडचिरोली** : श्री. लिलाधर भराडकर : ९४०४५१९६८०/९८२२३७१५२०, पूर्वा दोंतुलवार : ९७६७६२५२७२

५) **भंडारा** : श्री. स्वप्नील नषिने : ९४०४२२९५६७

६) **गोंदिया** : श्री. केतन तुरकर : ९४२३११४४१४.

७) **अमरावती** : श्री. निखिल ठाकरे : ९५०३२५११११, श्री. आकाश हिवसे : ९८९०३७१९००/८९५६८९०७०८

८) **यवतमाळ** : श्री. राहुल कनारकर : ९८२२७८९२२२, मनीषा काटे : ९७६७९१८०७७.

९) **अकोला** : श्री. शैलेश बोदाडे : ८८८८०२७०१५, श्री. अविनाश चव्हाण : ९९२२५१८८४०, हर्षदा डोंगरे : ९८५०६६२९९२.

१०) **वाशिम** : श्री. प्रमोद चौधरी : ९१३०१११४४४

११) **बुलढाणा** : ॲड. संदीप मेहत्रे : ९५९५५८९१५५, प्रेरणा गुजर : ९४२२१२५८५९

यशवंतराव
चव्हाण
प्रतिष्ठान,
मुंबई

सुवर्णगाथा ५०

कायदेमंडळातील पाच दशके

**मा. खा. शरदचंद्रजी पवार**

यांच्या विधीमंडळ व संसदीय कारकिर्दीची अविरत पन्नास वर्षे (१९६७-२०१७)

अभिव्यक्ती
नव्या
पिढीची!

## राज्यस्तरीय महाविद्यालयीन

# वक्तृत्त्व स्पर्धा

सुवर्णगाथा ५० कायदेमंडळातील पाच दशके

**मा. प्राचार्य,**
सप्रेम नमस्कार

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. खा. शरदचंद्रजी पवार यांच्या संसदीय कारकिर्दीला दि. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. सलग पन्नास वर्षे राज्याच्या व देशाच्या कायदे मंडळात कार्य केलेले मा. खासदार शरदचंद्रजी पवार हे एकमेव नेते ठरलेले आहेत. मागील पन्नास वर्षांत एकही दिवस असा नाही, की ते विधिमंडळ अथवा संसदेचे सदस्य नव्हते. या पाच दशकांमध्ये आदरणीय पवारसाहेबांच्या हस्ते अनेकविध निर्णय झाले, अनेक प्रकल्प उभे राहिले, सर्वसामान्य माणसाचा विकास केंद्रस्थानी मानून आदरणीय पवारसाहेबांनी सलग पन्नास वर्षे सातत्याने विविध कार्य सुरू ठेवले आहे. आदरणीय पवारसाहेबांचे हे कार्य व विचार महाराष्ट्रातील तरुणांमध्ये पोहोचविण्याकरिता साहेबांच्या कायदे मंडळातील पन्नाशीच्या निमित्ताने राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याचे प्रस्तावित करीत आहोत. पुरोगामी व आधुनिक महाराष्ट्राचे स्वप्न पाहणाऱ्या आदरणीय पवारसाहेबांचे परिवर्तनवादी विचार सातत्याने त्यांच्या लेखनामधून, भाषणांमधून आणि त्यांनी केलेल्या विविध कार्यामधून आपणास दिसून येतात. भावी पिढीला ते विचार समजावेत, त्यांच्यात ते विचार रुजावेत व महाविद्यालयीन तरुणांनी त्यांचा आदर्श घेऊन पुरोगामी महाराष्ट्राचे स्वप्न साकार करावे, याकरिता ही स्पर्धा आयोजित केली आहे.

या निमित्ताने युवा पिढी आदरणीय पवारसाहेबांचे कार्य, त्यांनी घेतलेले निर्णय, त्यांनी केलेले लेखन, साहित्य व विचार अभ्यासून त्यांची मते आपल्या वक्तृत्वातून इतरांसमोर मांडू शकतील. पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत वक्तृत्वाच्या माध्यमातून हातभार लावू शकतील, म्हणून 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई'तर्फे हा प्रयत्न!

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपण विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, ही नम्र विनंती.

आपली,



**सुप्रिया सुळे**
कार्याध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## जिल्हास्तरीय प्राथमिक फेरी — नियमावली

- मा. खा. शरदचंद्रजी पवार यांच्या गेल्या पन्नास वर्षांच्या संसदीय कारकिर्दीवर आधारित पुस्तिकेचे आपल्या महाविद्यालयात वाटप करण्यात येईल. या पुस्तिकेच्या आधारे विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभाग नोंदविणे सोयीचे होईल.
  सदरील पुस्तिका आपल्या महाविद्यालयात उपलब्ध होईल.
- या स्पर्धेत स्पर्धकांना मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेत आपले विचार मांडता येतील. मात्र प्रत्येक भाषेकरिता वेगळा स्पर्धागट नसेल.
- सदरील स्पर्धा जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय अशा दोन फेऱ्यांमध्ये व कनिष्ठ महाविद्यालय (अकरावी व बारावी) व वरिष्ठ महाविद्यालय (पदवी व पदव्युत्तर) अशा दोन गटांमध्ये घेण्यात येईल.
- प्रत्येक स्पर्धकास आपले विचार मांडण्याकरिता ५ + २ = ७ मिनिटांचा कालावधी असेल.
- सदर स्पर्धेत केवळ त्याच जिल्ह्यातील कोणत्याही महाविद्यालयातील संबंधित गटातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतील.
- जिल्हास्तरीय फेरीत प्रथम, द्वितीय पारितोषिके मिळविणाऱ्या दोन विजेत्यांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात येईल.
- प्रत्येक महाविद्यालयातून जास्तीत जास्त दहा स्पर्धक सहभागी होऊ शकतील.
- या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्राचार्यांचे पत्र व विद्यार्थ्यांचे ओळखपत्र आवश्यक आहे.
- स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क आकारण्यात येणार नाही.
- स्पर्धकांना प्रवासखर्च व भोजनाचा खर्च स्वत: करावयाचा आहे.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
- स्पर्धा वेळेवर सुरू होईल व स्पर्धा सुरू असताना प्रत्येक स्पर्धकाने सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**पारितोषिकांचे स्वरूप**
- प्रथम : रुपये ५,००० • द्वितीय : रुपये ४,००० • तृतीय : रुपये ३,०००
- उत्तेजनार्थ (प्रत्येकी दोन) : रुपये २,००० • प्रत्येक स्पर्धकास सहभागाचे प्रशस्तिपत्र

## राज्यस्तरीय अंतिम फेरी — नियमावली

- सदरील स्पर्धेत स्पर्धकांना मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेत आपले विचार मांडता येतील. मात्र प्रत्येक भाषेकरिता वेगळा स्पर्धागट नसेल.
- राज्यस्तरीय अंतिम स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये होईल. पहिली फेरी उत्स्फूर्त भाषणाची असेल. मा. शरदचंद्रजी पवार यांच्या ५० वर्षांच्या संसदीय कारकिर्दीशी निगडित विषय स्पर्धकांना ऐनवेळी देण्यात येईल. स्पर्धकांनी कमीत कमी तीन मिनिटे आणि जास्तीत जास्त चार मिनिटांमध्ये आपले विचार उत्स्फूर्तपणे मांडावयाचे आहेत. तर दुसऱ्या फेरीत प्रत्येक स्पर्धकाने स्पर्धेसाठी दिलेल्या तीन विषयांपैकी एका विषयावर आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. प्रत्येक स्पर्धकास दुसऱ्या फेरीत आपले विचार मांडण्यासाठी
  ५ + २ = ७ मिनिटांचा कालावधी असेल.
- जिल्हा फेरीत निवड झालेल्या प्रथम व द्वितीय क्रमांकांच्या विजेत्यांनाच राज्यस्तरीय अंतिम फेरीसाठी पात्र समजण्यात येईल.
- राज्यस्तरीय अंतिम फेरीसाठी आलेल्या स्पर्धकांनी जिल्हास्तरीय फेरीत प्राप्त केलेल्या प्रशस्तिपत्राची सत्यप्रत, प्राचार्यांचे पत्र व स्वत:चे ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.
- स्पर्धकांच्या भोजन व निवासाची व्यवस्था संयोजकांकडून केली जाईल. प्रवासव्यवस्था स्पर्धकाने स्वत: करावयाची आहे.
- स्पर्धा वेळेवर सुरू होईल आणि प्रत्येक स्पर्धकाने स्पर्धा संपेपर्यंत सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.
- **स्पर्धेचे ठिकाण : बारामती, जि. पुणे • दिनांक १३, १४ व १५ जानेवारी २०१७**

**पारितोषिकांचे स्वरूप दोन्ही गटांकरिता**
- प्रथम : रुपये २५,००० • द्वितीय : रुपये १५,००० • तृतीय : रुपये १०,०००
- उत्तेजनार्थ दोन पारितोषिके : रुपये ५,००० • प्रत्येक स्पर्धकास सहभागाचे प्रशस्तिपत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## स्पर्धेचे स्वरूप

डिसेंबर २०१६ पासून सदर स्पर्धा जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय अशा दोन फेऱ्यांमध्ये व कनिष्ठ महाविद्यालय (अकरावी व बारावी) व वरिष्ठ महाविद्यालय (पदवी व पदव्युत्तर) अशा दोन गटांध्ये घेण्यात येईल. जिल्हास्तरीय फेरीत प्रथम, द्वितीय व तृतीय आणि उत्तेजनार्थ दोन स्पर्धकांची निवड करण्यात येईल. जिल्हास्तरीय स्पर्धेचे पारितोषिक वितरण त्याच दिवशी, म्हणजे ज्या दिवशी स्पर्धा असेल त्या दिवशी मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. जिल्हास्तरीय फेरीत क्रमांक मिळविलेल्या प्रथम व द्वितीय क्रमांकाचे स्पर्धक राज्यस्तरीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात येतील आणि बारामती येथे दि. १३, १४ व १५ जानेवारी २०१७ रोजी राज्यस्तरीय अंतिम फेरी आयोजित करण्यात येईल. या विजेत्या स्पर्धकांना मा. खासदार शरदचंद्रजी पवार यांच्याबरोबर संवाद साधण्याची, तसेच बारामती येथील विविध संस्था पाहण्याची संधी उपलब्ध होईल.

## जिल्हास्तरीय प्राथमिक फेरी

### कनिष्ठ महाविद्यालय गट
(इयत्ता ११ वी व १२ वी) स्पर्धेचे विषय

- कुशल समाज संघटक – मा. शरद पवार
- आर्थिक सुधारणांचे पुरस्कर्ते – मा. शरद पवार
- आपत्ती निवारणाचा आदर्श – मा. शरद पवार

### वरिष्ठ महाविद्यालय गट
(पदवी व पदव्युत्तर) स्पर्धेचे विषय

- दूरदृष्टीचे जाणते नेतृत्व – मा. शरद पवार
- संवादी व कार्यक्षम प्रशासक – मा. शरद पवार
- कृषिपूरक व्यवसायाचे धोरण व उभारणी करणारे नेतृत्व – मा. शरद पवार

## राज्यस्तरीय अंतिम फेरी

### कनिष्ठ महाविद्यालय गट (इयत्ता ११ वी व १२ वी) स्पर्धेचे विषय

- क्रांतिकारक महिला धोरणाचे शिल्पकार – मा. शरद पवार
- आधुनिक उदारमतवादी लोकशाही नेतृत्व – मा. शरद पवार
- सक्षम सहकारातून समृद्ध समाजनेतृत्व – मा. शरद पवार

### वरिष्ठ महाविद्यालय गट (पदवी व पदव्युत्तर) स्पर्धेचे विषय

- स्वयंपूर्ण भारत – अन्नधान्यवाढीचे दशक (२००४ ते २०१४) – मा. शरद पवार
- महाराष्ट्राच्या संस्थात्मक जीवनाचा आधारस्तंभ – मा. शरद पवार
- कायदे मंडळात (संसद/विधिमंडळ) अविरत ५० वर्षे कार्यरत नेतृत्व – मा. शरद पवार

• स्पर्धा समन्वयक : मा. महेश तपासे • स्पर्धा संयोजक : मा. आ. निरंजन डावखरे

## स्पर्धा केंद्र – संपर्क व्यक्ती

**• मुंबई विभाग :**

१)**दक्षिण मुंबई** : आदिती नलावडे : ९९८७०५२२४६,
श्रद्धा भास्करन : ९६१९९०१०३०

२) **दक्षिण मध्य मुंबई** : मनीषा पवार : ९९६७२८२३३९.

३) **उत्तर मध्य मुंबई** : पूजा देसाई : ९६१९१५६४९२.

४) **उत्तर पश्चिम मुंबई** : आदिती नलावडे : ९९८७०५२२४६.

५) **उत्तर मुंबई** : समरीन अन्सारी : ७६७८०४७८६९.

६) **ईशान्य मुंबई** : आदिती नलावडे : ९९८७०५२२४६.

**• कोकण विभाग :**

१) **ठाणे जिल्हा**
**ठाणे शहर** : श्री. मंदार केणी : ९८३३१८७७७७,
श्री. महेंद्र पाटील : ९७६३११५८५८
**भिवंडी** : श्री. अनिल गायकवाड : ९८७०४१४९९९.
**नवी मुंबई** : श्री. सुरज पाटील : ९८२०१८१७३२.

२) **पालघर जिल्हा** : श्री. मिलिंद देशमुख : ९७६५३१३१३१.
**अंबरनाथ-बदलापूर** : श्री. अभिजीत कुरंजुळे : ८८८८४४३०००.
**मीरा-भाईंदर** : श्री. साजिद पटेल : ९८२०००३७७०,
**वसई-विरार** : श्री. अशफाक खान : ९८२३६१४७८६.
**उल्हासनगर** : श्री. संतोष पांडे : ९०२२२९२२२७,

३) **रायगड जिल्हा** : श्री. उदय जवके : ९९७००५०९६१, मीनाक्षी रणपिसे : ८९८३५१५३०२, आदिती तटकरे : ९८३३१२५३२३.

४) **सिंधुदुर्ग** : श्री. विनोद जाधव : ९४२३८१८५६९, रंजिता वेनगुलकर : ९४०५२९९१३२.

५) **रत्नागिरी** : श्री. राजेंद्र आमरे : ९०२८९४७११४, विशाखा बिरवटकर : ९६७३२८२८४२.

**• उत्तर महाराष्ट्र विभाग :**

१) **अहमदनगर** : श्री. अभिजित खोसे : ९८९०६४९०३१, श्री. कपिल पवार : ९५५२००४७७७, अमृता कोळपकर : ९९२१६६२१०१.

२) **नाशिक शहर**: श्री. अंबादास खैरे : ९९२२९५७३०३, श्री. दिनेश ठाकरे : ९३७२७५०५५६, अमृता पवार : ९७६५००६०००, प्रियंका शर्मा : ८१८००७४७७७, प्रेरणा बालकुडे : ९८३२२६५१५०.
**नाशिक ग्रामीण** : श्री. सचिन पिंगळे : ९९६०५५८१११.

३) **धुळे** : श्री. कांतीलाल दाळवाले : ९८२२२६४३०३, श्री. सत्यजित सिसोदे : ९६७३०७७७७७.

४) **जळगाव** : श्री. रिकू चौधरी : ९७६६४५१७७७, कल्पिता पाटील : ८६५७०६९६६६, श्री. खलील अहमद खान : ९३७००३३७७७, श्री. योगेश देसले : ९९२३०५३८०६,डिंपल पाटील : ७०८३४२११८१.

५) **नंदुरबार** : श्री. सागर तांबोळी : ९९२३५४९१११, अर्चना गावित : ९१४५६३३४८४

**• मराठवाडा विभाग :**

१) **औरंगाबाद** : श्री. अभिषेक देशमुख : ९७६४१६४५५५, श्री. शैलेश पाटील चौधरी : ९६०४१८१८१९, ज्योती पठाडे : ९७६३१४६१२४.

२) **जालना** : पंकज बोराडे : ९४२३३३६९८२, योगिता चंद : ८६५७५३५११९४.

३) **बीड** : ॲड. शेख रफीक : ९४२३४७३७८६, प्रिया डोईफोडे : ९०७५८५३०००.

४) **परभणी** : श्री. गंगाधर जवंजाळ : ९८२३८४१०१०,
श्री. अली खान : ९८२३७७७५१४,

५) **लातूर** : श्री. विनोद रणसुंबे : ९८५०१६२३५०,
श्री. चंदन पाटील : ९९२३०७७७७१

६) **नांदेड** : श्री. फिरोज खान : ९८९०६३००१३,
श्री. वसंत सुगावे : ९४२२४३७७७१

७) **उस्मानाबाद** : श्री. प्रवीण यादव : ८८८८७४४३४३, सक्षणा सलगर : ८३०८५०८५४१, स्मिता लोंढे : ९९२१९५०२९०

८) **हिंगोली** : श्री. धोंडीराम पार्डीकर : ९४२१९४९९९९,
रत्ना महाले : ९४२०८८६६१३.

**• पश्चिम महाराष्ट्र विभाग :**

१) **कोल्हापूर** : श्री. अमोल माने : ८६२५८८४१२४, श्री. संजय पाटील : ९८२३०१३७८६. अक्षता राऊत : ९८६०७०२८८५.

२) **सातारा** : ॲड. नितीन भोसले : ९०९६१११३३,
श्वेताली मोहिते : ९१७५८२९४३०.

३) **सांगली जिल्हा** : श्री. राहुल पवार : ९९२३४९४१४१, स्मिता पाटील : ९६७३२३९९९९, अर्चना कदम : ९८६०७०२८८५.
सांगली ग्रामीण : श्री. शरद लाड : ९८६०६१६१६१

४) **पुणे शहर** : श्री. राकेश कामठे : ९०२८१७७७७७, अर्चना घारे : ९५६११९३२२४, मनाली भिलारे : ९८२३५४३४१०, आश्विनी खाडे : ९९२२३७९२४१, वर्षा जगताप : ९९७००३७५१३.
पुणे ग्रामीण : श्री. मानसिंग पाचुंदकर : ९४०३७७३४११.

५) **सोलापूर** : श्री. विनायक विटकर : ९९२१५४२२४४, श्री. रामेश्वर मासाळ : ९०११६२३९९९, सायली शेंडगे : ९८२३५७०२४४,
यशोदा ढवळे : ७७०९१६११११.

**• विदर्भ विभाग :**

१) **नागपूर** : श्री. आशिष नाईक : ९३७३१०००८७,
श्री. विलास झोडापे : ९७६३७१७७७१, ईरा खान : ९१७२१५७४७८.

२) **वर्धा : वर्धा** : श्री. संदीप किटे : ९३७३०५००५५ : श्री. अभिषेक वडतकर : ८०८७३६०४४९, मनीषा काटे : ९७६७९१८०७७.

३) **चंद्रपूर** : सतीश मिनगुलवार : ८५५२०२३०००, नितीन भट्टारकर : ९८२३४५६६३७, मेघा रामगुंडे : ८६९८२०७७९६

४) **गडचिरोली** : श्री. ऋषिकेश पापडकर : ९९७५९८१७५७,
पूर्वा दोंतुलवार : ९७६७६२५२७२

५) **भंडारा** : श्री. अभिषेक करीमोरे : ९४२२१०४२५६,

६) **गोंदिया** : श्री. किशोर तोरणे : ९४०४११६९९९.

७) **अमरावती** : श्री. गजानन रेवाळकर : ९३७०१५५८९५, श्री. ऋषीकेश वैद्य : ९८९०९५५९३३.

८) **यवतमाळ** : श्री. आशिष मानकर : ८०५५३४५९९९ मनीषा काटे : ९७६७९१८०७७.

९) **अकोला** : श्री. नितीन झापर्डे : ९१७५१७५१७५, श्री. शैलेश बोदाडे : ८८८८०२७०१५, हर्षदा डोंगरे : ९८५०६६२९९२, श्री. सचिन वाकोडे : ७५८८९६१०९१.

१०) **वाशिम** : श्री. अनंतकुमार काळे : ७७९८२४४१४१.

११) **बुलढाणा** : श्री. सुमित सरदार : ९०११२४२७७७,
प्रेरणा गुजर : ९४२२१२५८५९

३. ग्रंथेतर साहित्य.

४. अमुद्रित ग्रंथेतर साहित्य उदा. सी.डी., व्हिडियो कॅसेट

संगणकीकृत देवघेव पद्धती (Issue Return) देवघेव विभागात संगणकीकृत पद्धतीद्वारा ग्रंथ देणे व परत घेणे.

१. वाचक विचारणा करेल त्यावेळी वाचकांना ग्रंथाच्या उपलब्धतेबद्दल माहिती करून देणे. कपाटात असलेल्या संग्रहाबद्दल माहिती देणे. बांधणीसाठी पाठवलेल्या ग्रंथाबद्दल माहिती देणे.

२. प्रत्येक वाचकास त्याच्या नावावर असणाऱ्या पुस्तकांची माहिती. त्याने आरक्षित केलेल्या पुस्तकांची माहिती. परत करण्यास उशीर झालेल्या पुस्तकाबद्दल माहिती.

३. ज्या वाचकांना पुस्तके परत करण्यास उशीर झाला आहे त्यांना स्मरणपत्रे इ. मेलद्वारे पाठवणे.

४. नियमाप्रमाणे प्रत्येक वाचकास जी पुस्तकांची संख्या उपलब्ध केली आहे, त्यानुसार पुस्तकांची देवघेव करणे.

वेळोवेळी देवघेवीसंबंधी निवेदने ई-मेल द्वारे सामान्य वाचक वा विभागांना पाठविणे.

**नियतकालिका:** नियतकालिकेचे ठराविक कालावधीत प्रकाशित झालेले अंक ग्रंथालयास मिळताच हे अंक येण्याचे काम नियतकालिकांचे प्रकाशन बंद होईपर्यंत वर्षानुवर्षे चालू असते. त्यामध्ये नियतकालिके, वर्तमानपत्रे, वार्षिके, वार्षिक अहवाल, ॲडव्हान्सेस इन, प्रोग्रेस इन अशा नियत व अनियतकालिकांचा समावेश करण्यात आला आहे. वर्षाअखेर अशा नियतकालिकांचा संच पूर्ण झाल्यावर त्यांची बांधणी करून वाचकांना संदर्भाकरीता ठेवण्यात आला आहे.

उदा.

१. फक्त सूचीबद्ध स्वरुपात सारासकट व अभावी (डेटाबेस स्वरुपात)

पूर्ण स्वरुपात (Full Text) प्रत्येक जर्नल व प्रकाशन समूह

**स्कॅनिंग –** स्कॅनिंग प्रक्रियेत छापील पानाची डिजीटाईज्ड प्रतिमा तयार होते. म्हणजे तो पानाचा डिजिटल फोटोग्राफ असतो. यशवंतराव चव्हाण ग्रंथालयातील कामकाज पेपरलेसकडे वाटचाल करत आहे. यासाठी ग्रंथालयातील महत्वाची कागदपत्रेही स्कॅनिंग स्वरुपात उपलब्ध आहेत.

**बारकोडिंग –** बारकोडिंग ग्रंथालयात दाखल झालेल्या प्रत्येक पुस्तकाचे तसेच सदस्याचे ओळखपत्र बारकोड पद्धतीने तयार केले जात असल्यामुळे त्यात कोणत्याही प्रकारची त्रुटी होत नाही. या पद्धतीत प्रत्येक वाचन साहित्याला तसेच वाचकाला वेगवेगळा बारकोड असतो. त्यामुळे ग्रंथालयीन कामात दिरंगाई होत नाही आणि देवघेव पद्धती सोयीस्कर होते.

**न्यूज पेपर क्लिपिंग –** वर्तमानपत्रात येणाऱ्या महत्त्वाच्या बातम्या ह्या स्लिम प्रणालीवर संग्रहित करून त्या वाचकांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येतात.

**संदर्भ सेवा :** ग्रंथालये हि समाजाभिमुख असल्यामुळे वाचनसाहित्य उपयोजकाला सहजासहजी उपलब्ध करून देण्याकडे ग्रंथालयाचा कल आहे. संदर्भ सेवा मिळावी हा ग्रंथालयाचा उद्देश आहे. संगणकीकरणामुळे या गोष्टी जास्त सुकर होत गेल्या आहेत.

संदर्भ सेवा देण्यासाठी ग्रंथालयातील प्रत्येक कामावर लक्ष ठेवणे, वाचकांना वेगवेगळ्या प्रकारची माहिती देणे, उपाययोजकाला संदर्भ ग्रंथाच्या संदर्भात मार्गदर्शन करणे, उपयोजकाच्या मागण्या लक्षात घेऊन सूची तयार करणे, संदर्भ/वाचनसाहित्य जास्त प्रमाणात कसे उपलब्ध होऊ शकेल यावर लक्ष देणे. हे काम आपल्या ग्रंथालयात दैनंदिन होत असते.

❍ ❍ ❍

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

## कार्यवृत्त

महाराष्ट्रात आणि त्या अनुषंघाने भारतात, माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने १९९९ साली प्रबोधिनीची स्थापना केली. वेगवेगळे लहान मोठे संगणकीय अभ्यासक्रम करत करत आज प्रबोधिनीला १७ वर्षे पूर्ण झाली.

१७ वर्षांच्या कालावधीमध्ये प्रबोधिनीने चौफेर विकास केला आणि वेगवेगळे उपक्रम राबवले.

गेल्या वर्षात केलेल्या काही उपक्रमांचा आढावा पुढीलप्रमाणे :-

१० वी आणि १२ वी च्या विध्यार्थ्यांसाठी सराव परीक्षा घेतल्या गेल्या. विद्यार्थ्यांना ह्या परीक्षेचा खूप उपयोग झाला. त्यामुळे त्यांना बोर्डाच्या परीक्षेची कल्पना आली आणि त्यांना आगळा आत्मविश्वास पण आला.

ह्याच मुलांनी परीक्षा झाल्यावर संगणक शिकण्याची इच्छा दर्शविली. प्रबोधिनीने ह्या मुलांना MS-CIT ह्या MKCL च्या अभ्यासक्रमात सामील केले आणि त्यांच्या उन्हाळी सुट्टीचा पूर्ण फायदा करून दिला. ह्या अभ्यासक्रमामुळे एक सरकारमान्य प्रमाणपत्र ह्या मुलांच्या हाती आलेच, शिवाय त्यांना जे शिक्षण प्राप्त झाले, त्याला उपमा नाही. बरेचसे गरजू विद्यार्थी या ज्ञानाच्या जोरावर पैसे कमविण्यासाठी अर्धवेळ नोकरीचे साधन शोधू शकले.

अतिशय उत्कृष्ट प्रकारे शिकविल्या जाणाऱ्या या कोर्सचे कौतुक चारी दिशांना पसरल्यामुळे शाळकरी मुलांनीसुद्धा या अभ्यासक्रमात/कोर्ससाठी प्रवेश घेतला. शाळकरी मुलांनी MKCL च्या वेगवेगळ्या उपक्रमामध्येही भाग घेतला. उदा. IT Genius Exam etc.

ॲनिमेशनच्या वेगवेगळ्या अभ्यासक्रमांसाठी शिक्षकांचा आणि विद्यांर्थ्यांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळतो. आजवर मुलांनी केलेले ॲनिमेशन मधल्या डिप्लोमा कोर्सेसचा त्यांना उत्तम नोकरी मिळविण्यात उपयोग झाला. डिप्लोमाचे नाव Diploma In Advanced Computer (DC) ह्या कोर्समध्ये सरकारी प्रमाणपत्र आहेच त्याबरोबर ॲनिमेशनचे धडे, लाईट बोर्डचा वापर यावर भर दिला जातो.

PG Diploma In Advanced Computing (DC) हा C-DCचा सर्वोत्तम कोर्स /अभ्यासक्रम आहे.

ह्या कोर्सची प्रवेश प्रक्रिया मोठी आहे. त्यात महत्वाची प्रवेश परीक्षा पण आहे.त्यातून उत्तीर्ण विद्यार्थी PGDC कोर्समध्ये आंतरीत होतात.

PGDC फेब्रुवारी बॅचचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांच्यासाठी प्रबोधिनीने कॅम्पस कंपनीज उपलब्ध केल्या. IT क्षेत्रातील वेगवेगळ्या कंपन्या इथे येऊन मुलांचे काम व निकाल पाहून त्यांना हवी असलेली मुले निवडतात. अशा अनेक मुलांना प्रबोधिनीने नोकऱ्या दिल्या.

ह्या PGDC च्या विद्यार्थ्यांसाठी प्रबोधिनी, ६ महिन्याच्या कालावधित अनेक उपक्रम आयोजित करते. त्यामध्ये अभ्यासाव्यतिरीक्त सहल, सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल असते.

प्रत्येक ६ महिन्यात PGDC ची नवीन बॅच येते. ऑगस्ट २०१६ च्या बॅचमध्ये आपल्याकडे जवळपास १०० मुले आली आहेत. त्यांना उत्तम प्रकारचे तांत्रिक शिक्षण आपण देत आहोत. त्याचबरोबर ह्या मुलांना नोकरी मिळवण्याच्या दृष्टीकोनातून तयारी करून घेण्याची प्रक्रियादेखील सुरू आहे.

MKCL च्या विद्यमाने होणारे KLiC कोर्सेस आता जोम धरत आहेत. त्यांचा अधिकाधिक प्रसार व्हावा म्हणून प्रबोधिनी सतत कार्यरत आहे.

वरील अनेक उपक्रमांबरोबर प्रतिष्ठानने मान्यता दिलेले लहानमोठे असे अनेक माहिती तंत्रज्ञानाचे अभ्यासक्रम प्रबोधिनी चालवत असते. त्यासाठी अनेक गरजू विद्यार्थ्यांना फी सवलत दिली जाते. अपंग व दिव्यांग यांच्यासाठीही प्रतिष्ठानची शैक्षणिक तरतूद आहे.

अशा अनेक बाजूंनी प्रबोधिनी शैक्षणिक क्षेत्रात विकासाची वाटचाल करत आहे. आपल्या ह्या प्रबोधिनीमध्ये चालणाऱ्या उपक्रमांचा सर्वांनी वैयक्तिक प्रगतीसाठी जरूर उपयोग करून घ्यावा.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, कराड

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई चे अध्यक्ष माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र कराड 'विरंगुळा' या स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या वास्तूस भेट दिली. 'विरंगुळा' या मा. यशवंतरावांच्या निवास स्थानाच्या पाठीमागे उत्तर बाजूला १००'× ५०' या मापाची जागा आहे. (मोकळी). या ठिकाणी ७४' × ३०' या रिकाम्या जागेत विद्यार्थ्याच्या अभ्यासिकेसाठी व अन्य कारणासाठी इमारत बांधली आणि यासाठी मा. पवार साहेब यांनी पहाणी केली. मा. आ. बाळासाहेब पाटील, मा. कलाप्पाआण्णा आवाडे आणि स्थानिक नेते मंडळी यावेळी उपस्थित होती. नवीन इमारतीचा 'विरंगुळा' या इमारतीवर काय परिणाम होईल याची बारकाइने पाहणी करण्यात आली.

यशवंतरावजी चव्हाण साहेब यांची १०३ वी जयंती भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. १२ मार्चला सकाळी ८ वाजता सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टच्या इमारतीपासून सजविलेल्या रथावर स्व. यशवंतरावजींचा फोटो ठेवून यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स आणि सौ. वेणूताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व अन्य सेवक यांची भव्य पदयात्रा काढण्यात आली. सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट चे ट्रस्टी श्री. सुनील शामराव पवार यांनी नारळ वाढवून पदयात्रेचा शुभारंभ केला. सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट, विरंगुळा, विजय चौक, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (दत्त चौक), यशवंत हायस्कुल, आझाद चौक, नेहरू चौक, चावडी चौक, श्री. कृष्णामाई घाट ते प्रीतिसंगमावरील यशवंतरावांचे समाधी स्थळ असा मिरवणुकीचा मार्ग होता.

कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमावरील समाधी स्थळावरील प्रीतीसंगम बागेत शहरातील १२ हजार विद्यार्थ्यांचे सामुदायिक राष्ट्रगीताचे गायन स्व. आदरणीय पी.डी. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केले. या कार्यक्रमासाठी सिक्कीमचे राज्यपाल सन्माननीय श्रीनिवासजी पाटील, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आमदार बाळासाहेब पाटील व आमदार आनंदराव पाटील, मा. देवराज पाटील, मा. प्रकाशबापू पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

सन्माननीय राज्यपाल श्रीनिवासजी पाटील, मा. आमदार बाळासाहेब यांनी विरंगुळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट मधील यशवंतरावजी व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. स्व. यशवंतरावजींचे कार्य व कर्तव्य याबद्दल राज्यपाल महोदयांनी खूप माहिती सांगितली.

स्व. आदरणीय पी.डी. पाटील यांच्या समाधीवरही मा. राज्यपालांनी पुष्पचक्र वाहिले. कराड शहर व परिसरातील अनेक मान्यवर या कार्यक्रमासाठी आवर्जुन उपस्थित होते.

**सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांची ३३ वी पुण्यतिथी**

दि. १/६/२०१६ रोजी सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट मध्ये भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. संस्कृती मंच कराड, प्रस्तुत कल्याणी पांडे यांची नाट्यसंगीत व अभंगाची सुरेल मैफील सादर करण्यात आली. यासाठी साधसंगत तबला-विवेक

भालेराव, पखवाज-अविनाश भोगित, संवादिनी-अनंत जोशी, टाळ-रविंद्र पंडित या कलाकारांची साथ होती. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र कराडचे अध्यक्ष मा. आमदार बाळासाहेब पाटील त्याचप्रमाणे सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, कराड नगरपालिका अध्यक्ष नगरसेवक व मा. अशोकराव गणपतराव चव्हाण (मुंबई) आवर्जुन उपस्थित होते. कराड शहरात संगीतातले (शास्त्रीय) अनेक जाणकार आहेत. १ जूनच्या संगीत कार्यक्रमाला सर्वजण आवर्जून उपस्थित असतात. 'संस्कृती मंच, कराड' चे सक्रीय सहकार्य या कार्यक्रमासाठी असते. श्री. निवास ताम्हणकर व त्यांचे सर्व कुटुंबीय यांचे सहकार्य या कामासाठी (१ जूनच्या) नेहमीच असते. कराडातील नागरिकांना शास्त्रीय संगीताची मेजवानीच स्व. सौ. नेणूताईच्या पुण्यतिथी निमित्त प्रत्येक वर्षी १ जूनला दिली जाते. या वर्षी 'कल्याणी पांडे साळुंखे (मुंबई)' यांचा संस्मरणीय कार्यक्रम झाला.

### ती. विठामाता पुण्यतिथी १६ ऑगस्ट २०१६

ती. विठामाता या स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या मातोश्री. स्व. ती. विठामाता यांची पुण्यतिथी १८ ऑगस्टला प्रत्येक वर्षी आवर्जून साजरी केली जाते. स्वर्गीय यशवंतरावांची ती. विठामाताच्यावर फार मोठी श्रद्धा होती. स्व. यशवंतरावांच्या जडणघडणीत ती. विठामातांचा फार मोठा हात होता. स्व. यशवंतराव मातृभक्त होते. स्वर्गीय विठामातांच्या स्वरचित ओव्या संस्मरणीय आहेत. सौ. वेणूताईंनी या ओव्या लिहून ठेवल्या आहेत. प्रत्येक वर्षी १८ ऑगस्ट हा ती. विठामाताचा स्मृतिदिन विरंगुळा व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टमध्ये साजरा केला जातो. कराड विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. आमदार बाळासाहेब पाटील यांनी विरंगुळ्यात व सौ. वेणूताई स्मारकातील ति. विठामातांच्या फोटोला पुष्पहार समर्पित करून श्रद्धांजली वाहिली. श्री. मोहनराव डकरे (सचिव) व सर्व कर्मचारी वर्गानेही आपली आदरांजली वाहिली. विठामाता विद्यालयातही श्रद्धांजली वाहण्याचा भावपूर्ण कार्यक्रम झाला.

### सौ. सुप्रिया सुळे, कार्याध्यक्षा, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - सदिच्छा भेट

सौ. सुप्रियाताई सुळे, कार्याध्यक्षा, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी मंगळवार दि. १३/९/२०१६ ला दुपारी ३ वाजता मा. दत्ता बाळसराफ आणि सातारा जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते यांच्यासह यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या विरंगुळ्यातील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. स्व. यशवंरावजी चव्हाण साहेबांच्या जीवनातीत सर्व माहिती सौ. ताईना दाखविण्यात आली. स्व. यशवंतरावाच्या जीवनातील नानाविध साहित्य सौ. ताईंना दाखविण्यात आले.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, पुणे

## कार्यवृत्त

मा. राम प्रधान, विश्वस्त, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (मुंबई) यांनी आपल्या शासकीय सेवांमधील अनुभवांवर आधारित 'Beyond Expectations' हा ग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथाचे पुणे येथील प्रकाशन समारंभ, प्रतिष्ठानचे पुणे केंद्राचे अध्यक्ष मा. अजित निंबाळकर यांच्या पुढाकाराच्या व विश्वकर्मा प्रकाशनचे सहकार्याने एस.एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन सभागृहात दिनांक ३१ मे २०१६ रोजी पार पडला. या ग्रंथाचे प्रकाशन पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक श्री. अंकुश काकडे यांनी केले. विश्वकर्मा प्रकाशनचे श्री. भरत अगरवाल यांनी प्रास्ताविक करून आपले विचार मांडले. पुस्तकाचे परीक्षण प्रा. सुहास पळशीकर यांनी केले. सर्व वक्त्यांच्या विचारांचा परामर्श प्रा. राम प्रधान यांनी घेतला. त्यानंतर विश्वकर्मा प्रकाशनतर्फे आभारप्रदर्शन होऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

### कृषी व सहकार व्यासपीठ अहवाल

दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी बळीराजा मासिक व कृषी सहकार व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी व तत्संबंधीचे व ग्रामीण जनतेशी संबंधित विषयांवर पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली.

| तारीख | विषय | वक्ते |
|---|---|---|
| ०६/०२/२०१६ | दुष्काळात जनावरे जगवायची कशी? एक आव्हान | डॉ. वासुदेव सिधये |
| ०५/०३/२०१६ | संजीवन कृषी पद्धती | डॉ. हेमांगी जांभेकर |
| ०२/०४/२०१६ | शाश्वत शेतीसाठी पाणी व्यवस्थापन | कृषीभूषण डॉ. दत्तात्रय |
| ०७/०५/२०१६ | तरुणांपुढील कृषीमधील संधी | डॉ. मुकुंदराव गायकवाड, कुलगुरू, अरविंद कृषी मुक्त विद्यापीठ |
| ०४/०६/२०१६ | राष्ट्रीय अंडी समन्वय समिती | श्री. विश्वास भोसले<br>डॉ. पी. जी. पेडगांवकर |
| ०२/०७/२०१६ | अनुभव कथन | श्री. प्र. भा. भोसले |
| ०६/०८/२०१६ | ग्रामीण ग्रंथालये स्थापना व उपयोग | श्री. प्रदीप लोखंडे |
| ०३/०९/२०१६ | ऊस व साखर उद्योग-भविष्य | श्री. प्रकाश नाईकनवरे |

सहकार विभागाने गृहनिर्माण संस्थाबाबत जे आदर्श उपविधी प्रसिद्ध केले, त्याबाबत कृषी सहकार व्यासपीठामध्ये दिनांक १९ फेब्रुवारी २०१६ रोजी सखोल चर्चा करून आदर्श उपविधीमधील १४४ दुरुस्ता सुचविल्या व त्यानंतर सदर उपविधीत सुधारणा करण्यासाठी सहकार विभागाने समिती नेमली असल्याचे कळविले. दि. ०४/०७/२०१६ रोजी सहकार विभागाकडे प्रश्न उपस्थित केला असता मराठी भाषांतराव्यतिरिक्तच्या चुकांबाबत इंग्रजी प्रतीतील चुकांची त्यांनी चौकशी केली. त्यावेळी इंग्रजी प्रतीतही अनेक चुका असल्याचे त्यांना निदर्शनास आणून दिल्यावर सदर प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी एका महिन्यानंतर भेटण्याचे व प्रस्तावावर छाननी करून चर्चा करण्याचे मान्य केले. त्याबाबत सहकार विभागाकडे पाठपुरावा चालू आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानीव हस्तांतरण या विषयावर दिनांक २०.०५.२०१६ रोजी सखोल चर्चा झाली व यासंबंधी सहकार आयुक्त यांच्याशी समिती अहवालापूर्वी बाजू मांडता यावी यासाठी वेळ देण्याची विनंती केली. त्यावर शासनाने काही अटी गाळल्या असल्याचे समजते. दिनांक ०७.०६.२०१६ रोजी पुणे शहरातील सर्व शाळांमधून विद्यार्थ्यांकडून राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर याविषयी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करून सर्व शाळांना प्रतिष्ठानतर्फे ५ पुस्तके मोफत देण्यात आली. त्या स्पर्धा परीक्षेचा निकाल लागून पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

**कार्यशाळा व पुरस्कार प्रदान कार्यक्रम**

य.च.प्र. (कृवस) तर्फे शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये मनःशक्ती (लोणावळा) यांचेतर्फे ब्रह्मविद्या आरोग्यवर्धन, मनःशक्ती बुद्धिवर्धन व परीक्षा यशप्राप्ती या व्याख्यानांमार्फत सौ. शरयू गावडे, सौ. आसावरी अग्निहोत्री व सौ. मेघा राजणेकर यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सदरात १. राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर प्रा. श्री. वेदांत कुलकर्णी यांनी व्याख्यान दिले. २. श्री. श्रीकांत लक्ष्मी शंकर यांनी आपले भविष्य भारतीय संविधान या विषयावर व्याख्यान दिले. त्यानंतर श्री. अडसूळ (शिक्षक) व श्री. एस एन डांगे यांनी स्पर्धा परीक्षेतील पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. एकूण ६५ शाळांतील ३ हजार ३३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी द्विस्तरीय स्पर्धा परीक्षेस आलेल्या २०० विद्यार्थ्यांना त्याचप्रमाणे गुणवान विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ बक्षिसांची रक्कम व प्रमाणपत्रे श्री. अजित चांदेल, ॲड. वर्तक, श्री. डांगे (माजी मुख्याध्यापक) श्री. सूरज कुलकर्णी (शिक्षक), सौ. शाळीग्राम (शिक्षिका), श्री. वाडेकर (संपादक वनराई) श्री. शिंदे (वनराई) यांचे हस्ते देण्यात आली.

**स्पर्धा परीक्षा विजेते विद्यार्थी**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम पारितोषिक** | कु. अंकिता<br>वसंतराव वैद्य माध्य. विद्यालय | इयत्ता ९वी |
| | कु. कमोदे निखिल<br>मॉडर्न हायस्कूल, पुणे | इयत्ता ८वी |
| | कु. राजगुरू वैभवी<br>अभिनव विद्यालय, कर्वे रोड | इयत्ता ७वी |

| | | |
|---|---|---|
| **द्वितीय पारितोषिक** | कु. कवडे अंजली<br>विद्याविकास विद्यालय | इयत्ता ९वी |
| | कु. सप्रे संध्या<br>प्रेरणा माध्यमिक विद्यालय | इयत्ता ८वी |
| | कु. विनवडे साक्षी<br>ज्ञानप्रबोधिनी विद्यालय | इयत्ता ७वी |
| **तृतीय पारितोषिक** | कु. खोसे आर्यन<br>भारत इंग्लिश स्कूल | इयत्ता ९वी |
| | कु. चव्हाण अंकिता<br>लोणकर माध्यमिक विद्यालय | इयत्ता ८वी |
| | कु. शिखरे ज्योती<br>रेणुकादेवी माध्य. विद्यालय | इयत्ता ७वी |

याशिवाय उत्तेजनार्थ पारितोषिके रु. २००/- प्रमाणे देण्यात आली.

**इयत्ता ९वी**: कु. वीर शिया, कु. गरजे माधुरी, कु. जगताप अथर्व, कु. श्रावणी कांबळे, कु. गायकवाड समृद्धी, कु. शिंदे सोनल, कु. पाष्टे धनश्री

**इयत्ता ८वी**: कु. शेंडगे श्रद्धा, कु. सावंत साहिल, कु. राजे अमित, कु. गायकवाड प्रतीक, कु. रासकर अनिशा

**इयत्ता ७वी**: कु. चाबुकस्वार अनुजा, कु. निंबाळकर अक्षदा, कु. दहिफळे साक्षी, कु. सोमण संपदा, कु. डेंगळे संजल, कु. पुजारी प्राशिका, कु. आंग्रे समीक्षा

श्री. बी. एम. देशपांडे (निवृत्त उपनिबंधक) यांनी आभार मानले आणि कार्यक्रम संपन्न झाला.

त्याचप्रमाणे शिक्षक व विद्यार्थी यांचेकडून वरील विषयावर निबंध मागविण्यात आले होते. कर्नाटक व महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातून चांगला प्रतिसाद मिळून शिक्षकांचे १३३ निबंध प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचेही ९६ निबंध प्राप्त झाले असून निबंध तपासून व गुणानुक्रमानुसार बक्षिसपात्र शिक्षक व विद्यार्थ्यांचे निकाल प्राप्त झाले असून मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीचे दिवशी २५ नोव्हेंबर२०१६ रोजी बक्षिसवाटप कार्यक्रम होत आहे.

- आयुक्त, राज्य सहकारी प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त झालेल्या सहकारी संस्थांचे निवडणुकीसंबंधी दिनांक १८/०६/२०१६ रोजीचे पत्रावर झालेल्या चर्चेनुसार सूचनावजा पत्र निवडणूक प्राधिकरणास सादर करण्यात आले आहे. त्याचा पाठपुरावा सुरू आहे.
- दि रिअल इस्टेट (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट) अ‍ॅक्ट २०१६ या कायद्यातील तरतुदीनुसार व्यासपीठातर्फे दिनांक १७/०७/२०१६, १५/०९/२०१६ रोजी चर्चा होऊन त्या अनुषंगाने नियमावली तयार करण्याचे काम सुरू आहे.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, नागपूर

## कार्यवृत्त

**डॉ. किशोर रामचंद्र महाबळ यांना श्रद्धांजली– शनिवार दिनांक १३ फेब्रुवारी २०१६**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. किशोर रामचंद्र महाबळ यांचे दिनांक ६ फेब्रुवारी २०१६ शनिवार रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. प्राध्यापक व विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय असणारे महाबळ सर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नागपूर व राज्यशास्त्र अध्ययन केंद्र, नागपूर तसेच विद्यार्थ्यांच्या वतीने श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक, नागपूर येथे शनिवार दिनांक १३ फेब्रुवारी २०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता शोकसभेचे आयोजन करण्यात आले. शोकसभेला प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, प्राचार्य डॉ. वसंत रायपूरकर, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. अलका देशमुख, पदव्युत्तर विभागातील प्राध्यापक डॉ. मोहन काशीकर उपस्थित होते.

'Verse-a-Tile-2016' – इंग्रजी कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा – २९ फेब्रुवारी २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, उत्तर अंबाझरी मार्ग, शंकरन नगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

हा कवितासंग्रह प्रकाश सोहळा नागपूरचे विभागीय आयुक्त अनुप कुमार यांच्या शुभहस्ते व सेंटर पॉइंट संकुलच्या निवृत्त प्राचार्या मा. श्रीमती सुप्रिया चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे सदस्य मा. श्री. रमेश बोरकुटे हे अध्यक्षस्थानी होते.

**व्याख्यान**

**मंगळवार दिनांक १ मार्च २०१६**

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने मुंबईचे प्रसिद्ध पत्रकार आणि पाकिस्तान पीपल्स फोरम फॉर पीस अँड डेमॉक्रसी (पीआयपीएफपीडी) चे महासचिव मा. श्री. जतीन देसाई यांचे 'पाकिस्तान–भारत संबंध आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद' या विषयावर मंगळवार दिनांक १ मार्च, २०१६ रोजी सायंकाळी ५ वाजता राष्ट्रभाषा संकुल संवादकक्ष (कॉन्फरन्स हॉल), उत्तर अंबाझरी मार्ग, शंकरनगर चौक, नागपूर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

पाकिस्तानात अडकलेल्या भारतीय मच्छीमार आणि इतर कारणांनी पाकिस्तानात अटक झालेल्या भारतीय नागरिकांना सोडविण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे.

विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी हे प्रामुख्याने उपस्थित होते.

**कही–अनकही**

**दि. ६ मार्च २०१६**

विभागीय केंद्र, नागपूर यांच्या वतीने रविवार दि. ६ मार्च, २०१६ रोजी दुपारी ४.३० वाजता 'संवाद कक्ष, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर' येथे 'कही अनकही' या खुल्या चर्चेच्या श्रृंखलेअंतर्गत कवी मा. प्रा. मधुर पांडेय यांनी वरिष्ठ साहित्यकार डॉ. सागर खादीवाला यांच्यासोबत आपल्या आजवरच्या साहित्य–यात्रा तसेच साहित्यातील विविध पैलूंसंदर्भात श्रोत्यांना माहिती दिली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी चर्चेचे महत्त्व प्रतिपादित केले तसेच नवोदित लेखकांसाठी हे अतिशय महत्त्वाचे असल्याचे सांगितले. याप्रसंगी गायक एम ए कादर, किशन शर्मा,

मधुलिका पांडेय, माधुरी राऊलकर, डॉ. करुणा उमरे, राजेंद्र राज, रीमा चड्ढा, पूनम तिवारी, अविनाश बागडे, वसुंधरा राय इत्यादि साहित्यकार उपस्थित होते.

**स्व. यशवंतराव चव्हाण जयंती**

**दि. १२ मार्च, २०१६**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त शनिवार दिनांक १२ मार्च २०१६ रोजी वैदर्भी लोककलावंत मेळावा आयोजित करण्यात आला.

मेळाव्याचे उद्घाटन सकाळी १०:०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, उत्तर अंबाझरी मार्ग, शंकरन नगर चौक, नागपूर येथे मा. श्री. अजय आंबेकर, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते मा. डॉ. गिरीश गांधी, अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध लेखक व वक्ता मा. डॉ. अशोक राणा उपस्थित होते.

विदर्भातील लोककलांचे जतन व्हावे, प्रोत्साहन मिळावे व विद्यमान लोककलावंतांचे प्रश्न सुटावेत या उद्देशाने, उद्घाटनानंतर नागपूर विभागातील खडी गंमत, दंडार, गोंधळ व भारूड या लोककलांच्या पारंपरिक कलावंतांचे मनोगत, प्रकट मुलाखती व सादरीकरण झाले. या सत्रांमध्ये विदर्भ लोकशाहीर परिषदेचे अध्यक्ष मा. श्री. धर्मदास भिवगडे विशेषत्वाने उपस्थित होते. १५०च्या वर लोककलाकारांनी यात सहभाग नोंदविला.

**स्वर्गीय नाना रेटर यांची जन्मशताब्दी**

**रविवार २० मार्च, २०१६**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नकलाकार व भावनाट्य लेखक स्व. नाना रेटर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष! या निमित्ताने नागपूर विदर्भातील सांस्कृतिक जीवन समृद्ध करणाऱ्या नानांच्या कार्याच्या या निमित्ताने गौरव व्हावा व त्यांच्याविषयीच्या आठवणींना उजाळा मिळावा म्हणून रविवार दिनांक २० मार्च, २०१६ सायंकाळी ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, उत्तर अंबाझरी मार्ग, शंकरन नगर चौक, नागपूर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी द.म.क्षे. सांस्कृतिक केंद्र, नागपूरचे संचालक मा. डॉ. पियुष कुमार हे होते व अतिथी म्हणून महाराष्ट्र टाइम्सचे विशेष प्रतिनिधी मा. श्री. अविनाश महालक्ष्मे उपस्थित होते. तसेच मा. श्री. राजाभाऊ चिटणीस व मा. दिलीप अलोणे, वणी यांचे विशेष सादरीकरण झाले.

**स्त्रीवाद आणि मराठी साहित्य चर्चासत्र**

**रविवार दिनांक २७ मार्च, २०१६**

विदर्भ साहित्य संघ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर आणि स्नातकोत्तर मराठी विभाग माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २७ मार्च २०१६ रोजी सकाळी ८.३० ते ५.०० या कालावधीत 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन विदर्भ साहित्य संघाचे सांस्कृतिक संकुल, चौथा मजला, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर येथे करण्यात आले. सकाळी ९.१५ ला स्त्रीवाद साहित्य प्रदर्शनीच्या

उद्घाटनानंतर ९.३० ते ११.०० या कालावधीत होणाऱ्या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात चर्चासत्राच्या अध्यक्षा सुप्रसिद्ध स्त्री साहित्याच्या अभ्यासक अश्विनी धोंगडे, पुणे, उद्घाटक वसंत आबाजी डहाके आणि प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध समाजसेविका सीमा साखरे उपस्थित होत्या.

उद्घाटन समारंभानंतर ११.०० ते १२.३० या कालावधीत डॉ. शैलेंद्र लेंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या 'स्त्रीवाद आणि मराठी कथा कादंबरी' ह्या पहिल्या सत्रात वंदना महाजन, मुंबई व नंदकुमार मोरे, कोल्हापूर हे अभ्यासक सहभागी झाले.

दु. १.३० ते ३.०० या कालावधीत अंजली कुलकर्णी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या दुसऱ्या सत्रात रणधीर शिंदे, कोल्हापूर आणि अलका गायकवाड, अमरावती हे अभ्यासक सहभागी झाले.

दु. ३.३० ते ५.०० या कालावधीत होणाऱ्या समारोपास विदर्भ साहित्य संघाचे श्री. वामन तेलंग यांची प्रमुख उपस्थिती होती.

**चिंतनसत्रः भयमुक्त अभिव्यक्ती**

**मंगळवार दि. ५ एप्रिल, २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने मंगळवार दि. ५ एप्रिल २०१६ रोजी सायं ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे भयमुक्त अभिव्यक्ती या चिंतनसत्राचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी मा. डॉ. यशवंत मनोहर, मा. डॉ. हरिभाऊ केदार, मा. डॉ. हरिभाऊ केदार, मा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, मा. श्री. चंद्रकांत वानखेडे, मा. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, मा. श्री. नागेश चौधरी, मा. श्रीमती लीलाताई चितळे, मा. डॉ. श्रीमती सीमा साखरे, मा. श्री. वीरा साथीदार, मा. श्री. उमेशबाबू चौबे, मा. डॉ. हरीश धुरट, मा. श्री. हरीश देशमुख, मा. श्री. विलास भोंगाडे या मान्यवरांनी आपले विचार प्रकट केले आणि चर्चा घडवून आणली. या विचारमंथनला श्रोत्यांनी भरभरून दाद दिली.

**खुले कविसंमेलन**

**गुरुवार दिनांक ७ एप्रिल २०१६**

विभागीय केंद्र, नागपूर व स्व. कवयित्री सौ. अपर्णा सहस्त्रबुद्धे स्मृती समिती यांच्या संयुक्त वतीने गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला सत्कार व खुल्या कविसंमेलनाचे आयोजन दि. ७ एप्रिल २०१६ रोजी सायं ३.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे मा. श्री. प्रसन्न शेंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन खापरी येथील निवासी डॉ. जितेश चव्हाण यांचा व श्री. मोहन परमा कोटी यांचा सत्कार मा. मेजर हेमंत जकाते यांच्या हस्ते, समाजसेविका मा. इंदुताई पिसे यांचा सत्कार मा. सुलभाताई जकाते यांच्या हस्ते, तर मा. श्री. राजेश पाणुरकर यांचा सत्कार डॉ. देवीदास इंदापवार यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या कविसंमेलनाप्रसंगी उपस्थित कवींनी आपल्या उत्कृष्ट कविता सादर केल्या.

**चार पुस्तकांचे प्रकाशन**

**शुक्रवार दि. ८ एप्रिल, २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सौ. मनीषा साधू लिखित 'पुरुषांच्या देशात' सौदी अरेबियावर आधारित (कादंबरी), 'सटवाई' व 'मुक्त मी' हे मराठी कवितासंग्रह व 'साँवला चाँद' हिंदी कवितासंग्रह या चार पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन शुक्रवार दि. ८ एप्रिल २०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता संवादकक्ष (कॉन्फरन्स हॉल), राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

हा प्रकाशन सोहळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते व त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ कादंबरीकार मा. डॉ. रवींद्र शोभणे यांनी पुरुषांच्या देशात या कादंबरीवर भाष्य केले तर मा. श्री. अजय देशपांडे यांनी कवितासंग्रहावर आपले विचार प्रकट केले.

**१ जून, २०१६ ते ३० सप्टेंबर, २०१६**

- ''दलित गीतिकाव्य'' – लोकार्पण समारंभ

विभागीय केंद्र, नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूरच्या संयुक्त वतीने मराठी काव्य क्षेत्रात आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटविणाऱ्या दलित कवींच्या गीत-काव्याचा चिकित्सक अभ्यास डॉ. शालिनी तेलरांधे यांच्या 'दलित गीतकाव्य' या ग्रंथात करण्यात आला. एका अलक्षित विषयावरील या मौलिक ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन बुधवार दि. ८ जून, २०१६ रोजी सायं. ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

- **डॉ. शशिकला वंजारी – सत्कार समारंभ**

मा. डॉ. शशीकला वंजारी यांची मुंबई येथील एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद, नागपूरच्या वतीने सत्कार समारोहाचे आयोजन रविवार दि. १० जुलै, २०१६ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक नागपूर येथे करण्यात आले.

हा सत्कार सोहळा संस्कृतच्या अभ्यासक व सामाजिक क्षेत्रातील प्रसिद्ध अग्रणी मा. डॉ. रुपाताई बोधी यांच्या शुभहस्ते व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. सिद्धार्थ विनायक काणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु मा. डॉ. शरद निंबाळकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

- **मुक्तचर्चा–आजच्या शिक्षण व्यवस्थेतील अपप्रवृत्तीला जबाबदार कोण?**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने शिक्षक आमदार श्री. नागो गाणार यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. ३० जुलै, २०१६ रोजी सायं. ५.३० वाजता कीर्तनकेसरी भाऊसाहेब शेवाळकर सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक नागपूर येथे 'आजच्या शिक्षणव्यवस्थेतील अपप्रवृत्तीला जबाबदार कोण?' या विषयावरील मुक्त चर्चेचे आयोजन करण्यात आले.

- **'डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार सोहळा–२०१६'**

विदर्भातील ज्येष्ठ कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दरवर्षी देण्यात पुरस्कार यंदा 'अज्ञातवासातील कवी' म्हणून प्रसिद्धीपराङ्मुख असलेले, उत्तमोत्तम काव्यरचना करणारे ज्येष्ठ कवी ॲड् सुरेश आजनकर, वरुड, जि.

अमरावती यांना सुलभाताईंच्या स्मृतिदिनी रविवार दि. ३१ जुलै, २०१६ रोजी सायं ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक नागपूर येथे कृतज्ञतापूर्वक प्रदान करण्यात आला.

हा सत्कार सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश मा. श्री. किशोर रोही यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ कवी मा. श्री. किशोर पाठक (नाशिक)हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्याच अध्यक्षतेखाली डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती बहुभाषिक कविसंमेलन झाले. याप्रसंगी हिंदी, उर्दू व मराठीतील मान्यवर कवी डॉ. सागर खादीवाला (हिंदी), जमील अंसारी (हिंदी), डॉ. मोहम्मद असदुल्लाह (उर्दू), तौहीदुल हक (उर्दू), मनीषा साधू (मराठी), लोकनाथ यशवंत (मराठी) सहभागी झाले.

- **'आजचा सुधारक'– परिसंवाद व मतभिन्नता विशेषांकाचे प्रकाशन – दि. २१ ऑगस्ट २०१६,**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि 'आजचा सुधारक' यांच्या संयुक्त विद्यमाने 'आजचा सुधारक'च्या 'मतभिन्नता' विशेषांकाचे प्रकाशन व 'आजच्या भारतीय समाजात वेगळे मत मांडण्याचा अवकाश आक्रसत चालला आहे का?' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ख्यातनाम अर्थतज्ज्ञ प्रा. श्रीनिवास खांदेवाले होते. वक्ते ज्येष्ठ संपादक श्री. ल. त्र्यं. जोशी, तरुण पत्रकार श्री. जयदीप हर्डीकर, यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि. २१ ऑगस्ट २०१६, सायं. ५:३० वाजता श्री. बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

- **प्रकाशन समारंभ – रविवार दि. ४ सप्टेंबर २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सुप्रसिद्ध कवयित्री सुचित्रा कातरकर यांच्या 'तुमबिन तुझ्याविना' व स्व. मधुकर कातरकर यांच्यावरील हिंदी-मराठी हायकु संग्रह, 'सांजसावळी' (काव्यसंग्रह) भाग-२ या दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन रविवार दि. ४ सप्टेंबर २०१६ रोजी सायं ५:३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ समीक्षक व विचारवंत मा. डॉ. अक्षयकुमार काळे व ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. बाळासाहेब कुलकर्णी हे प्रमुख वक्ते म्हणून तसेच ज्येष्ठ साहित्यिक मा. श्री. श्यामकांत कुळकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमात स्वर साधनाचे अध्यक्ष मा. श्री. श्याम देशपांडे व ज्येष्ठ निवेदक मा. श्री. प्रकाश एदलाबादकर, यांचा सत्कार करण्यात आला. प्रकाशनानंतर कविवर्य भा. रा. तांबे यांच्या निवडक सुमधुर गीतांवर आधारीत कार्यक्रम 'मधुघट' चे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाची संकल्पना सुचित्रा कातरकर, निर्मिती प्रा. पद्मजा सिन्हा, निवेदन श्री. प्रकाश एदलाबादकर यांचे होते. याप्रसंगी अश्विनी लुले, विजय देशपांडे, प्रा. पद्मजा सिन्हा, ऋचा येनुरकर, निसर्गराज आणि सुचित्रा कातरकर हे गायक कलाकार तसेच विजय देशपांडे, परिमल जोशी विनय ढोक, स्मिता देशपांडे हे वादक कलाकार उपस्थित होते.

- **सभेचे आयोजन – सोमवार दि. १२ सप्टेंबर, २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नागपूर विभागाच्या वतीने केंद्राच्या कार्यक्रमासंदर्भात तसेच पुढील उपक्रमाच्या संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी सोमवार दि. १२ सप्टेंबर, २०१६ रोजी सायं ५.०० वाजता विभागीय केंद, कार्यालय, राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक, नागपूर येथे मा. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले.

- **'विंदांची त्रिपदी' – दि. १६ व १७ सप्टेंबर, २०१६**

नव्या पिढीत काव्याची गोडी निर्माण व्हावी. जगण्याची उमेद आणि नवी दृष्टी मिळावी, रसिकांना मराठीतील ज्ञानपीठ पुरस्कृत कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेतील तत्त्वचिंतन, जीवनदृष्टी कळावी आणि रसग्रहण अधिक चांगले व्हावे या उद्देशाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद, नागपूरच्या वतीने दि. १६ व १७ सप्टेंबर, २०१६ रोजी 'विंदांची त्रिपदी' या विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विंदांच्या कवितेतील 'त्रिपदी' आनंद करंदीकर आणि सरिता आवाड वाचन-विवेचनाच्या व द्रकश्राव्य माध्यमातून सादर करण्यात आल्या.

दि. १६ सप्टेंबर, २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या सहकार्याने अमरावती मार्गावरील विद्यापीठ परिसरातील 'ग्रामगीता भवन' येथे तसेच दि. १७ सप्टेंबर, २०१६ रोजी सकाळभ ९.३० वाजता कॉग्रेसनगर मधील धनवटे महाविद्यालतातील जनसंवाद विभागाच्या वतीने सेमिनार हॉलमध्ये 'विंदांची त्रिपदी' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

- **सत्कार समारंभ – दि. २८ सप्टेंबर, २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (सेन्सॉर बोर्ड) चे सदस्य म्हणून नागपुरातील तीन व्यक्तिंची निवड झाल्याबद्दल मा. सौ. माधुरी अशिरगडे, मा. सौ. प्रगती मानकर व मा. श्री. संजय भाकरे यांच्या सत्काराचा कार्यक्रम बुधवार दि. २८ सप्टेंबर, २०१६ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं ५.३० वाजता आयोजित करण्यात आला.

हा सत्कार समारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेचे अध्यक्ष मा. श्री. प्रफुल्ल फरकसे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे ज्येष्ठ समीक्षक मा. डॉ. अक्षयकुमार काळे उपस्थित होते.

- **स्व. भा. ल. भोळे स्मृती व्याख्यानमाला – दि. ३० सप्टेंबर, २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर, आधार बहुउद्देशीय संस्था, नागपूर व महात्मा गांधी स्मारक निधीच्या संयुक्त विद्यमाने 'विवेकवादी जगणे खरंच इतके कठीण आहे का?' या विषयावर अंधश्रद्धा निर्मूलन समिती, दापोलीचे कार्यकर्ते मा. मुक्ता दाभोळकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन दि. ३० सप्टेंबर, २०१६ रोजी सायं ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी अध्यक्षस्थानी होते.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, कोकण, रत्नागिरी

## कार्यवृत्त

● कोकण विभागीय केंद्राच्या वतीने दि. ५ फेब्रुवारी २०१६ रोजी करबुडे येथे विद्यार्थ्यांसाठी 'संवाद कौशल्ये' या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ११ वी, १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे ३५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

भारत शिक्षण मंडळ, रत्नागिरीचे कार्याध्यक्ष मा. श्री. विनायक हातखंबकर मार्गदर्शन करताना म्हणाले, 'वादापेक्षा सुसंवादाने प्रश्न सुटतात. याकरिता संवाद आवश्यक आहे. तो करताना परिस्थिती, वातावरण व प्रत्यक्ष समोरची व्यक्ती यांचा समन्वय राखल्यास संवादामुळे बरेच काही आपण साध्य करू शकतो. संवादांचे कंगोरे आपण अभ्यासले पाहिजेत. उत्कृष्ट संवादकौशल्याने जगातल्या बऱ्याच समस्या दूर होऊ शकतात.'

● कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. ६ फेब्रुवारी २०१६ रोजी हातखंबा येथील गुरूवर्य अ.आ. देसाई माध्यमिक विद्यामंदिरात इ. पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांकरिता 'गुड थॉट्स इन इंग्लिश' या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

माध्यमिक विद्यालय, हातखंबा येथील पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना नैतिकमूल्ये व संस्कार शिक्षण यासाठी व तेही इंग्रजी भाषा समृद्ध करण्यासाठी 'गुड थॉटस्' हा प्रकल्प निवडला व प्रत्यक्षात प्रतिष्ठानचे सदस्य कृ. आ. पाटील यांनी अनेक वेचक गुड थॉट्स प्रत्यक्षात चर्चेतून लिहून घेतले. मुख्याध्यापक शिवाजी पाटील यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे राबविलेला हा अभिनव उपक्रम संस्कार व शिक्षण समृद्ध करणारा असल्याचे सांगितले.

● कोकण विभागीय केंद्राच्या वतीने दि. ९ फेब्रुवारी २०१६ रोजी हातखंबा येथील इ. ११ च्या विद्यार्थ्यांसाठी श्री. संजीव बर्वे यांचे 'कारगिल विजय' या विषयावर माहितीपर चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री. बर्वे यांनी कारगिल येथील आठवणी विद्यार्थ्यांना सांगितल्या. कारगिल येथे गेल्यानंतर जवानांचे कपडे, त्यांनी युद्धाचे वेळी वापरलेली हत्यारे पाहून कसे भारावून जायला होते हे सांगितले. जवानांचे जीवन खूपच खडतर आहे. आपल्या जीवाची बाजी लावून ते देशाचे रक्षण करताहेत म्हणून आपण सुखात जगत आहोत. त्यांच्याविषयी आपण नेहमी आदर बाळगला पाहिजे असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

● 'निमिड' व कोकण विभागीय केंद्रा'च्या वतीने १५ फेब्रुवारी २०१६ रोजी फोंडा येथील वाणिज्य कला महाविद्यालयात वर्तनशास्त्र/व्यवस्थापन शास्त्र, व्यवहार शास्त्र या विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण २५० विद्यार्थी व महाविद्यालयातील शिक्षक वर्ग सहभागी झाले होते. तसेच दि. १६ फेब्रुवारी रोजी सिंधुदूर्ग जिल्ह्यातील फोंडा येथील ५० महिलांना एकत्र घेऊन बचतगटाची स्थापना केली. या महिलांना लोकमंगल प्रतिष्ठानच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले.

५. कला महाविद्यालय, सावर्डे आणि विभागीय केंद्र कोकण यांच्या संयुक्त विद्यमाने एम. बी. ए. कॉलेज सावर्डे येथे दि. १८ फेब्रुवारी २०१६ रोजी शिक्षणकट्टा कार्यक्रमातील 'सामाजिक कार्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग' या विषयावर एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. एम.बी.ए. कॉलेजचे एच. ओ. डी. प्रा. अजय तालुकदार यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, रत्नागिरी, जिल्हा समितीचे अध्यक्ष मा. प्रकाश काणे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच एक जागृत नागरिक म्हणून सामाजिक कार्यात रस घ्यायलाच हवा. आजची तरुण पिढीच उद्याचे भवितव्य आहे. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याच्या विविध कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा नेहमीच पाठिंबा मिळेल,' असे आश्वासन दिले.

मा. युगंधरा राजेशिर्के यांनी विद्यार्थ्यांशी याच विषयावर सविस्तर चर्चा करून यापुढे आपल्याला कसे कार्य करावयास हवे, याबाबतचा सर्व आराखडा मांडला. त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक विषयांवर आपण काय करू शकतो याची जाणीव करून दिली. 'सामाजिक कार्य करीत असताना आपण कशाचीही अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. किंबहुना समाज सेवेचे कार्य आपलेच आहे आणि यातून आपल्याला वैयक्तिक समाधान लाभणे महत्त्वाचे असते, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली.

विद्यार्थ्यांनी देखील वेगवेगळे मुद्दे मान्यवरांसमोर प्रस्तुत केले. या कार्यक्रमासाठी कला महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच एम.बी.ए. कॉलेजचे कर्मचारी उपस्थित होते. प्राध्यापिका दिप्ती शेंबेकर यांनी सूत्रसंचलन केले.

● कोकण विभागीय समिती, रत्नागिरी व वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ फेब्रुवारी २०१६ रोजी लोकसंवाद कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख अतिथी ग्रंथपाल बाळकृष्ण पाठक यांचा 'महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व आजचे शिक्षण' या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम घेण्यात आला.

मोफत प्राथमिक शिक्षण, सक्तीचे शिक्षण, गुणवंताना - दुर्बलांना अर्थसहाय्य, शिक्षणाच्या समान संधी, संशोधनाला चालना, कला कौशल्यावर आधारित व्यावसायिक शिक्षण, राखीव जागा इ. विषयांवर उपस्थितांमध्ये चर्चा घडवून आणण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना चालना मिळण्यासाठी लोकसंवाद हा कार्यक्रम उपयुक्त असल्याचे मत पर्यवेक्षक प्रा. एम. एस. गुंजाळ यांनी व्यक्त केले. प्रा. व्ही. टी. कमळकर यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली.

● श्री, आनंदराव पवार कला, वाणिज्य, विज्ञान कॉलेज, चिपळूण येथे दि. २३ फेब्रुवारी २०१६ रोजी 'विद्यार्थ्यापुढील आदर्श' या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम घेण्यात आला. सुमारे १२५ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता.

मुलांनी उत्स्फूर्तपणे आपल्यासमोरील आदर्श कोण, आदर्श कसे असावेत, यावर चर्चा केली. यावेळी जिल्हा समिती अध्यक्ष श्री. प्रकाश काणे व कॉलेजचे प्राचार्य, शिक्षकवर्ग उपस्थित होते.

● कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. २६ फेब्रुवारी २०१६ रोजी स. रा. देसाई अध्यापक विद्यालय, माळनाका, रत्नागिरी येथे शिक्षणकट्टा कार्यक्रम घेण्यात आला. श्री. नथुराम देवळेकर यांनी 'मी जिंकू शकतो' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये चर्चा घडवून आणली. यावेळी स. रा. देसाई अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक उपस्थित होते.

**मार्च २०१६**

● **जागतिक महिला दिन कार्यक्रम सिंधुदुर्ग -**

कोकण विभागीय केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्याच्यावतीने जागतिक महिला दिन व महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या १०३ व्या जयंती निमित्त वेंगुर्ले कॅम्प येथील महिला काथ्या



अहमदनगर – शेती कट्टा – दीपक भागवत, कानिफनाथ मरकड, डॉ. हरिभाऊ मोरे, माउली पवार आणि रवींद्र नवले



अहमदनगर – यशवंतराव चव्हाण मार्ग नामकरण सोहळा (कोपरगाव मार्ग)




सोलापूर विभागीय केंद्र शुभारंभ प्रसंगी दीपप्रज्वलन




सोलापूर विभागीय केंद्र उद्घाटन सोहळा



ठाणे विभागीय केंद्र – जेष्ठ नागरिक गौरवसंध्या – सांगीतिक कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका मृदुला दाढे होशी, व तुषार दळवी



ठाणे विभागीय केंद्र – जेष्ठ नागरिक गौरवसंध्या



नागपूर विभागीय केंद्र - भा.ल. भोळे स्मृती व्याख्यान माला



नागपूर विभागीय केंद्र - भा.ल. भोळे स्मृती व्याख्यान माला - मुक्ता दाभोलकर प्रबोधन करतांना



लातूर विभागीय केंद्र - यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतीदिन




अंबाजोगाई विभागीय केंद्र - वेध भविष्याचा



अंबाजोगाई - युवा स्वांतत्र्य ज्योत रेली




मराठवाडा - दुष्काळ अभिसरण शिबीर



पुणे विभागीय केंद्र - राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर (विद्यार्थी/शिक्षक) स्पर्धा परीक्षा



पुणे विभागीय केंद्र - कृषी व सहकारावरील चर्चासत्र




आर्वी - शिरूर कासार (बीड) श्रमसंस्कार शिबीर




विभागीय केंद्र ठाणे - उद्‌घाटन समारंभ




कराड विभागीय केंद्र - वेणूताई यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त कल्याणी पांडे - साळुखे यांचे सुश्राव्य गायन




कराड विभागीय केंद्र - (विरंगुळा येथे मा. सुप्रिया ताईंची भेट )



कोकण विभागीय केंद्र (रत्नागिरी) – यशस्वी महिलांचे मार्गदर्शन व चर्चासत्र



कोकण विभागीय केंद्र (रायगड) – युवा कार्यकर्ता प्रशिक्षण



औरंगाबाद विभागीय केंद्र – जागर दुष्काळाचा पदयात्रा



औरंगाबाद विभागीय केंद्र – युवा स्वांतत्र्य ज्योत रॅली



माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी – विद्यार्थी वर्ग २०१६



माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी – विद्यार्थी वर्ग २०१६



महाराष्ट्र महिला व्यासपीठ - ओरिगामी कार्यशाळा



महाराष्ट्र महिला व्यासपीठ - सौदर्य प्रसाधन कार्यशाळा




जेष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २०१६




जेष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २०१६




शिक्षण विकास मंच -'शिक्षणकट्टा' या उपक्रमांतर्गत 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०१६' या विषयावर चर्चासतत्राचे आयोजन




शिक्षण विकास मंच - शिक्षण कट्टा - शालेय विद्यार्थ्यांचे मूल्यमापन



विज्ञानगंगा या उपक्रमांतर्गत भौगोलिक स्थलदर्शक प्रणाली (जीपीएस) - डॉ. आर. आर. नवलगुंद यांचे व्याख्यान




विज्ञानगंगा या उपक्रमांतर्गत प्रा.ए.बी.पंडीत यांचे 'घनकचऱ्यापासून वायू व वीज निर्मिती' या विषयावर व्याख्यान




लोकसंवाद - महाश्वेतादेवी आदरांजली कार्यक्रम - प्रा. डॉ. इलिना सेन व इतर मान्यवर



विज्ञानगंगा - ऑलिम्पियाड - पालक, शिक्षक व विद्यार्थी



वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान - तापमापक, मोजमापक, व दिशादर्शक या विषयांवर विद्यार्थी कार्यशाळा




वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान - हवामान बदल विषयक शिक्षण व कृती प्रकल्प



सृजन – मैत्रीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रम



सृजन – नागपंचमीच्या निमित्त मा.श्री सुनील कदम यांचे ''सर्प – समज, गैरसमज'' या विषयावर व्याख्यान.



कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम – विधी साक्षरता कार्यशाळा



कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम – कार्यक्रम पूर्वतयारी




बदलापूर – स्वस्थ भारत अभियानातंर्गत योग चिकित्सा शिबीर




बदलापूर (ठाणे) – जागतिक महिला दिनानिमित्त 'ती' चा सन्मान

**ACADEMY OF INFORMATION TECHNOLOGY**
**(YCP)**

# CELEBRATING
# 17 YEARS
## of
## QUALITY EDUCATION

## BEST C-DAC CENTRE




## C-DAC AWARD FOR BEST PERFORMANCE

सी डैक CDAC ॲक्टस acts
Authorized Training Center

कामगार औद्योगिक सहकारी संस्थेच्या ट्रेनिंग सेंटरच्या सभागृहात महिला सबलीकरण व यशस्वी महिलांचे मार्गदर्शन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन वेंगुर्ले येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीमती सरीता लायकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व कोकण विभागाचे कोषाध्यक्ष एम. के. गावडे यांच्या हस्ते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाले. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा समिती अध्यक्ष ॲड. किशोर शिरोडकर, महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका सौ. प्रज्ञा परब, प्रमोद धुरी आदी मान्यवर उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण यांनी पुरोगामी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना महिलांच्या सक्षमीकरण व सबलीकरणाकरिता अनेक उपक्रम राबविले. त्यांनी महिलांसाठी दिलेल्या योगदानामुळे खऱ्या अर्थाने महिला सक्षम झाल्या आहेत. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी घेतलेला मुलमंत्र हाच यशवंतराव चव्हाण यांनी प्रत्यक्षात उतरविला त्यांच्या जयंतीदिनी यशवंतरावांचा आदर्श ठेऊन प्रतिष्ठान कार्य करत असल्याचे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागाचे कोषाध्यक्ष एम. के. गावडे यांनी केले.

यावेळी श्रीमती लायकर यांनी 'स्त्री ही आदिशक्तीचे रूप असून आपल्यातील आदिशक्तीला जागृत करून सकारात्मक विचार ठेवल्यास महिला आज यशस्वी होऊ शकते. स्त्रियांवरील अत्याचार करणाऱ्यावर कायद्याच्या तीव्रतेत वाढ झाली असून त्याचा वापर आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी योग्य मार्गाने करावा,' असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाला साप्ताहिकाच्या संपादिका सौ. सीमा मराठे, होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ. पूजा कर्पे, डॉ. सोनाली सावंत, सौ. संध्या मांजरेकर, सौ. सरोज परब, पं. स. माजी सभापती सारिका काळसेकर, हितश्री गावडे, सौ. मिरा सावंत, सौ. प्रविणा खानोलकर, माजी नगरसेविका श्रीमती गीता गावडे आदी विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या.

- **'जागतिक महिला' दिन कार्यक्रम (रत्नागिरी)–**

कोकण विभागीय केंद्र, फिनोलेक्स उद्योग समूह व मातोश्री कमलबाई विसपुते इंग्लिश मीडियम स्कूल यांचे संयुक्त विद्यमाने ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त बचत गट व इतर उद्योगिनी महिलांनी बनविलेल्या वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री महोत्सव दि. ५ ते ८ मार्च या कालावधीत मातोश्री कमलबाई विसपुते इंग्लिश मिडि. स्कूल, कुवारबांव, रत्नागिरीच्या क्रीडांगणावर संपन्न झाला.

दि. ५ मार्च २०१६ रोजी सकाळी ११.०० वा. कोकण विभागीय समितीच्या माजी सदस्या आणि सिंधुदुर्ग मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका मा. सौ. प्रज्ञाताई परब यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, कोषाध्यक्ष मा. श्री. एम. के. गावडे, कुवारबांव ग्रामपंचायत सरपंच मा. सौ. मनाली नार्वेकर, जिल्हा समितीचे सदस्य सर्वश्री कृ. आ. पाटील, शहाजीराव खानविलकर, अविनाश काळे, श्रीम. प्राची शिंदे, ऋषीकेश शिक्षण संस्था कमिटी सदस्या श्रीम. नंदा शेलार, श्रीम. मौजमा पेटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा समिती सदस्या श्रीम. प्राची शिंदे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रतिष्ठानच्या वतीने केल्या जाणाऱ्या उपक्रमांची तसेच दि. ५ ते ८ मार्च या कालावधीत होणाऱ्या विविध स्पर्धा, मार्गदर्शन, आरोग्य तपासणी वगैरे कार्यक्रमांची माहिती यावेळी दिली.

महिलांनी केवळ घरात बसून न राहता अर्थार्जनासाठी बाहेर पडावे, बचत गटाच्या माध्यमातून सतत कार्यरत रहावे असे मा. सौ. प्रज्ञाताई परब यांनी उपस्थित महिलांना आवाहन केले.

ज्याप्रमाणे सिंधुदुर्गात काथ्या उद्योगामध्ये महिलांनी प्रगती केली आहे, त्याप्रमाणे रत्नागिरीतील महिलांनीही काथ्या उद्योग व इतर उद्योगामध्ये प्रगती करावी. महिलांना लागणारे सर्व मार्गदर्शन आम्ही करू असे कोषाध्यक्ष मा. श्री. एम. के. गावडे यांनी सांगितले.

'जागतिक महिला दिनी' बचतगटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री यातून मिळणारे अर्थार्जन हे चार दिवसांचे मर्यादीत आहे. बचतगटांनी आता मोठ्या उद्योगाकडे वळले पाहिजे. त्यासाठी बचतगटांची मोठी संघटना उभी रहावी, त्या संघटनेच्या माध्यमातून नवीन नवीन उद्योग सुरू केले जावेत अशी अपेक्षा व्यक्त करून निवडणूकांमध्ये आरक्षणाची वाट न पाहता उभे राहण्याचे सामर्थ्य आपल्या कार्यातून, कर्तृत्वातून निर्माण करावे असे आवाहन करून विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी महिलांच्या वस्तू विक्रीला शुभेच्छा दिल्या.

दि. ५ ते ८ मार्च २०१६ या कालावधीत महिलांसाठी पाककला स्पर्धा, भाज्यांची सजावट स्पर्धा, पानाफुलांची रांगोळी स्पर्धा, पारंपारिक वेशभूषा स्पर्धा, फनी गेम्स, लायन्स क्लब – रत्नागिरीचे वतीने महिलांचे हिमोग्लोबीन टेस्ट व जनरल चेकींग करण्यात आले. 'महिलांचे हक्क व संरक्षण' याविषयी लायनेस क्लबच्या वतीने ॲड. लोवलेकर यांनी महिलांना मार्गदर्शन केले. तसेच MKV ग्रुपच्या महिलांनी गायनाचा व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. दि. ५ मार्च रोजी 'नाचणीपासून तिखट व गोड पदार्थ' हा विषय देऊन पाककला स्पर्धा घेण्यात आली. भाज्यांची सजावट स्पर्धा व पानाफुलांची रांगोळी स्पर्धा या सर्व स्पर्धांमधून महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

दि. ८ मार्च रोजी जिल्हा प्रादेशिक रुग्णालयाचे वतीने महिलांना जनजागृतीपर एच. आय. व्ही एड्स बद्दलच्या माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.

दि. ८ मार्च २०१६ रोजी सांगता समारोप कार्यक्रमाला रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. संजय शिंदे, फिनोलेक्स उद्योग समूहाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आशुतोष मुळ्ये, कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हा समिती अध्यक्ष मा. श्री. प्रकाश काणे, ऋषीकेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. धनंजय विसपुते, संस्थेच्या संचालिका श्रीमती नंदा शेलार, श्रीमती मौजमा पेटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पोलीस म्हटले म्हणजे लोकांच्या मनात भीती निर्माण होते. लोकांच्या मनातील ही भीती घालविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. महिलांच्या मदतीसाठी 'प्रतिसाद' हा ॲप सुरू करण्यात आला आहे. मुलींना होणारा त्रास कमी व्हावा यासाठी 'सखी समुपदेशन'द्वारे माहिती दिली जाते, त्याचप्रमाणे 'तारुण्याच्या उंबरठ्यावर' या कार्यक्रमाद्वारे २० वर्षापुढील मुलींना तारुण्यात येताना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याची माहिती दिली जाते. 'दामिनी पथक' द्वारे रस्त्यावर गुंडगिरी करणाऱ्यांवर वचक बसविण्याचा प्रयत्न करीत आहोत अशी महत्त्वाची माहिती देऊन आम्ही लोकांच्या मनातील भीती घालविण्याचा प्रयत्न करीत आहोत असे जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले.

ऋषीकेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. धनंजय विसपुते यांनी आपल्या संस्थेच्या क्रीडांगणावर महिलांसाठी भव्य असा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला धन्यवाद दिले. यापुढेही

संस्था आपल्याला कार्यक्रमाकरिता सहकार्य करेल असे सांगितले.

फिनोलेक्सचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आशुतोष मुळ्ये यांनी स्त्रियांना भेडसावणाऱ्या स्तनांच्या तसेच गर्भाशयाच्या कर्करोग तपासणीबाबत माहिती दिली. या तपासण्या मुकुल माधव फाउंडेशन व फिनोलेक्स यांचे संयुक्त विद्यमाने अत्यल्प दरात जागतिक महिला दिनानिमित्त उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती दिली. या तपासण्या दि. ७ ते १९ मार्च २०१६ या कालावधीत नजीकच्या हॉस्पीटलमध्ये करून घ्याव्यात असे सांगितले.

उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनीही 'महिला दिना' च्या उपस्थित महिलांना शुभेच्या दिल्या. श्रीमती नंदा शेलार यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. अनघा मगदूम यांनी केले. शेवटी MKV ग्रुपच्या महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दि. ५ ते ८ मार्च या चार दिवसात प्रदर्शनाला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

- **'जागतिक महिला दिन' कार्यक्रम ठाणे –**

ठाणे जिल्हा कोकण विभाग व युवाराज प्रतिष्ठान, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च रोजी यशस्विनी भवन, बेलवली, बदलापूर येथे जागतिक महिला दिनानिमित्त 'ती'चा सन्मान हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धा व मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स. ११ ते १ या वेळेत चॉकलेट तयार करण्याची सोपी रेसिपी, दु. १ ते ३ या वेळेत मेहंदी स्पर्धा व सायं. ५ ते ७ 'चला स्वत: विषयी बोलू या' या विषयावर विविध मान्यवरांचे मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सौ. ऋताताई आव्हाड यांच्या मार्गदर्शनाबरोबरच सौ. मानसी करंदीकर (ज्येष्ठ समुपदेशक) – स्त्रियांवर येणारा कौटुंबिक ताणतणाव, डॉ. सौ. विशाखा राठोड (मानसोपचार तज्ज्ञ) – स्त्रियांचे सर्वसामान्य आरोग्य, सौ. तृप्ती सांडभोर (उपायुक्त नवी मुंबई महानगर पालिका) प्रशासकीय सेवेत स्त्रियांचे योगदान, सौ. भारती शर्मा यांनी बचतगटातून व्यवसाय मार्गदर्शन या विविध विषयांवर महिलांना मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाला बदलापूरच्या नगरसेविका सौ. वंदना सावळे, कोकण विभागीय समिती सदस्य कॅप्टन आशिष दामले आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला सुमारे सहाशे महिला उपस्थित होत्या.

- **१२ मार्च जयंती दिन कार्यक्रम (रत्नागिरी, रायगड)**

स्व. यशवंतराव चव्हाण यांचे १२ मार्च जयंती दिनी प्रतिष्ठानचे कोकण विभागीय कार्यालयात चव्हाण साहेबांचे प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

चिपळूण येथील कोवॅस या संस्थेच्या 'जिद्द' या मतिमंद मुलांच्या शाळेत १२ मार्च स्व. यशवंतराव चव्हाण जयंती दिन साजरा करण्यात आला. यावेळी कोकण विभागीय समिती सदस्या श्रीमती जानकी बेलोसे, जिल्हाध्यक्ष श्री. प्रकाश काणे, जिल्हा समिती सदस्य श्री. अभिजित खानविलकर, श्री. सिद्धेश लाड, कोवॅस संस्थेच्या उपाध्यक्षा तथा नगरसेविका सौ. आदिती देशपांडे, जिद्द शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप दिवाडकर, शाळेचे शिक्षक व पालक वर्ग उपस्थित होते.

'यशवंतरावांचे शैक्षणिक कार्य' या विषयावर कोकण विभागीय समिती सदस्या श्रीमती जानकी बेलोसे यांनी विचार मांडले. 'यशवंतराव जीवनप्रवाह' हे पुस्तक श्रीमती बेलोसे यांच्या हस्ते शाळेला भेट देण्यात आले. जिल्हाध्यक्ष श्री. प्रकाश काणे यांनी शाळेला रू. १०,०००/– (रु. दहा हजार मात्र) देणगी म्हणून दिली.

उपस्थित मान्यवरांनी कोवॅस संस्थेच्या 'जयदीप मोने' या कार्यशाळेला भेट दिली. या कार्यशाळेतील मतिमंद मुलांनी तयार केलेल्या वस्तूंची पाहणी करण्यात आली.

- **१२ मार्च जयंती कार्यक्रम**

कोकण विभाग ता. सुधागड जि. रायगड यांच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांच्या १०३ व्या जयंती निमित्त कार्यक्रम संपन्न झाला.

दि. १४ मार्च रोजी माणगांव खुर्द येथे जयंती कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे उपसरपंच श्री. आंग्रे लाभले व प्रमुख वक्ते म्हणून श्री. लक्ष्मण गोळे सर उपस्थित होते.

सकाळी १०.३० वा प्रमुख पाहुणे श्री. आंग्रे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी स्वागत गीताने केली. त्यानंतर 'बापू के संग' या चित्रपटाचे प्रक्षेपण विद्यार्थ्यांसाठी केले गेले. त्याद्वारे मुलांना 'सत्यमेव जयते' म्हणजे नेमके काय ? या विधानाचा विवेकी बोध झाला. मुलांनी मोठ्या कुतुहलाने चित्रपट पाहिला. त्यानंतर श्री. लक्ष्मण गोळे सरांनी मुलांशी गांधी विचारावर संवाद तथा चर्चा केली साधी राहणी, उच्च विचारसरणी हे जीवनाचे सूत्र महात्मा गांधीनी कसे आत्मसात केले हे थोडक्यात सांगितले. सदर कार्यक्रमाचे आयोजन अतिशय सुंदर पद्धतीने केले गेले होते. श्री. प्रवीण साळुंखे (राष्ट्रवादी युवक काँग्रेस उपाध्यक्ष) व त्यांचे सहकारी कुशाल ओसवाल, दत्ता पालवे यांनी मान्यवरांचा सत्कार सोहळा अतिशय उत्साहात शाल, पुष्प, श्रीफळ देऊन पार पाडला. विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था केली गेली. सदर कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना महात्मा गांधीच्या जीवनावर आधारीत पुस्तकांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर श्री. अभिजीत दादा देशमुख यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - नवमहाराष्ट्र युवा अभियान रायगड जिल्हा संघटक व समन्वयक यांनी सहभागींना मागदर्शन केले. त्याचबरोबर श्री. लक्ष्मण गोळे सरांचा परिचय सहभागींना करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जि. प. शिक्षकांनी केले. या कार्यकमास माणगाव खुर्द ग्रामस्थांनी भैरवनाथ देवस्थान मंदिर उपलब्ध करून दिले.

या कार्यक्रमास नाग्या महादु कातकरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. रविंद्र पवार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यकर्ते व पावसाळी, वावे, घोडपापडवाडी, करचुंडे, भेलिव या आदिवासी पाड्यातून आदिवासी बांधव उपस्थित होते.

- **'जलदिन कार्यक्रम'**

ठाणे जिल्हा कोकण विभाग व युवाराज प्रतिष्ठान, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'चला जाऊया पाण्याकडे' या विषयावर दि. २२ मार्च २०१६ रोजी यशस्वीनी भवन बेलवली, बदलापूर येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ जलतज्ज्ञ श्रीमती सरोजिनी सावंत या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे कुळगाव बदलापूरचे नगरसेवक श्री. संभाजी शिंदे, पाणी पुरवठा समिती सभापती श्री. शैलेश वडनेरे, माजी नगराध्यक्ष श्री. राजन घोरपडे, श्रीमती. वंदना सावळे, अनिता नवळे व कार्यक्रमाचे आयोजक तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय समिती सदस्य कॅप्ट. आशिष दामले आदी मान्यवर उपस्थित होते.

- **शिक्षण कट्टा कार्यक्रम**

कोकण विभागीय केंद्राच्या वतीने देवरूख येथील माध्यमिक विद्यालय ताम्हणे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी या शाळेमध्ये दि. ४ एप्रिल २०१६ रोजी 'शिक्षणकट्टा' कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ताम्हणे पंचकोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री. अशोक सप्रे, शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. पाटील सर, श्री. सप्रे सर तसेच श्री. पाष्टे गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी अभ्यास

कसा करावा, कोणाची संगत करावी, कोणाची करू नये, कोणाशी कसे वागावे याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही या चर्चेत सहभाग घेतला.

लोक विद्यालय तुळसणी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथेही दि. १४ एप्रिल रोजी शिक्षणकट्टा कार्यक्रम घेण्यात आला.

- **व्याख्यान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ वी जयंती निमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र जिल्हा रायगड यांचे वतीने दि. ५ एप्रिल २०१६ रोजी नवीन पनवेल येथे आयोजित 'भारतीय संविधानाचा मूळ गाभां रोहित वेमुला ते कन्हैया' आदि विषयावर व्याख्यान आयोजित केले गेले.

सदर व्याख्यानास प्रमुख व्याख्याते श्री. सुरेश सावंत लाभले. सदर व्याख्यानास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. उमेशजी गायकवाड साहेब (मागास वर्गीय व महिला बालकल्याण समिती, कर्जत नगर परिषद) तसेच मा. घुमे साहेब (बालाजी शिक्षण संस्था संस्थापक) व सामाजिक कार्यकर्ते दिपकजी पवार, सुहासजी कुर्ले, माजी सरपंच संजयजी दिवेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

व्याख्यानाला युवकांचा चांगला प्रतिसाद लाभला. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिक सहभागी होते.

व्याख्याते सुरेश सावंत यांनी आपल्या व्याख्यानामध्ये उदा. दमनशाही, फॅसिस्टवाद, जातीयवाद, भारतीय घटनेचा सरनामा आदी महत्त्वपूर्ण विषयाला हात घातला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन उज्ज्वला देशमुख यांनी केले. कार्यक्रमाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यकर्ते निलेश देशमुख, रवि पवार, पुरुषोत्तम पाटील, राकेश कांबळे, दिपक पाटील, लक्ष्मण गोळे सर, पाटकर काका, मंगेश देशमुख, संतोष पवार, अमोल कांबळे, फारूख शेख, किरण देशमुख, विक्रम देशमुख यांनी सक्रीय सहभाग घेतला आयोजक आनंदजी भंडारी, संयोजक अभिजीत दादा देशमुख उपस्थित होते.

- **विज्ञानगंगा कार्यकम**

बदलापूर पूर्वेला असलेल्या काटदरे हॉलमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई (कोकण विभाग, ठाणे जिल्हा), मराठी विज्ञान परिषद व युवराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ एप्रिल २०१६ रोजी सायं ६.०० वा 'विज्ञानगंगा' या कार्यक्रमांतर्गत 'गुरूत्व लहरी' या सखोल विषयाचा आढावा घेताना माननीय शुभदाताई वक्टे, प्रियांका आशिष दामले, श्री. आशिष जी गोळे, सौ. तनुजा गोळे, श्रीमती वंदना सावळे, श्री. राम लिये, सचिन पाटील दिसत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विश्वनाथ पाटील सर यांनी केले. कॅ. आशिष दामले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात सर्व वयोगटातील श्रोते उपस्थित होते.

- **गीत रामायण कार्यक्रम**

कोकण विभागीय केंद्र - ठाणे जिल्हा व युवराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ एप्रिल २०१६ रोजी यशस्वीनी भवन, बदलापूर येथे सायं. ७ ते ९ या वेळेत श्री. रामनवमीचे औचित्य साधून ग.दि. माडगुळकर रचित 'गीत रामायण' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रम आ. प. अच्युतजी जोशी व त्यांच्या संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केला. सदर कार्यक्रमाचे आयोजन सौ. दर्शनाताई दामले यांनी केले होते. पाहुण्यांचे स्वागत श्री. आनंदजी दामले यांनी केले. सदर कार्यक्रमाचे निमंत्रक कोकण विभागीय समितीचे सदस्य कॅ. आशिष दामले हे होते. सुमारे दीडशे श्रोत्यांनी या कार्यक्रमाचा मंत्रमुग्ध होऊन आनंद घेतला.

- **'जागतिक वसुंधरा दिन'**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र - जिल्हा समिती रत्नागिरी व रत्नागिरी काजू प्रक्रिया सहकारी संस्था - गवाणे, ता. लांजा

यांच्या संयुक्त विद्यमाने २२ एप्रिल 'जागतिक वसुंधरा दिन' कार्यक्रम संपन्न झाला. रत्नागिरी काजू प्रक्रिया सहकारी संस्थेच्या सभागृहामध्ये दि. २२ एप्रिल २०१६ रोजी सायं ४.०० वा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाला विभागीय समितीचे सदस्य मा. श्री. प्रकाश काणे, जिल्हा समिती सदस्या मा. सौ. युगंधरा राजेशिर्के, श्रीमती प्राची शिंदे, श्री. जयंतराव विचारे, श्री. शहाजीराव खानविलकर व लांजा महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विकांत बेर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.

पृथ्वीवर असणारे पशु, पक्षी, प्राणी, कीटक हे सर्व एकमेकांवर अवलंबून असतात व ते एकमेकांना कसे पुरक आहेत हे त्यांनी सांगितले. आपण रासायनिक क्रिया करतो, फवारणी करतो त्यामुळे जसे नको असलेले किटक मरतात तसे हवे असलेले किटकही नष्ट होतात. आपल्याला डास नको असतात तर मधमाशी ही खूप आवश्यक आहे. ज्यावेळी मधमाशा नष्ट होतील त्यावेळी सृष्टीचा ऱ्हास होईल. याकरिता मधमाशीचे संगोपन करणे गरजेचे आहे. आज कॅनडासारख्या देशात दरडोई ७००० झाडे आहेत मात्र भारतामध्ये फक्त दरडोई २८ झाडेच आहेत हे लक्षात घेऊन वृक्षलागवड करणे किती महत्त्वाचे आहे हेही सांगितले.

लांजा महाविद्यालयाचे प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. विक्रांत बेर्डे यांनी 'मधमाशांचा पर्यावरणातील सहभाग' या विषयावर स्लाईड शोद्वारे माहिती दिली. प्रा. बेर्डे हे सोसायटी फॉर इन्व्हॉयरमेंट ॲन्ड बायोडायव्हर्सिटी कॉन्झर्वेशन, रत्नागिरी या संस्थेचे अध्यक्ष असून ते पाच वर्षे काम करीत आहेत.

प्रा. बेर्डे यांनी मधमाशा पर्यावरणासाठी कशा प्रकारे महत्त्वाचे आहेत हे सांगितले. मधमाशा या आग्याची माशी, सातेरी माशी व फुलोरा माशी अशा तीन प्रकारच्या असून त्यांच्यापासून मिळणाऱ्या मधाचे प्रमाण, मध तयार करण्याची प्रक्रिया, त्यांचे कार्य, मधमाशींच्या पोळ्यांची वैशिष्ट्ये, मधमाशीच्या विषाचा कशाप्रकारे औषधी वापर केला जातो, पोळ्यापासून मिळणारे मेण, त्यांचा पर्यावरणासाठी होणारा उपयोग या सर्वांची स्लाईड शो द्वारे सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे स्वत:ची जमीन नसणारे शेतकरीही मधमाशींचे शेतीमधील पेटीद्वारे पालन करून सहाय्यक व्यवसाय म्हणून मधाचे उत्पादन कसे घेऊ शकतात हे सांगितले.

- **वृक्षलागवड कार्यक्रम**

कोकण विभागीय केंद्राच्यावतीने कोकण विभागामधील पाचही जिल्ह्यांमधून 'पर्यावरण दिन' ते 'कृषी दिन' या कालावधीत १० हजार रोपांची लागवड करण्याचे दि. १६ मे २०१६ चे विभागीय समिती सभेमध्ये ठरले. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी २ हजार रोपांची लागवड प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये व ग्रामपंचायतींमधून करावी असे निश्चित करण्यात आले. वाटप केलेल्या रोपांची जोपासना करून जी शाळा रोपे जास्तीत जास्त जगवेल त्यांना बक्षिस देण्याचे ठरले.

रत्नागिरी तालुक्यातील वृक्षलागवड कार्यक्रमाची सुरुवात ५ जून 'पर्यावरण दिना' पासून चिपळूण तालुक्यातील पेढांबे येथील सत्यनारायण सामुदायिक केळी प्रकल्प येथे कृषीभूषण श्री. रणजितराव खानविलकर यांचे हस्ते रोप लावून करण्यात आली. रत्नागिरी, राजापूर, लांजा, संगमेश्वर, गुहागर, चिपळूण, दापोली, खेड या तालुक्यांमधील विविध शाळांमधून रोपांचे वाटप करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र व सांदिपनी गुरुकुल, संगमेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने १ जुलै 'कृषी दिन' कार्यक्रम सांदिपनी

गुरुकुल येथे संपन्न झाला. यावेळी कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हा समिती सदस्य श्री. कृ.आ. पाटील, श्रीमती प्राची शिंदे, श्री. अविनाश काळे, हेल्प अकॅडमीचे अध्यक्ष श्री. युयुत्सू आर्ते, सांदिपनी गुरुकुलाचे अधिक्षक श्री. कारखानीस आदी मान्यवर उपस्थित होते.

कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी कृषीदिनाचे महत्त्व सांगून शिवण, वड, साग या रूंद पानांच्या झाडांची लागवड करावी असे सांगून याविषयी माहिती दिली. यावेळी उपस्थित असलेल्या कोकण कृषी विद्यापीठ दापोलीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांनी सांदिपनी गुरुकूल येथे लावलेल्या झाडांची वरचेवर येऊन पहाणी करावी व या गुरुकुलाचा प्रयोगशाळा म्हणून उपयोग करून घ्यावा असे सुचविले.

या प्रमाणेच पालघर व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकण विभागीय समिती सदस्यांनी आपापल्या जिल्ह्यात अनेक ठिकाणी वृक्षलागवडीचे कार्यक्रम घेतले आहेत.

- **योग चिकित्सा शिबिर**

कोकण विभाग आणि युवाराज प्रतिष्ठान, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ ते २१ जून २०१६ या कालावधीत यशस्वीनी भवन येथे बदलापूरच्या नागरिकांच्या स्वस्थ आरोग्यासाठी 'स्वस्थ भारत अभियान' अंतर्गत 'योग चिकित्सा शिबिरा' चे आयोजन करण्यात आले होते. यात प्रशिक्षक श्री. कंवर सिंग यांनी कंबरदुखी, मानदुखी, गुडघादुखी व सांधेदुखी या चिकित्सांचे प्रात्यक्षिकासह उत्तम मार्गदर्शन केले. हे शिबीर सकाळी ७ ते ९ या वेळेत घेण्यात आले. कोकण विभागीय समिती सदस्य कॅ. आशिष दामले यांनी आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

- **विज्ञानगंगा कार्यक्रम**

कोकण विभाग ठाणे, मराठी विज्ञान परिषद आणि युवाराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञान गंगा' भौगोलिक स्थळदर्शन प्रणाली या कार्यक्रमाचे आयोजन दि. ११ जुलै २०१६ रोजी करण्यात आले.

सदर कार्यकमात इस्रोचे स्पेस नेविगेशन सेंटरचे शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद काळे यांनी उपस्थितांना Working of GPS व त्यासमोरील आव्हाने पुढच्या काळात GPS ची उपयुक्तता आदी विषयांवर मार्गदर्शन केले.भारतात GPS प्रणालीचा वापर संरक्षक दलात मोठया प्रमाणावर केला जातो. गेल्या काही वर्षात या प्रणालीत झालेल्या विकासामुळे ही प्रणाली विविध माध्यमातून आपल्या सेवेस येत आहे.मोबाईलच्या माध्यमातून मिळणारे लोकेशन असो; वा खाजगी वाहतूक कंपन्यांकडून वापरले जाणारे तंत्र यातून GPS प्रणालीचा वापर मोठया प्रमाणावर होतो आहे. तसाच वापर पालिका आणि प्रशासनाने आपल्या कारभारावर लक्ष ठेवण्याकरिता केला तर त्याचा यंत्रणेवर वचक ठेवण्यास मदत होईल. तसेच यंत्रणेच्या वापरामुळे कचऱ्याच्या गाडया, बससेवा अशा सेवावरही नियंत्रण ठेवता येऊ शकते. जेणेकरून या कामात पारदर्शकता वाढेल, जे स्वच्छ प्रशासनासाठी महत्वाचे ठरेल, असे मत डॉ. काळे यांनी व्यक्त केले. आपत्कालिन परिस्थितीतही GPS ने अनेकदा महत्वाची भूमिका बजावल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी बोलताना भारतीय GPS प्रणालीची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. सध्या अनेक विद्यार्थ्यांची स्पेस विषयात रूची वाढत असून गेल्याच महिन्यात भारताने सोडलेल्या २० उपग्रहांपैकी एक उपग्रह हा पुण्याच्या विद्यार्थ्यांनी तयार केला होता. त्यामुळे उद्याचे युवकच शासन यंत्रणा आपल्या कारभारातील पारदर्शकता वाढवण्यासाठी या प्रणालीला विकसित करणार असल्याचे सूतोवाच डॉ. प्रमोद काळे यांनी केले.

सदर कार्यक्रमास बदलापुरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विषयांची सखोल माहिती घेतली. मा. नगरसेवक आशिष गोळे यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोकण विभागीय समितीचे सदस्य कॅ. आशिष दामले यांनी केले. सूत्र संचलन श्री. विश्वनाथ पाटील यांनी केले.

- **शिक्षण कट्टा**

कोकण विभागीय केंद्र व पैसाफंड इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्यु. कॉलेज संगमेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.६ ऑगस्ट २०१६ रोजी विद्यार्थ्यांसाठी 'शिक्षणकट्टा' या उपक्रमाअंतर्गत 'अभ्यास कसा करावा' या विषयावर गप्पांचा कार्यक्रम घेण्यात आला.

अभ्यास ही स्वतःहून स्वतः आणि स्वतःसाठीच करायची प्रक्रिया असल्याने अभ्यासात मग्न होण्यासाठी शरीराचे आरोग्य उत्तम असणे आवश्यक आहे. अभ्यासाचा कंटाळा यायला नको म्हणून व्यवस्थित व्यायाम व पुरक आहार गरजेचा आहे. Read - Remember - Reproduce हे अभ्यासाच्या बाबतीत लक्षात ठेवूनच अभ्यासात सातत्य ठेवावे, नाहीतर 'पुढचे पाठ मागचे सपाट' असे होईल. घाबरून न जाता चुका परत परत होणार नाहीत याकडे मुलांनी लक्ष दिले पाहिजे. कमीत कमी वेळेमध्ये जास्तीत जास्त अभ्यास करण्यासाठी अभ्यासाचे नियोजन वेळापत्रक बनवून अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अभ्यास करताना मोबाईल, टिव्ही यासारखी करमणूकीची साधने लांब ठेवावीत असेही विद्यार्थ्यांना सांगण्या आले.

अभ्यास करताना येणात्या समस्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांना सांगितल्या, त्यावर चर्चा करून त्यांच्या समस्या सोडविण्यात आल्या.

- **विज्ञानगंगा कार्यक्रम**

कोकण विभाग, ठाण्याच्यावतीने दिनांक २३ सप्टेंबर २०१६ रोजी बदलापूर येथील यशस्विनी सभागृहात 'विज्ञानगंगा' मालिकेतील 'घनकचऱ्यापसून वीज आणि मिथेनची निर्मिती करणे' या अभ्यासपूर्ण विषयाचे चौथे पुष्प डॉ. शरद काळे यांनी उलगडले. यावेळी कार्यक्रमाला विज्ञानप्रेमी श्रोत्यांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्री. सचिन पाटील यांनी केले.

- **शिक्षकदिन कार्यक्रम**

'गुरू' ही संज्ञा परमार्थ क्षेत्रात अधिक रूढ आहे. या गुरूंविषयी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दि. ५ सप्टेंबर 'शिक्षक दिना' चे औचित्य साधून दि. २४ सप्टेंबर २०१६ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई कोकण विभागीय केंद्र व वराडकर – बेलोसे महाविद्यालय दापोली यांचे संयुक्त विद्यमाने वराडकर – बेलोसे महाविद्यालयाचे सभागृहात सकाळी ११.३० वा. कार्यक्रम संपन्न झाला.

प्रथम उपस्थित मान्यवरांचे शुभहस्ते दिपप्रज्वलन करून स्व. यशवंतराव चव्हाण साहेब, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व सरस्वती मातेचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी भूषविले. यावेळी वराडकर बेलोसे म हाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. सुरेश निंबाळकर कोकण विभागीय समिती दापोलीच्या सदस्या श्रीम. जानकीताई बेलोसे, श्री. प्रकाश काणे, सौ. युगंधरा राजेशिर्के, श्री. विश्वंभर कमळकर, संस्थेचे सचिव श्री. दशरथ भोसले, शिवाजी शिगवण, राजाराम कदम, कुणाल शेवरे, श्रीकांत मुंगशे, गणेश केळकर आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांसाठी सर्वश्री. धनंजय चितळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

वराडकर बेलोसे महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. सुरेश निंबाळकर यांनी उपस्थित मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जानकीताई बेलोसे यांनी केले. यावेळी त्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने वर्षभरात करावयाच्या कार्यक्रमांची

माहिती दिली, त्याचप्रमाणे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची विद्‌वत्ता व शिक्षण कार्याची थोडक्यात ओळख करून दिली.

यानंतर शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. अनुकमे सौ. प्रिया अनिल पवार – प्राथमिक शिक्षिका श्री. प्रमोद प्रभाकर गमरे – माध्यमिक शिक्षक व श्री. प्रशांत पंडीत जाधव – उच्च माध्यमिक शिक्षक यांचा स्मृतिचिन्ह शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने पुरस्कार देवून गौरव केल्याबद्‌दल धन्यवाद दिले.

- **लोकसंवाद**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय केंद्र व आठल्ये – सप्रे – पित्रे महाविद्यालय देवरूख जिल्हा रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ सप्टेंबर २०१६ रोजी आठल्ये – सप्रे – पित्रे म हाविद्यालयाच्या सभागृहात महिलांसाठी व्याख्यानाचा कार्यकम संपन्न झाला. 'महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार, सामाजिक कार्य व आजची स्त्री' या विषयावर डॉ. वर्षा फाटक यांनी महिलांना मार्गदर्शन केले. महिलांनीही उत्स्फूर्तपणे चर्चेमध्ये सहभाग घेऊन आपल्या शंकांचे निरसन केले. बहुसंख्य महिला कार्यकमाला उपस्थित होत्या.

### कोकण विभागीय समिती अध्यक्षांच्या कार्यक्रमांबाबत नियोजन दौरा

कोकण विभागातील संगमेश्वर तालुक्यातील दहा शैक्षणिक संस्थांतून एप्रिल महिन्यात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. प्रतिष्ठानच्या विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी स्वत: २६, २७, २८, २९ फेब्रुवारी या चार दिवसात संगमेश्वर तालुक्यातील देवरूख येथील आठल्ये – पित्रे – सप्रे महाविद्यालय, देवरूख (अध्यक्ष – श्री. सदानंद भागवत), न्यू इंग्लिश स्कूल, देवरूख (मुख्याध्यापक – श्री. शिंदे), दादासाहेब सरफरे विद्यालय बुरंबी, पैसाफंड हायस्कूल संगमेश्वर, अध्यक्ष शिक्षण प्रसारक मंडळ साखरपा, मार्लेश्वर शैक्षणिक संस्था देवरूख, कै. मिनाताई ठाकरे विद्यालय साडवली, शिवाजी शिक्षण उत्तेजक मंडळ, कोसुंब, ताम्हाणे पंचकोशी शिक्षण प्रसारक मंडळ ताम्हाणे आणि छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ लोकविद्यालय तुळसणी अशा दहा शाळा तसेच एक महाविद्यालय, दोन कनिष्ठ महाविद्यालय, या दहा शाळा संस्थाचालक, प्राचार्य मुख्याध्यपक, शिक्षक यांच्या भेटी घेऊन हे कार्यक्रम हाती घेण्यासंदर्भात सविस्तर चर्चा केली तसेच देवराष्ट्रे येथील राष्ट्रीय स्मारकाची पाहणी करण्यासाठी नोव्हेंबर, डिसेंबर मध्ये सहलींचे आयोजन करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. सर्व शैक्षणिक संस्थांनी चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्यात सहभागी होण्याचे मान्य केले आहे.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## कार्यवृत्त

### दुष्काळ अभिसरण शिबीर

सलग चौथ्या वर्षी मराठवाड्याने भीषण दुष्काळाचा सामना केला. पाणी, चारा, शेती, उद्योग अशा सर्व आघाड्यांवर भीषण स्थिती होती. सरकार व प्रशासकीय यंत्रणा दुष्काळ निवारणासाठी आपल्या पद्धतीने प्रयत्न करीत होत्या पण अर्थात ते अपुरे प्रयत्न आहेत. अशा परिस्थितीत मराठवाड्यात अनेक ठिकाणी व्यक्ती, संघटना, गट, समाजसेवी संस्था आदी आपापल्या माध्यमातून जमेल तसे या दुष्काळाचा मोठ्या हिमतीने सामना करीत असल्याचे चित्र होते. तरुण कार्यकर्ते, पत्रकार, अभ्यासक यांनीही दुष्काळमुक्तीची कामे समजून घ्यावी आणि एप्रिल व मे महिन्यात या कामांसाठी किमान आठ दिवस आपला वेळ द्यावा या उद्देशाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मानवलोक संस्था, अंबाजोगाई यांच्या वतीने मानवलोक संस्थेच्या प्रांगणात दुष्काळ समजून घेताना या दुष्काळ अभिसरण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात सुमारे दोनशे लोकांनी सहभाग नोंदविला.

उद्‌घाटनाच्या सत्रात मराठवाड्याची दुष्काळाची सद्यस्थिती आणि पुढील सोडवणूकीचे मार्ग व दिशा यावर अध्यक्षीय भाष्य करतांना 'नॅचरल शुगर'चे चेअरमन श्री. बी.बी. ठोंबरे यांनी मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावर अनेक उपाय सुचविले. त्यात कोकण खोऱ्यातून समुद्राला वाहून जाणारे पाणी मराठवाड्याकडे वळवावे व तेलंगणाकडून हक्काचे ३० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळते करावे, तरच इथला दुष्काळ कायमचा हटेल, त्याचबरोबर शेतमालाला भाव मिळणे, प्रक्रीया उद्योगाची उभारणी करणे इत्यादी माध्यमातून शेतकऱ्यांना लाभ मिळावा, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ यांनी या शिबीराच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. प्रतिष्ठानचे डॉ. नरेंद्र काळे यांनी प्रास्ताविक केले तर मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत केले. या प्रसंगी डॉ दिपा क्षीरसागर यांनीही आपले मनोगत मांडले. मानवलोकचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया आपल्या अभ्यासपूर्ण अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'शेताची बांधबंधिस्ती करणे, पाणलोटाचे माथा ते पायथा उपचार पाणी साठविण्यासाठी खंदक व बंधाऱ्यात गाळ साठणार नाही याची काजळी घेतली तर नक्कीच दुष्काळाचा सामना करता येईल', या भाषणाने या सत्राचा समारोप झाला.

दुपारच्या सत्रात 'माध्यमातून दुष्काळाचे चित्रण: एक सम्यक आकलन' या विषयावर उद्‌बोधक चर्चा झाली. या चर्चासत्राच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब होते. पत्रकार अतूल कुलकर्णी, गोविंद शेळके, दिलीप वाघमारे, पद्मभूषण देशपांडे, रमेश जाधव यांनी सहभाग घेतला. सहभागी सर्व वक्त्यांनी आपणाला दुष्काळ जसा दिसला तसा आपण तो माध्यमातून मांडून त्याकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला तसेच काम करणाऱ्या संस्था, संघटना यांना पाठबळ देण्याचा प्रयत्न केला हे आवर्जून सांगितले. अध्यक्षीय समारोपात अमर हबीब यांनी 'भांडवल आल्याशिवाय शेतीचा विकास होणार नाही. सरकारने जीवनावश्यक वस्तू कायदा, सिलींग कायदा रद्द करावा. शेतकऱ्यांचा प्रश्न हा फक्त शेतीचा नसून राजकीय आणि आर्थिक आहे', असे प्रतिपादन केले.

दुसऱ्या दिवशी पहाटेच पाटोदा गावातील होळणा नदीच्या पुनरुज्जीवनाच्या कामाची पाहणी करण्यासाठी

शिबीरार्थी पोहोचले. एकेकाळचे बागायती पाटोदा आज दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्यालाही महाग झाले. परंतु मानवलोक आणि गावातील गावकरी यांनी लोकसहभागातून निश्चय करून नदी पुन्हा जिवंत करण्यासाठी कंबर कसली. गावकरी रोज श्रमदान करून पात्र खोलीकरणात आपला सहभाग नोंदवत आहेत. २५ टक्के लोकवर्गणी व ७५ टक्के मानवलोक संस्थेचे असे आर्थिक बळ उभे करून गावकऱ्यांच्या श्रमदानातून काम सुरू आहे. शिबीरार्थींनी हा प्रयोग समजावून घेतला आणि श्रमदानही केले. त्यानंतर दुपारच्या सत्रात दुष्काळावर मात करण्यासाठी सुरू असलेल्या कामांचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात आले. यात 'जलसंवर्धन लोक अभियाना'च्या भक्ती जाधव, 'नॅचरल शुगर'चे पांडूरंग आव्हाड, डॉ. मिलींद पोतदार यांनी 'शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर मानसोपचार तज्ञांची भूमिका या विषयावर संवाद साधला तर वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या उमेद अभियानाचे प्रमुख अरुण गुट्टे यांनीही सादरीकरण केले. अभिनेते आमिर खानच्या 'पाणी फाऊंडेशन'ने जलसंधारणाच्या कामाला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू केलेल्या वॉटर कप स्पर्धेविषयी माहिती देण्यात आली. शांतीवन प्रकल्पातील जलसंधारणाची माहिती दिपक नागरगोजे यांनी सादर केली. तर नाम फाऊंडेशनचे उपक्रम समन्वयक शिवराम घोडके यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी उभ्या राहत असलेल्या वसतिगृहाची माहिती दिली. कुंभेफळचे तरुण सरपंच प्रमोद भोसले यांनी श्रमदानाच्या ताकदीतून उभे राहत असलेल्या जलसंधारणाच्या कामाची माहिती सांगितली. मराठवाडा शेती साहित्य मंडळाची माहिती पी.डी. जोशी, भूगर्भ शास्त्रज्ञ डॉ. वेचणेकर यांनी 'जलस्त्रोतांचा शोध व जलसाठ्याचे व्यवस्थापन' याचे महत्त्व समजावून सांगितले. वसुंधरा प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या सामूहिक विवाह सोहळ्याविषयी वैजिनाथ देशमुख यांनी सादरीकरण केले. औरंगाबाद येथील 'हारुण मुकाती इस्लामिक सेंटर'च्या वतीने चालविण्यात येणाऱ्या रोटी व कपडा बँकेविषयी श्री. गणेश घुले यांनी पॉवर पाँईंट प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण केले.

समारोप सत्रात डॉ. द्वारकादास लोहिया, दत्ता बाळसराफ डॉ. नरेंद्र काळे, नीलेश राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले व निवडक शिबीरार्थींनीही आपले मनोगत व्यक्त केले. शिबीरातील चर्चा आणि सादरीकरणांमुळे दुष्काळ आणि शेतीच्या प्रश्नांकडे पाहण्याची एक नवीन नजर मिळाल्याचे अनेकांनी बोलून दाखविले. नीलेश राऊत, मानवलोकचे अनिकेत लोहिया, डॉ. नरेंद्र काळे, सुबोध जाधव, श्रीकांत देशपांडे, गणेश घुले, मंगेश निरंतर, प्रवीण देशमुख आदींनी शिबीराच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## 'दार-खिडक्या-बाल्कनी पक्षासाठी ठेवा पाणी'

### 'जागर दुष्काळाचा' पदयात्रेत हजारो विद्यार्थ्यांनी दिल्या पाणी बचतीच्या घोषणा

### बजाजनगरमध्ये विद्यार्थ्यांनी घेतली पाणी बचतीची शपथ

### यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाने काढली जागर दुष्काळाचा पदयात्रा

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्या वतीने बजाजनगर येथे रंगपंचमीत होणाऱ्या पाणी नासाडी विरोधात बुधवार, दि. २३ मार्च २०१६ रोजी सकाळी ८ वा. 'जागर दुष्काळाचा' पदयात्रा काढण्यात आली. यावेळी इंडूरन्स ग्रुपचे राम मर्लापल्ले, मसिआचे अध्यक्ष बालाजी शिंदे, हनुमंत भोंडवे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, नीलेश राऊत, सुबोध जाधव, डॉक्टर असोसिएशनचे डॉ. संदीप शेळके, डॉ. मनिषा शेळके, साई हॉस्पिटले डॉ. अमोल कोडगिरे, वकिल असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. कांकरीया,

प्रदीप माळी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या तेजस्विनी पंडित, डॉ. ज्ञानेश्वर नीळ, जोगश्वरीचे सरपंच प्रवीण दुबीले, काँग्रेसचे अर्जून अदमाने, रामनाथ उढाण यांची प्रमुख उपस्थिती होती. पदयात्रेमध्ये सुरुवातीला राम मर्लापल्ले यांनी पाणी बचतीची विद्यार्थ्यांना शपथ दिली. यानंतर प्रदीप माळी यांनी व्यसनमुक्ती याविषयावर मार्गदर्शन केले. यावेळी लाकडाऐवजी गुटखा, सिगारेट, तंबाखूची होळी करण्यात आली. पाणी बचतीचे फलक हातात घेऊन, पाणी बचतीच्या घोषणा देत शरद पवार क्रीडा मंडळ मैदान - वडगाव फाटा - महादेव मंदीर - जयभवानी चौक - नांदरे आबा चौक - लोकमान्य चौक - मोरे चौक अशी पदयात्रा संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक गणेश घुले यांनी तर आभार श्रीकांत देशपांडे यांनी मांडले.

पदयात्रेत परीसरातील विविध शाळेमधील सुमारे दीड हजार विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभाग नोंदवला. या पदयात्रेमध्ये राजे शिवाजी विद्यालय, विवेकानंद विद्यालय, यशश्री विद्यालय, शिवतेज विद्यालय, संभाजीराजे विद्यालय, संत एकनाथ हायस्कूल, योगेश्वर विद्यालय, रोजबर्ड इंग्लिश स्कूल, भगतसिंग विद्यालय, त्रिमूर्ती विद्यालय या शाळा, ज्ञानभवन स्पर्धा परीक्षा केंद्र, गरुड झेप स्पर्धा परीक्षा अकादमी, हायटेक ॲडव्हान्स करीअर अकादमी, आदर्श करीअर अकादमी हे शैक्षणिक ग्रुप त्याचबरोबर वाळुंज महानगर वकील संघ, वाळुंज महानगर पत्रकार संघ आणि वाळूज महानगर डॉक्टर असोसिएशन या असोसिएशन आदी संस्था सहभागी झाल्या.

तीन वर्षापासून सतत कमी पावसामुळे मराठवाड्याने भीषण दुष्काळाला तोंड दिले. हजारो गावांना टँकरने पाणी पुरवठा चालू होता. मराठवाडा खऱ्या अर्थाने टँकरवाडा झाला होता. जायकवाडी धरणाने मृतसाठा पाणी पातळी फेब्रुवारी मध्येच गाठली होती. पिण्याच्या पाण्याचा, शेतीचा, जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न गंभीर बनला होता. यामुळे अनेक कुटुंबे शहरांकडे स्थलांतरीत झाली. त्याने अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यातच सरकारकडून मिळणारी मदत खूप तुटपुंजी राहिल्यामुळे निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर रंगपंचमीला पाण्याची नासाडी करू नये, पाण्याचा काटकसरीने वापर करावा याविषयीच्या जनजागृतीसाठी सदर पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या पदयात्रेसाठी मंगेश निरंतर, मयुर देशपांडे, अक्षय गोरे, गणेश उढाण, सागर अहिरे, अभिजित खारतोडे, अक्षय जाधव, स्वप्निल नवसरे, श्रीराम पोतदार, कुशल पाटणी, अमोल शिंदे, किशोर साळुंके, आदीनाथ जायपत्रे, गजानन नाईक यांनी परिश्रम घेतले.

### दुष्काळाचा जागर पदयात्रा

**दिनांक व वेळ : बुधवार, दि. २३ मार्च २०१६ रोजी सकाळी ८ वा.**

**स्थळ : शरद पवार क्रीडा मंडळ ते मोरे चौक**

**- सहभागी संस्था -**

राजे शिवाजी विद्यालय, विवेकानंद विद्यालय, यशश्री विद्यालय, शिवतेज विद्यालय, संभाजीराजे विद्यालय, संत एकनाथ हायस्कूल, योगेश्वर विद्यालय, रोजबर्ड इंग्लिश स्कूल, भगतसिंग विद्यालय, त्रिमूर्ती विद्यालय या शाळा.

ज्ञानभवन स्पर्धा परीक्षा केंद्र, गरुड झेप स्पर्धा परीक्षा अकादमी, हायटेक ॲडव्हान्स करीअर अकादमी, आदर्श करीअर अकादमी हे शैक्षणिक ग्रुप.

वाळूज महानगर वकील संघ, वाळूज महानगर पत्रकार संघ आणि वाळूज महानगर डॉक्टर असोसिएशन या असोशिएशन आदी संस्था सहभागी झाल्या होत्या.

## चित्रपट चावडी
## आझाद लघुपट
## शुक्रवार, दि. १७ जून २०१६

विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणाऱ्या चित्रपट चावडी या उपक्रमात या महिन्यात किशोर हंबीरराव लोंढे यांनी दिग्दर्शित केलेला देशातील धार्मिक प्रश्न संमजसपणे मांडणारा 'आझाद' हा लघुपट दाखविण्यात आला. लघुपटाची पटकथा पुणे येथील मैनुद्दीन यांनी लिहीली आहे. यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते सिद्धार्थ जाधव व दिग्दर्शक केदार शिंदे यांनी चावडीच्या प्रेक्षकांशी संवाद साधला.

सर्वधर्मियांचा देश अशी भारताची ओळख आहे. शेकडो जाती असूनही देशाचा एकसंघपणा कायम आहे. मात्र, काही घटनांनी देशाच्या सामाजिक ऐक्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. काही दिवसांपासून सहिष्णू व असहिष्णू हा मुद्दा गाजत आहे. या प्रश्नावर नामवंत कालाकार, साहित्यिकांनी सरकारला आपले पुरस्कार परत केले. हा अत्यंत ज्वलंत मुद्दा तरुणांच्या नजरेतून मांडण्याचा प्रयत्न दिग्दर्शक किशोर लोंढे यांनी या लघुपटातून केला आहे. महाविद्यालयीन तरुणांची वागणूक आणि स्वभावातून कथा उलगडत जाते, कोणत्याही धर्माचा अनादर करू नका, एकमेकांबाबत कटुता बाळगू नका हा संदेश अत्यंत प्रभावीपणे देण्याचा प्रामाणिक प्रयत्न यातून केला गेला आहे. औरंगाबादेतील देवगिरी महाविद्यालय आणि एम.आय.टी. महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये लघुपटाचे चित्रीकरण करण्यात आले आहे. लघुपटात राहुल, प्रदीप पवार, किशोर लोंढे, अक्षय चेके यांच्या मुख्य भूमिका आहेत.

यावेळा अपर्णा कक्कड, रेखा शेळके, सुबोध जाधव, उमेश राऊत, दिपक जाधव, सत्यजीत शोभा श्रीराम, त्रिशूल कुलकर्णी, मंगेश निरंतर, राजेंद्र वाळके आदिंची प्रमुख उपस्थिती होता.

## मंगळवार, दि. २८ जून २०१६

**'पाणीबाणी' या संपादित काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा**

**राज्यातील सुमारे पन्नासहून अधिक कवींच्या पाण्यावर आधारित कवितांचा समावेश**

राज्यात पडलेल्या भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने 'पाणी' या विषयावर राज्यातील विविध मराठी कवींनी लिहिलेल्या निवडक कवितांचा 'पाणीबाणी' या नावाचा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला. काव्यसंग्रहाचे संपादन प्रसिद्ध कवी प्रभाकर साळगावकर (माजलगाव) यांनी केले आहे. मंगळवार, दि. २८ जून २०१६ रोजी, सायं ५ वा. पैठण गेट येथील मराठवाडा साहित्य परिषदेच्या गो.ना. नांदापुरकर सभागृहात या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा.रं. बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसिद्ध कवी दासू वैद्य यांनी काव्यसंग्रहाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, बीड केंद्राच्या कार्याध्यक्षा डॉ. दीपाताई क्षीरसागर, ज्येष्ठ पत्रकार अतुल कुलकर्णी, विजय कान्हेकर, नीलेश राऊत, सुहास तेंडुलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या काव्यसंग्रहामध्ये राज्यातील ५० हून अधिक कवींच्या कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमास काव्यरसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सुबोध जाधव, मंगेश निरंतर, गणेश घुले, डॉ. संदीप शिसोदे, दिपक जाधव, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलवार, श्रीराम पोतदार, मयुर देशपांडे, राजेंद्र वाळके, संतोष लोमटे, रेणूका कड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**शनिवार, दि. २३ जुलै २०१६**

**चित्रपट चावडीत जगप्रसिद्ध नाइल नदीवर आधारित 'जन्नत-ए-नाइल' लघुपटाचे प्रदर्शन**

**लघुपटाच्या दिग्दर्शिका-पत्रकार, आरती कुलकर्णी यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला.**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणाऱ्या चित्रपट चावडी या उपक्रमात या महिन्यात पत्रकार आरती कुलकर्णी यांनी दिग्दर्शित केलला 'जन्नत-ए-नाइल' हा लघुपट दाखविण्यात आला. यावेळी आरती कुलकर्णी यांनी चावडीच्या प्रेक्षकांशी संवाद साधला.

शोध पत्रकारीता करणाऱ्या आरती कुलकर्णी यांचा जन्नत-ए-नाइल हा लघुपट इजिप्तमधील प्रसिद्ध नाईल नदीवर आधारीत आहे. लघुपटात नाईल नदीचे पर्यावरणीय व सांस्कृतिक महत्व विषद करण्यात आले आहे. त्यासोबत इजिप्तशी असलेले या नदीचे नाते अत्यंत सुंदर पद्धतीने दाखविण्यात आले आहे. लघुपटाचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रिकरण करण्यात आलेले आहे. या लघुपटाला वसुंधरा आंतरराष्ट्रीय पर्यावरण फिल्म फेस्टिवल, महाराष्ट्र पर्यावरण विभागाचा उत्कृष्ट फिल्मसाठी पुरस्कार मिळाला आहे.

जे.एन.ई.सी. महाविद्यालय, एम. जी. एम. च्या आइन्स्टाइन सभागृहामध्ये हा चित्रपट दाखविण्यात आला. यावेळी नीलेश राऊत, अपर्णा कक्कड, रेखा शेळके, विजय कान्हेकर, सुहास तेंडूलकर, सुबोध जाधव, दिपक जाधव, त्रिशूल कुलकर्णी, श्रीकांत देशपांडे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

**चित्रपट चावडी**

**उदाहरणार्थ नेमाडे**

**शनिवार, दि. १७ सप्टेंबर २०१६**

विभागीय केंद्र, औरंगाबाद व एम.जी.एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय औरंगाबाद यांच्या सयुंक्त विद्यमाने आयोजित चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत अक्षय इंडियर दिग्दर्शित ''उदाहरणार्थ नेमाडे'' हा बहुचर्चित चित्रपट दाखविण्यात आला. प्रख्यात लेखक भालचंद्र नेमाडे यांच्यावर आधारित असलेला हा चित्रपट गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात रसिकांच्या पसंतीस उतरला आहे.

या चित्रपटात प्रथमच श्री. भालचंद्र नेमाडे यांच्या जीवनातील विविध पैलू श्री. अक्षय इंडिकर यांनी उलगडून दाखविले आहेत. या चित्रपटाचे प्रदर्शन औरंगाबाद येथे चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत शनिवार, दिनांक १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता एम. जि. उम. कॅम्पसच्या रुख्मिणी सभागृहात संपन्न झाले.

या प्रसंगी दिग्दर्शक अक्षय इंडिकर व त्यांच्या सहकार्यांनी उपस्थित राहून प्रेक्षकांनी संवाद साधला. यावेळी एम. जी. एम. चे अंकुशराव कदम, नीलेश राऊत, विभागीय केंद्राचे डॉ. अपर्णा कक्कड, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, डॉ. रेखा शेळके, सुबोध जाधव, श्रीकांत देशपांडे, मंगेश निरंतर, गणेश घुले, संदिप शिसोदे, महेश अचिंतलवार यांची उपस्थिती होती.

**स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला 'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली'चे आयोजन**

**रविवार, दि. १५ ऑगस्ट २०१६**

नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे युवकांमध्ये राष्ट्रभावना जागृत होण्यासाठी 'युवा स्वातंत्र ज्योत रॅली'चे आयोजन करण्यात येते. स्वातंत्र्य दिनाच्या

पूर्वसंध्येला म्हणजेच रविवार, दि. १४ ऑगस्ट २०१६ रोजी सायं. ७ वा. सदर रॅली आयोजित करण्यात आले होते. रॅलीचा मार्ग हा क्रांतीचौक ते पैठणगेट असा होता. पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या हस्ते मशाल पेटवून रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. रॅलीचे हे सलग नववे वर्ष होते. यामध्ये औरंगाबाद शहरातील महाविद्यालयीन युवक-युवती, स्थानिक संस्था, संघटना, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, प्रशासकीय अधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिक यांचा मोठ्या प्रमाणावर समावेश होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुबोध जाधव, मंगेश निरंतर, गणेश घुले, राहूल तायडे, मयुर देशपांडे, दिपक जाधव, अक्षय गोरे, सुशिल बोर्डे, सारंग बोराडे, मोहित जाधव, अक्षय पाटील आदींनी परिश्रम घेतले.

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबादच्या दशकपूर्ती सोहळ्याचे मा.खा. शरदचंद्रजी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन**

**शनिवार, दि. २७ ऑगस्ट २०१६**

विभागीय केंद्र औरंगाबादच्या स्थापनेला यंदा दहा वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने दशकपूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा.खा. शरदचंद्रजी पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या सोहळ्याच्या निमित्ताने मराठवाड्याच्या विकासात भरीव योगदान देणाऱ्या दहा मान्यवरांचा सत्कार यावेळी मा.खा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते करण्यात आला. हा सोहळा शनिवार, दि. २७ ऑगस्ट २०१६ रोजी सायं. ५ वा. तापडीया नाट्यमंदीर येथे संपन्न झाला. सोहळ्याला मा.आ. राजेश टोपे, मा.आ. भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, मा. अंकुशराव कदम, मा.आ. सतिश चव्हाण, मा.आ. विक्रम काळे, मा. दत्ता बाळसराफ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मा.खा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते मराठवाड्यातील आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या दहा ज्येष्ठ मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यात पद्मश्री फातेमा झकेरीया, ज्येष्ठ जलतज्ञ माधवराव चितळे, ज्येष्ठ रंगकर्मी त्र्यंबक महाजन, प्रा. दिनकर बोरीकर, ज्येष्ठ विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे, ज्येष्ठ समाजसेवक द्वारकादास लोहिया, ज्येष्ठ पत्रकार नागनाथ फटाले, ज्येष्ठ कृषीतज्ञ विजयअण्णा बोराडे, ज्येष्ठ इतिहास व पर्यटनतज्ञ डॉ. दुलारी कुरेशी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी औरंगाबाद विभागीय केंद्राचे दहा वर्षाच्या प्रवासावर आधारीत पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

गेल्या दहा वर्षाच्या प्रवासात विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले गेले. औरंगाबाद विभागीय केंद्र ही मराठवाड्याची 'चावडी' व्हावी हे उद्दीष्ट राबविताना अनेक संस्था, संघटना, विचारवंत, रंगकर्मी, विविध क्षेत्रातील तज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सर्वसामान्य नागरिक, युवक-युवतींना औरंगाबाद विभागीय केंद्राशी जोडून घेण्यात आले. या सर्वांच्या कृतीशील सहभागामुळेच औरंगाबाद विभागीय केंद्राला नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबविता आले. यात प्रामुख्याने व्हिजन करीअर फेअर, जागर हा जाणिवांचा अभियान, चित्रपट चावडी, उस्ताद बिस्मिल्ला खाँ संगीत महोत्सव, युवा स्वातंत्र्यज्योत रॅली, शिक्षणकट्टा, लोकसंवाद, युवती मेळावा, राज्यस्तरीय युवा पुरस्कार, अभिसरण, तंबाखूविरोधी अभियान आदी सांस्कृतिक, सामजिक उपक्रमांचा समावेश आहे.

दशकपूर्ती वर्षाप्रसंगी आयोजित विशेष कार्यक्रमासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित नोंदविली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, कोषाध्यक्ष सचिन मुळे,

सचिव मुकुंद भोगले, नीलेश राऊत, विजय कान्हेकर, सुबोध जाधव, सुहास तेंडुलकर, डॉ. अपर्णा कक्कड, डॉ. रेखा शेळके यांनी मार्गदर्शन केले तर, रेणूका कड, मंगेश निरंतर, गणेश घुले, डॉ. संदीप शिसोदे, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलवार, दिपक जाधव, मयुर देशपांडे, श्रीराम पोतदार, त्रिशूल कुलकर्णी, प्रविण देशमुख, राजेंद्र वाळके आदींनी परिश्रम घेतले.

**भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खान शहनाई संगीत महोत्सवाचे आयोजन**

**दिनांक - २८ व २९ ऑगस्ट २०१६**

विभागीय केंद्र औरंगाबाद दशकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खान शहनाई संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाचे यंदाचे चौथे वर्ष आहे. २०१६ हे वर्ष उस्ताद बिस्मिल्ला खान यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. रविवार, दि. २८ व सोमवार २९ ऑगस्ट रोजी सायं ६ वाजता तापडिया नाट्यमंदिर, निराला बाजार, औरंगाबाद येथे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी रविवार, दि. २८ ऑगस्ट रोजी सायं ६ वाजता कु. सावनी शिरीष गोगटे हिचे गायन आयोजित करण्यात आले होते. यानंतर सोलापूर येथील प्रसिद्ध सुन्द्रीवादक भिमाण्णा जाधव व यशवंत जाधव यांचे सुन्द्रीवादन आयोजित करण्यात आले होते. सुंद्री हा सनईतील उपप्रकार असून त्याचे पहिल्यांदाच औरंगाबादेत सादरीकरण करण्यात आले. यानंतर प्रसिद्ध गायक सचिन नेकपुरकर यांच्या गायनाने महोत्सवाच्या पहिल्या दिवसाचा समारोप झाला.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सोमवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सायं ६ वाजता शहरातील युवा कलावंत बासरीवादक निरंजन भालेराव व तबलावादक संतोष लोमटे यांनी जुगलबंदी सादर केली. त्यांना विनायक सकपाळ यांनी पखवाजावरती साथसंगत केली. त्यानंतर प्रसिद्ध सनईवादक कल्याण अपार व हार्मोनियम वादक संतोष घंटे यांनी जुगलबंदी सादर केली. महोत्सवाचा समारोप प्रसिद्ध सितारवादक पद्मश्री उस्ताद शाहीद परवेज यांचे शिष्य उस्ताद शाकीर खान (पुणे) यांच्या सितारवादनाने झाला. त्यांना तबल्याकर महेश साळुंके व संजय अपार तसेच हार्मोनियमवर गजानन केचे यांनी साथसंगत केली.

या दोन दिवसीय संगीत महोत्सवाला सर्व रसिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीकाल, मुकुंद भोगले, सचिन मुळे, नीलेश राऊत, विजय कान्हेकर, सुबोध जाधक, डॉ. अपर्णा कक्कड, डॉ. रेखा शेळके, श्रीराम पोतदार, सुहास तेंडुलकर, मंगेश निरंतर, रेणुका कड, गणेश घुले, डॉ. संदीप शिसोदे, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलकार, मयूर देशपांडे, त्रिशूल कुलकर्णी, दीपक जाधक, प्रवीण देशमुख आदींनी प्रमुख उपस्थिती होती.

❍ ❍ ❍

# अपंग हक्क विकास मंच - क्षणचित्रे

स्टारकी फाऊंडेशन (अमेरिका) आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या अपंग हक्क विकास मंच तर्फे इंदापूर, पुणे, सोलापूर, सांगली, बारामती या ग्रामीण विभागातील कर्णबधीर विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना डिजिटल श्रवण यंत्राचे विनामूल्य वितरण.
















# अपंग हक्क विकास मंच - क्षणचित्रे
















# दुष्काळ निवारण कार्यक्रम - मराठवाडा (क्षणचित्रे)

बीड, लातूर, उस्मानाबाद, जालना, औरंगाबाद या जिल्ह्यात राबविण्यात आलेले उपक्रम व पावसाळ्यानंतरची काही दृश्ये.


























# विभागीय केंद्र, लातूर

## कार्यवृत्त

- **महाराष्ट्राचा वर्धापन दिन**

रविवार दि. १ मे २०१६ रोजी महाराष्ट्र राज्याचा वर्धापन दिन शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे संचालक तथा शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. उत्तम सुर्यवंशी (नांदेड) होते. कार्यक्रमाचा विषय 'महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतरावांचे योगदान' हा होता. आपल्या महाराष्ट्राची जडणघडण, महाराष्ट्राचा चौफेर विकास करीत असताना यशवंतराव चव्हाण साहेबांचे एकच लक्ष्य होते, ते म्हणजे या राज्याच्या सर्व जातीपंथातील तळागाळातील माणूस सुखी कसा होईल. याच एका ध्येयाने चव्हाणसाहेबांनी महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे कार्य केले. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. विभागीय सचिव हरिभाऊ जवळगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. सोंडगे यांनी आपले विचार मांडले. सर्वांचे आभार अमोल काळे यांनी मानले.

- **दि. २० मे २०१६ प्रतिष्ठानतर्फे रेल्वे अधिकारी व कर्मचारी, चालक यांचा सत्कार**

१२ एप्रिल २०१६ पासून मिरज ते लातूर या ३४२ कि.मी. अंतरावरून ५० वाघिणीने भरलेले पाणी आणून आत्तापर्यंत ७ कोटी लिटरपेक्षा जास्त पाणी आणून या रेल्वेच्या फेऱ्याच्या अर्धशतकाकडे वाटचाल चालू आहे. या लातूरकरांचे तहान भागविण्यासाठी येणाऱ्या जलराणी उर्फ वॉटर एक्सप्रेस या रेल्वेचे चालक श्री. पी.डी तलवादे व त्यांचे सहाय्यक धनराज पगारे तसेच या कामी असलेले त्यांचे सर्व सहकारी त्याचबरोबर लातूर रेल्वे स्टेशनचे प्रमुख श्री. आर. टी. काळे, मुख्य स्टेशन मास्टर एस. जी. घाडगे, गार्ड एल. बी. ताकभाते, यातायात निरीक्षक बी. एके. तिवारी, तिकीट निरीक्षक बापू ढगे, फाजल शेख या रात्रदिवस कष्ट करून लातूरकरांची तहान भागविणाऱ्या अधिकारी व कर्मचारी, चालक या सर्वाचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरतर्फे यशवंत तुमच्या दारी या विभागीय केंद्राच्या नियमावलीप्रमाणे विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने या सर्वाचे अभिनंदन करण्यात येऊन त्यांना त्यांच्या भावी आयुष्याबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी श्री. जवळगे म्हणाले, 'यशवंतराव चव्हाण यांचे चरित्र आपण सर्वजण वेळात वेळ काढून जरूर वाचावे. आम्ही येत्या राजर्षी शाहू महाराज जयंतीपासून विभागीय केंद्रातर्गत ज्या यशवंतप्रेमी शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटना, व्यक्ती आहेत त्यांना आम्ही हे चरित्र मोफत वाटप करणार आहोत.'

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी न्यायाधीश ॲड. विजयकुमार बोडके पाटील हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद कांबळे यांनी केले. सर्वांचे आभार लातूर रेल्वे स्टेशनचे प्रमुख आर. टी. काळे यांनी मानले. याप्रसंगी सध्याचे रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य ॲड. वसंतराव उगिले, भरतकुमार भुतडा, पी. एम. सुर्यवंशी, ओमप्रकाश मुंदडा, सौ. सरिताबाई जगताप, शर्मा बंधू, संजय निलेगावकर इ. मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला रेल्वेत काम करणारे सर्व कर्मचारी व स्टेशनवरील उपस्थित प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **शनिवार दि. २१ मे २०१६**

लातूर येथे गौतम बुद्ध जयंती (बौद्ध पोर्णिमा) साजरी करण्यात आली. यानिमित्त लातूर येथील भव्य अशा गौतम बुद्ध गार्डनमध्ये विभागीय केंद्राच्या वतीने भारतदेशाचे भूषण व जागतिक शांतीचे गुरू गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना प्रसिद्ध विचारवंत प्रा. सुनिल गायकवाड यांनी आजच्या जागतिक दहशतवाद व गौतम बुद्धांचे विचार या विषयावर आपले विचार मांडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे ज्येष्ठ संचालक अ‍ॅड. मनोहरराव गोमारे होते. विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी सर्वांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर शेवटी सर्वांचे आभार यशवंतप्रेमी अरविंद कांबळे यांनी मानले.

- **शनिवार दि. ११ जू २०१६**

महामानव साने गुरूजी यांना त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

- **शुक्रवार दि. १७ जूर २०१६**

राष्ट्रमाता जिजाऊ यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

- **रविवार दि. २६ जून २०१६**

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शाहू महाराज यांच्या पुतळ्याला विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

- **बुधवार दि. २९ जून २०१६**

विभागीय केंद्र लातूरच्या वतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जंयतीनिमित्त लातूर येथील ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये प्रसिद्ध वक्ते प्रा. डॉ. अशोक नारवरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजवादी नेते अ‍ॅड. मनोहरराव गोमारे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून थोर विचारवंत तथा माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे, माधवराव पाटील, प्राचार्य एन. एन. ढगे, शिवाजी माडे यांची उपस्थिती होती.

'राजर्षी शाहू महाराजांचे लोकशाहीवादी दूरगामी दृष्टीत्व' या विषयावर बोलताना प्रा. डॉ. अशोक नारनवरे म्हणाले, महाराजांच्या व्यक्तीमत्वावर तत्वज्ञ फेझर यांचा फार प्रभाव होता. महाराजांनी आपल्या राज्यातील संपूर्ण प्रशासकीय व्यवस्था ही लोकशाहीभिमुख केली आणि त्यास लोककल्याणाची विशेष जोड दिली. त्यांनी केवळ अस्पृश्यता निवारण कायदाच केला नाही तर संस्थानातील महार वतने व बलुतेदारी पद्धत १९१५ साली बंद केली. शाहू महाराजांच्या या समता मार्च चे पुढे डॉ. आंबेडकर यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या संविधानामध्ये कायद्यात रूपांतर केले.

- **शुक्रवार दि. १५ जुलै २०१६**

व्यसनमुक्ती अभियानासाठी विभागीय केंद्राचे अध्यक्ष माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलाविण्यात आली. या बैठकीत व्यसनमुक्ती अभियान विभागीय केंद्रांतर्गत येणाऱ्या चारही जिल्ह्यात राबविण्याबद्दल सविस्तर चर्चा झाली. पुढील बैठकीत दिनांक, वेळ, वार इ. बाबी ठरविण्यात येतील.

- **सोमवार दि. १ ऑगस्ट २०१६**

लातूर येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त केंद्राच्यावतीने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

- **मंगळवार दि. ९ ऑगस्ट २०१६**

भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्या महामानवांनी हौतात्म्य पत्कारले त्यांना अभिवादन करण्यात आले.

- **सोमवार दि. १५ ऑगस्ट २०१६**

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त तिरंग्यास विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

- **बुधवार दि. १७ ऑगस्ट २०१६**

पारशी फरवर्दीन समारंभानिमित्त पारशी बांधवांना विभागीय केंद्राच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

- **बुधवार दि. ३१ ऑगस्ट २०१६**

अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या पुण्यतिथिनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, अहमदनगर

## कार्यवृत्त

अहमदनगर विभागीय केंद्राचे कामकाज केंद्राचे अध्यक्ष श्री. यशवंतराव गडाख पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चालते.

● **कै. यशवंतराव चव्हाण समता मार्ग लोकार्पण सोहळा :–** दि. ०५ जून रोजी कोपरगाव मुख्य रस्त्याचा लोकार्पण सोहळा कै. यशवंतराव चव्हाण समता मार्ग अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव शहराच्या वैभवात भर घालण्यासाठी प्रतिष्ठानचे खजिनदार अंगप्रकाश तथा काका कोयटे यांनी कोपरगाव शहरामध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी अध्यक्ष श्री. यशवंतराव गडाख पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. अध्यक्षीय भाषणात श्री. यशवंतराव गडाख साहेबांनी 'कोपरगावला अच्छे दिन' येण्यास सुरूवात झाल्याचे सूतोवाच केले. या कार्यक्रमास मान. आ. सौ. स्नेहलता कोल्हे, मान. श्री. आशुतोषजी काळे, श्री. राजेश परजने, श्री. प्रशांत गडाख, श्री. रविंद्र पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

● **मान. खासदार सुप्रियाताई सदानंद सुळे यांची केंद्रास भेट :** दि. २२ मार्च २०१६ सन्मानिय खासदार व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्राच्या कार्याध्यक्षा मान. खासदान सुप्रिया सुळे यांनी दुपारी १२ वाजता 'विरंगुळा' या मा. यशवंतराव गडाख पाटील यांच्या निवासस्थानी अहमदनगर विभागीय केंद्रास सदिच्छा भेट दिली. व त्याप्रसंगी अहमदनगर केंद्राच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन भविष्यकालीन कामकाजासंबंधी चर्चा केली.

अहमदनगर विभागीय शाखेचे अध्यक्ष यशवंतराव गडाख पाटील यांनी चव्हाण साहेबांच्या कार्याची व त्यांच्या समवेत घालवलेल्या अनेक आठवणींना उजाळा दिला या घटना ऐकून खा. सुप्रियाताई सुळे हरखून गेल्या. भेटीप्रसंगी श्री. रामनाथजी वाघ, दुर्गाताई तांबे, कुलकर्णी, काका कोयटे, आ. संग्राम जगताप, संजीव तनपुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

**शेती कट्टा अंतर्गत शेतकरी चर्चासत्र व मेळावे –**

**पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय :** या विषयावर दि. १२ मार्च २०१६ रोजी कृषी महाविद्यालय सोनई येथे तज्ञ मार्गदर्शक डॉ. संजय मंडकमाले व श्री. सदाशिव पांडेकर यांच्या उपस्थितित शेतकऱ्यांना पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय वाढीसाठी मार्गदर्शन करण्यात आले या प्रसंगी दुग्ध व्यवसायिक श्री. भाऊराव आढाव व बापूसाहेब बारगळ उपस्थित होते.

**आदर्श गावाकडे वाटचाल :** दि. २१ एप्रिल २०१६ रोजी महात्मा फुले कृषी विद्यालय राहुरी येथे तज्ञ मार्गदर्शक मा. योगेश म्हस्के (सरपंच आदर्शगावा गोगलगाव) मा. डॉ. आनंद सोळंकी मा. डॉ. हरि मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आदर्श गावाकडे वाटचाल' या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात करण्यात आली.

**गांडुळ खत उत्पादन व शेतीसाठी वापर :** दि. ३१ मे २०१६ रोजी कारेगाव ता. श्रीरामपूर येथे तज्ञ मार्गदर्शक मा. कैलास ऊंडे मा. मनिष पंढूरे यांच्या उपस्थितीत गांडुळ खत उत्पादन व त्याचे शेतीसाठीचे होणारे फायदे या विषयावर योग्य ते मार्गदर्शन उपस्थित शेतकरी वर्गात करण्यात आले.

**एकात्मिक अन्न द्रव्य व्यवस्थापन :** दि. ३० जुलै २०१६ रोजी तज्ञ मागदर्शक प्रा. डॉ. अनिल दुर्गुडे यांच्या उपस्थितीत नांदुर्खी ता. राहाता येथे एकात्मिक

अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयावर सखोल चर्चा घडवून आणण्यात आली. प्रसंगी परिसरातील शेतकरी बांधव व कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

**मुरघास उत्पादन तंत्रज्ञान :** दि. ३० ऑगस्ट २०१६ रोजी कृषिभुषण मा. ज्ञानेश्वर (माऊली) पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बक्तरपूर ता. शेवगाव येथे 'मुरघास उत्पादन तंत्रज्ञान' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. त्याप्रसंगी माऊली पवार यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना मुरघास उत्पादन तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले.

**सुत्रकृमी नियंत्रण व डाळींब पिकातील कीड व्यवस्थापन :** दि.२९ सप्टेंबर २०१६ रोजी डॉ. नानासाहेब म्हसे व डॉ.अशोक वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली अे.डी.सी.सी बँक सभागृह संगमनेर येथे शेतकरी कृषी मेळाव्यामधे उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी आमदार डॉ. सुधीर तांबे उपस्थित होते.

**पंचसूत्री ज्वारी उत्पादन तंत्रज्ञान व हरभरा उत्पादन तंत्रज्ञान :** दि.१३ ऑक्टोबर २०१६ रोजी डॉ. शरद गडाख व डॉ. रामभाऊ पेरणे यांच्या उपस्थितीत आदीनाथनगर, पाथर्डी येथे ज्वारी उत्पादनाच्या तंत्रज्ञानाबाबत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**उन्हाळी कांदा उत्पादन व साठवण तंत्रज्ञान :** दि.१५ ऑक्टोबर २०१६ श्री. एस. डी. मगर महात्मा फुले कृषी विदयापीठ, राहुरी यांनी उपस्थित शेतकऱ्यांना देऊळगाव गलांडे ता. श्रीगोंदा येथे झालेल्या शेती कट्टयात उन्हाळी कांदा उत्पादन व साठवण तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले.

- **गाव तेथे वाचनालय :** दि. २७ मे २०१६ रोजी ज्ञानेश्वरीचे उगमस्थान असलेल्या नेवासा येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिर प्रांगणामध्ये रामदासजी फुटाणे, श्री. यशवंतराव गडाख पाटील, मा. आ. पांडुरंग अभंग, मा. शंकरराव गडाख ह.भ.प. शिवाजी महाराज देशमुख, सौ बेबीताई गायकवाड यांच्या उपस्थितीत नेवासे तालुक्यातील ५१ गावांमध्ये मोफत सार्वजनिक वाचनालय सुरू करण्याचा संकल्प करण्यात आला. त्या सर्व वाचनालयास यशवंत प्रतिष्ठान अहमदनगर शाखेच्या वतीने २०० ग्रंथाची भेट देण्यात आली. 'प्रसंगी वाचनामुळे निर्णय क्षमतेत वाढ होते', असे रामदास फुटाणे यांनी सांगितले. तर 'वाहवत चाललेल्या पिढीला वाचन संस्कृतीच वाचवेल' अशी यशवंतराव गडाख पाटील यांनी आपली भावना व्यक्त केली. कार्यक्रमास तालुक्यातील विविध गावातील हजारो वाचक उपस्थित होते.

- **ग्रंथ भेट सोहळा :** दि. २६ सप्टेंबर २०१६ रोजी सोनई परिसरातील प्राथमिक शिक्षकांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान 'गाव तेथे वाचनालय' या उपक्रमास साडेसहाशे पुस्तकांची ग्रंथ भेट प्रतिष्ठानचे सचिव प्रशांत गडाख यांचेकडे सुर्पुत केली. परिसरातील या प्राथमिक शिक्षकांनी वाचनालयाच्या या उपक्रमास दिलेली पुस्तकांची भेट निश्चितच अनुकरणीय असून त्यांच्या या उप्रकमाने वाचनालय चळवळीला निश्चितच बळ मिळेल असे उद्गार सचिव प्रशांत गडाख यांनी काढले.या कार्यक्रमास परिसरातील शिक्षक बंधूभगिनी व अनेक वाचकांची उपस्थिती होती.

- **नेत्रदान जनजागृती अभियान :** दि.२५/०८/२०१६ रोजी परिसरातील सर्व विदयालयामध्ये, समाजामध्ये नेत्रदान चळवळ रूजविण्यासाठी व नेत्रदानाविषयी जनाजागृती वाढविण्यासाठी शालेय विदयार्थ्यांनी प्रभात फेरीचे आयोजन करून नेत्रदान चळवळ वाढविण्याविषयी मार्गदर्शन केले.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, सोलापूर

## कार्यवृत्त

सोलापूर विभागीय केंद्राला मान्यता मिळाल्यानंतर विभागीय केंद्राच्या कार्यकारणी समितीच्या दोन बैठका झाल्या आहेत. बैठकीत झालेल्या निर्णयानुसार रविवार दि. ९/१०/२०१६ रोजी शुभारंभ करण्यात आला असून आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत 'यशवंतराव चव्हाण यांचे योगदान' या विषयावर सामाजिक व राजकीय विषयाचे जाणकार मा. उल्हास पवार यांच्या व्याख्यानाने करण्यात आला. सदरचा कार्यक्रम हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभाग्रहात संपन्न झाला. उल्हास पवार हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी देखील होते.

नोव्हेंबर महिन्यामध्ये दमाणी ब्लड बँक व विभागीय केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवेढा येथे सुमारे १२०० युवतींच्या व महिलांच्या हिमोग्लोबिन तपासणीचे शिबीर घेण्यात येणार आहे. त्यानुसार संबधित युवती व महिलांसाठी तज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने शिबिराचे आयोजन करण्यात येईल.

पाण्याच्या बाबतीत जागरूकता निर्माण करण्यासाठी दोन पाणी परिषदांचे आयोजन करण्यात येणार आहे. उजनी धरणाची निर्मिती ही स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी केलेली आहे. हे धरण सोलापूर जिल्ह्याची वरदायीनी आहे. उजनी धरणाचे पाणी सिंचनासाठी, पिण्यासाठी, उद्योग-धंद्यासाठी कमीतकमी प्रमाणात कसे वापरता येईल व पाण्याचे संकट टाळण्यासाठी त्यावरील उपाययोजना व त्यातील जलप्रदूषण या विषयांसह भीमा व नीरा नदीचे अतिरीक्त पाणी अडवण्यासाठी करावयाच्या तांत्रिक व कायदेशीर उपाययोजना हे विषय घेण्यात येणार आहे.

त्याचबरोबर जिथे उजनीचे पाणी नाही अशा भागात पावसाचे पाणी नैसर्गिक स्त्रोत कसे अडवता येईल, तसेच सीना, माण, भोगावती या नद्यांना स्त्रोत उपलब्ध करून देणे, असे विषय या परिषदेमध्ये घेण्यात येणार आहेत. यासाठी शासनाच्या जलसंपदा विभागाचे निवृत्त प्रधान सचिव मा. सोडल साहेब व जिल्ह्यातील पाण्याच्या विषयाचे अभ्यासक मा. रजनीश जोशी तसेच इतर जाणकारांच्या सहकार्याने ही पाणी परिषद आयोजित केली आहे.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, अंबाजोगाई

## कार्यवृत्त

### शेतकरी संवाद अभियान

अंबाजोगाई व राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने आयोजित शेतकरी संवाद अभियानांतर्गत ज्येष्ठ पत्रकार व कीर्तनकार श्री. शामसुंदर सोन्नर यांनी किर्तनाच्या माध्यमातून कानडी माळी ता. केज येथील चारा छावणीवर शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्याचे मनोबल वाढवण्यासाठी व त्यांना धीर देण्यासाठी सोन्नर महाराजांनी संत तुकाराम महाराजांच्या रचनांचा आधार घेतला. जलसंधारण, परस्पर संवाद, व आर्थिक नियोजनाचे महत्त्वही शेतकऱ्यांना सांगितले. मानसिक ताण तणावाशी संबंधित विविध बाबीसंबंधी जनजागृती केली. त्यावेळी प्रचंड मोठ्या प्रमाणात शेतकरी, महिला व पुरुष यांची मोठी उपस्थिती होती.

या चारा छावणीवर स्व. सतीश कोटेचा प्रतिष्ठान मार्फत मा. अनंत कोटेचा चालवतात. स्वच्छ व उत्कृष्ट चारा छावणी आहे. सुमारे तीन हजार जनावरे तिथे आश्रयाला आहेत. त्याबद्दल छावणी चालक श्री. कोटेचा यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच!

या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नेते मा. नंदकिशोर मुंदडा, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र अंबाजोगाई चे सचिव डॉ. नरेंद्र काळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष रविकांत वरपे, महादेव सुर्यवंशी, ज्ञानेश्वर चौरे, सुदाम पाटील, शिवाजी पाटील, प्रा. प्रशांत जगताप, रणजीत मोरे यांच्यासह सुमारे दोन हजार शेतकरी उपस्थित होते.

### वेदना जाणावया जागवू संवेदना...

### नवी दिशा श्रमसंस्कार शिबिर

मराठवाड्याच्या पाणीटंचाईच्या भागात अनेक जलसंधारणासाठीचे कार्यक्रम सुरू झाले आहेत. त्यात ओढा खोलीकरण, रुंदीकरण, सीसीटी, व्हॅट, गाळ उपसणे व नदी पुर्नरुज्जीवन सारखे उपक्रम सुरू झाले आहेत. या सगळ्या प्रकल्पांवर मृद्‌संधारणाच्यादृष्टीने अत्यंत आवश्यक आहे ते वृक्षारोपण. 'नाम फाउंडेशन' वृक्षलागवडीचे काम करतात. व त्यासाठी लागणारे खड्डे खोदण्यासाठी बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून नवी दिशा श्रमसंस्कार शिबिर सकाळी ६:३० ते १०:३० या वेळेत ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्यभरातून २०० युवक युवतींचा उत्स्फूर्त सहभाग होता. हा कार्यक्रम गाव आर्वी, ता. शिरूर कासार, जिल्हा बीड येथे यशस्वी पार पडला. कार्यक्रमास 'शांतीवन' चे दिपक नागरगोजे, अविनाश लावजी, शिवार गीत, उदय निरगुडकर, अण्णा झेंडे, मकरंद अनासपुरे, मंदार परांजपे, सुनंदा पवार, हेरंब कुलकर्णी, आणि प्रतिष्ठानचे दत्ता बाळसराफ यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, ग्रामीण भारत, भ्रष्टाचार, आणि राष्ट्रीय एकात्मता यावर गटचर्चेमधून मार्गदर्शन केले.

### 'तंबाखू चे दुष्परिणाम व मुख कर्करोगविषयी जनजागृती'

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र-अंबाजोगाई, राष्ट्रवादी डॉक्टर सेल व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी च्या वतीने ३१मे या जागतिक तंबाखू विरोधी दिनाच्या निमित्ताने 'तंबाखूचे दुष्परिणाम व मुख कर्करोग विषयी जनजागृती' करण्यासाठी बसस्थानक अंबाजोगाई येथे झालेल्या प्रदर्शनाने एक वेगळाच संदेश

एकाच वेळी लोकांपर्यंत पोहोचला आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ पत्रकार प्रा. नानासाहेब गाठाळ यांच्या हस्ते झाले.

ज्येष्ठ नागरिक दिन व गांधी जयंतीच्या निमित्ताने मानवलोक व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र – अंबाजोगाई च्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा आयोजित करण्यात आला. गरजू जेष्ठ नागरिकांना चालण्यासाठी आधार म्हणून उपयुक्त 'काठी' देण्यात आली. त्यावेळी अस्थिरोग तज्ञ डॉ. प्रदीप शेंडगे यांनी उतारवयातील गुडघेदुखी व इतर हाडांच्या आजारासंबंधी मार्गदर्शन केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र अंबाजोगाई चे सचिव तथा दंतरोग तज्ञ डॉ. नरेंद्र काळे यांनी वृद्धांच्या दंत व मुखरोगाविषयी मार्गदर्शन केले.

विभागीय केंद्र अंबाजोगाई चे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या विषयी माहिती दिली. यावेळी मानवलोक चे कार्यवाह श्री. अनिकेत लोहिया, ज्येष्ठ नागरिक संघाचे डॉ. डी. एच.थोरात, रोटरी क्लब(सिनियर सिटीझन) चे अध्यक्ष श्री. पुंडलिक पवार, माजी मुख्याध्यापक मा. कदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक श्री. श्याम सरवदे यांनी केले.

❍ ❍ ❍

# विभागीय केंद्र, ठाणे

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या ठाणे केंद्रात श्री. मुरलीधर नाले यांच्या अध्यक्षतेखाली ११ व्यक्तींची कार्यकारीणी कार्यरत आहेत. त्यात चार्टड अकौटंट, सर्जन, वकील, इंजिनिअर, कोमसापचे अध्यक्ष, साहित्य अकादमीचे अधिकारी, महाराष्ट्र शासनाच्या विक्रीकर विभागाचे उपायुक्त, महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्राध्यापक, एम.टी.एन.एल. चे निवृत्त व्यवस्थापक, नाटककार यांचा अंर्तभाव आहे. लवकरच दोन स्त्री सदस्यांच्या अंर्तभावासाठी प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. ठाणे केंद्राचा उद्‌घाटनाचा दिमाखदार सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४ जून २०१६ रोजी मंगला हायस्कूल, ठाणे (पूर्व)च्या सभागृहात पार पडला. त्यावेळी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रातील काही भागाचे अभिवाचन प्रा. नितीन आरेकर यांनी केले. माजी खासदार डॉ. संजय नाईक यांनी चव्हाण साहेबांच्या काही आठवणी सांगताना साहेबांच्या गुणांचा गौरव केला. त्याप्रसंगी कवितांची मैफील देखील आयोजित करण्यात आली होती. स्थानिक कवींच्या जोडीला ज्येष्ठ कवयित्री अनुपमा उजगरे व डॉ. महेश केळुस्करांनी आपल्या कविता पेश करून समारंभाची रंगत द्विगुणित केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. शरद काळे यांनी चव्हाण साहेबांच्या मानवतावादी स्वभावाची ओळख करून दिली.

जुलै २०१६ रोजी ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे यांनी सुप्रसिद्ध नाटककार, लेखक, दिग्दर्शक श्री. अशोक समेळ यांची मुलाखत घेतली. हा कार्यक्रम सहयोग मंदिर सभागृह, ठाणे (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आला होता. प्रा. श्री. अशोक बागवे यांनी त्यांच्या खुसखुशीत भाषेत श्री. अशोक समेळ यांच्या नाटक, कादंबरी लेखनावर मुलाखत घेतली. ती खूपच छान रंगली. त्यानंतर अशोक समेळ यांनी नटसम्राटमधील शेवटचा उच्चांकाचा प्रवेश सादर केला व सर्व सभागृह नटसम्राटमय करून टाकले. यासोबतच सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अखिल महिला परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती सुषमा शेंडे यांची प्रकट मुलाखत प्रा. नितीन आरेकरांनी घेतली व त्यांच्या महिलां विषयक कार्याची ओळख मुलाखतीद्वारा पटवून दिली.

स्वांतत्रदिनाच्या पूर्वसंध्येला ठाणे मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांसाठी परंपरांचे संचित घेऊन आधुनिकतेकडे वहावत जाणा या यशवंतराव चव्हाणांच्या जीवनदृष्टीचा वसा आणि वारसा पुढे चालविण्याच्या दृष्टीने त्यांना योग्य ते मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त श्री. मनिष जोशी यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला. त्याप्रसंगी उल्हासनगर येथील चांदीबाई महाविद्यालयाचे मराठी भाषा विभागाचे प्रमुख प्रा. नितीन आरेकरांनी कैद्यांना यशवंतराव चव्हाणसाहेबांची घरची गरिबीची परिस्थिती असून देखील परिस्थितीशी झुंज देऊन त्यांनी आपले शिक्षण कसे पूर्ण केले व राजकारणात शिरून ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपद सांभाळले. केंद्रात विविध खात्यांचे मंत्री ते उपपंतप्रधान अशी पदे कशी भूषविलीत यावर प्रकाश टाकला. परिस्थिती बिकट होती. म्हणून त्यांनी चुकीचा मार्ग स्वीकारला नाही. म्हणून त्यांनी कैद्यांना आवाहन केले, की तुम्ही बाहेर पडल्यावर स्वावलंबी व्हा. चव्हाण साहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा. अध्यक्षस्थानी असलेल्या उपायुक्तांनी कैद्यांना आश्वासन दिले की त्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहता यावं

म्हणून विविध कंपन्यांच्या योजनेखाली छोटे छोटे तांत्रिक अभ्यासक्रम पुरे करावेत. त्यासाठी त्यांच्याशी कारागृहातून बाहेर पडल्यावर संपर्क साधावा व पुढील कालावधीत स्वाभिमानाचे आयुष्य जगावे. शेवटी केंद्र अध्यक्षांच्या हस्ते कार्यक्रमाचे अध्यक्ष कारागृहाचे अधीक्षक यांना 'कृष्णाकाठ'च्या प्रती भेट देण्यात आल्यात.

दिनांक ३० सप्टेंबर २०१६ रोजी ज्येष्ठ नागरिक दिनाच्या पूर्वसंध्येला ठाण्यातील सहयोग मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरच्या सभागृहात सुप्रसिद्ध गायिका डॉ. मृदुला दाढे-जोशी व श्री. निलेश निरगुडकर यांच्या संगीताचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात श्रीनिवास खळे श्रीधर फडके, यशवंत देव यासारख्या जुन्या संगीतकारांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्यांचा आस्वाद रसिकांना मनमुराद लुटण्याची सुवर्णसंधी लाभली. यावेळी ठाणे शहरातील ६ ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. त्यात ज्येष्ठ उद्योजक श्री. मदन देशपांडे, घरोघरी जाऊन रुग्णांची सेवा करत असताना रोटरीच्या पोलियो मोहिमेचे नेतृत्व केलेले डॉ. अरविंद भडकमकर, शैक्षणिक क्षेत्रात झोकून दिलेल्या आणि राबोडी तसेच घोडबंदर येथील प्रतिथयश सरस्वती विद्यालयाच्या सर्वेसर्वा सौ. मीरा कोर्डे, ई.एन.टी. मध्ये सर्जन असलेले जे. जे. रुग्णालयाचे माजी प्रमुख ज्यांनी अनेक निपुण डॉक्टर घडवलेत असे डॉ. भागवत चौधरी, कै. सुधीर फडके यांचे शिष्य ज्यांनी ४१६१ गीतरामायणाचे कार्यक्रम करून समाजाला रिझवले आहे असे श्री. चंद्रकांत चव्हाण, ज्यांनी 'श्वास' या चित्रपटाची कथा लिहून मराठी चित्रपटाला ऑस्कर पर्यंत नेऊन पोहोचविले आणि ज्यांच्या साहित्याने उभ्या महाराष्ट्राला वाचनाची गोडी लावली अशा सौ. माधवी घारपुरे या सर्वांना यावेळी शाल, श्रीफळ, मानपत्र तसेच स्मृतीचिन्ह कार्यक्रमाचे अध्यक्ष माजीनगर विकास सचिव श्री. जी. बी. पिंगुळकर यांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या हस्ते वरील सहा ज्येष्ठ नागरिकांना सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास माध्यम प्रायोजक म्हणून 'महाराष्ट्र टाईम्स' तर सह प्रायोजक म्हणून रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ होते. यावेळी सह संयोजक तसेच माध्यम प्रायोजक व कलाकारांचा ठाणे केंद्र अध्यक्षांनी सत्कार केला.

❍ ❍ ❍

# शेतकरी संवाद (शेतकरी समुपदेशन) व दुष्काळनिवारण कार्यक्रम

## (मार्च, एप्रिल, मे व जून २०१६)

**मार्गदर्शक –** मा. शरद पवार, मा.डॉ. द्वारकादास लोहिया, मा. शरद काळे, मा. नंदकिशोर मुंदडा व डॉ. सुरेश खुरसाळे

**सहाय्य व सल्ला** - मा. सुप्रिया सुळे, मा. हेमंत टकले, मा. अनिकेत लोहिया, डॉ. मिलिंद पोतदार, मा. अक्षय मुंदडा, डॉ. दीपा क्षीरसागर

**समन्वयक –** दत्ता बाळसराफ, डॉ.नरेंद्र काळे, निलेश राऊत, डॉ. राजेश चव्हाण, विजय कान्हेकर, अतुल कुलकर्णी, सौ. आशाताई भिसे, अरुंधती पाटील

**अर्थ सहयोग –**आशिष दामले, राकेश कामठे, उदय जाधव, नंदकिशोर कागलीवाल, सुहास तेंडूलकर, मंगेश निरंतर

**सहभागी संस्था –** राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, मानवलोक अंबाजोगाई, आम्ही अंबाजोगाईकर

**कार्यक्षेत्र –** बीड, लातूर, उस्मानाबाद, परभणी आणि औरंगाबाद जिल्हे

**विशेष आभार –** शामसुंदर सोन्नर, मनोज हाडवळे, प्रभाकर साळेगावकर

**सहभागी कार्यकर्ते –** रविकांत वरपे, विजय कसबे, रमेश मोरे, डॉ. संतोष बुरले, डॉ बागडे, डॉ.गायकवाड, डॉ. गोलेकर, डॉ. अनिरुद्ध कुलकर्णी, डॉ. महेंद्र जाधव, प्रदीप कात्रे, गोविंद टेकाळे, रणजीत मोरे, मुजीब काझी, आशिष जाधव, अभिजित देशमुख, शेख सलिम, सोनाली डाळवाले, प्रज्ञा सागडे, रणजित नाळे

१. अंबाजोगाई येथे दुष्काळ निवारण कार्यकर्ता शिबिराचे आयोजन. (सहभाग व २०० कार्यकर्ते)
२. शेतकरी संवाद :- मानसोपचार तज्ञ व डॉक्टरांच्या मदतीने शेतक-यांचे मानसिक समुपदेशन. (८ प्रशिक्षणे व सहभाग) प्रसिद्ध पत्रकार व कवी श्री. शामसुंदर सोन्नर यांच्या कीर्तनाच्या माध्यमातून शेतक-यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रयत्न. (२५ गावांत सहभाग)
३. स्वामी विवेकानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील दुष्काळग्रस्त रुग्णांसाठी दोन वेळचे पौष्टिक जेवण (दररोज सरासरी ५०० लोक - ३ महिने)
४. अंबाजोगाई येथील निजामकालीन बारव व विहिरीतील गाळन काढून पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देणाऱ्या 'आम्ही अंबाजोगाईकर' संस्थेस १,००,०००,रु. ची मदत. (१५ विहीरी व बारव)
५. अंबाजोगाई शहराची पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या काळवीट साठवण तलाव, अंबाजोगाईतील गाळ काढण्यासाठी ५०,०००रु. ची मदत.
६. वसुंधरा प्रतिष्ठान व मानवलोक या वतीने आयोजित सर्वधर्मीय सामुहिक विवाहातील ३७ नवदाम्पत्यांस प्रत्येकी ५००० रु. किमतीची भेट एकूण १,५०,००० रु. ची मदत.
७. बीड जिल्ह्यातील २५ शेतकऱ्यांना 'चैत्रपालवी' या तीन दिवसीय शिबिरासाठी बारामती येथे पाठविण्यात आले. कृषी विज्ञान केंद्र बारामतीच्या या कार्यक्रमात विविध तज्ञांचे मार्गदर्शन मिळाले.
८. अंबाजोगाई पर्यटन आराखडा.
९. पाण्यावरील कवितांचे 'पाणीबाणी' या काव्यसंग्रहाद्वारे प्रकाशन.
१०.मराठवाड्यातील दुष्काळाचे अभ्यासपूर्ण परीक्षण करून दस्ताऐवज तयार करण्यात येत आहे.
११.यशस्विनी सामाजिक अभियानाचा 'उमेद' कार्यक्रमाला सहकार्य. (सविस्तर अहवाल पुढे दिला आहे.)

# उमेद

**आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिला सहायता उपक्रम – मराठवाडा विभाग**

**संकल्पना : सुप्रिया सुळे**

**संयोजन : यशस्विनी सामाजिक अभियान व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**

**उपक्रमाचे स्वरूप :**

**उपक्रम समनव्यक – नीलेश राऊत, आशा भिसे, विजय कान्हेकर व सहकारी**

उमेद उपक्रमात मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील दोनशे विधवा महिलांची निवड करण्यात आलेली आहे. या सर्व महिला चाळीशीच्या आतमधील असून यांना पुढील एक वर्ष आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यात येणार आहे. या महिलांना लघुव्यवसायाकरिता मदत करून प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रत्यक्ष मदत या त्रिसूत्रीच्या माध्यमातून स्वावलंबी करण्यात येणार आहे. तसेच यासर्व महिलांच्या पुढील वैद्यकीय उपचाराकरिता सदर महिलांचे हेल्थकार्ड देखील तयार आले असून त्यांना औरंगाबाद येथील एम.जि.एम. रुग्णालयात पुढील तीन वर्ष कोणतेही उपचार, शस्त्रक्रिया मोफत करता येणार आहे.तसेच त्यांच्या १८ वर्षांखालील पाल्यांच्या शिक्षणाची देखील जबाबदारी घेण्यात आलेली आहे.

- **जालना वितरण कार्यक्रम : दि.२४ जुलै २०१६**

जालना जिल्ह्यातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आली असून याअंतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम संपन्न झाला. श्री.राजेश टोपे यांच्या हस्ते महिलांना पिठाची गिरणी, शिलाई मशीन, शेळ्या आदी व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर उपक्रमाचा हा पहिला टप्पा आहे. माजी आ. चंद्रकांत दानवे, राजेश राऊत हे यावेळी उपस्थित होते.

- **बीड वितरण कार्यक्रम : दि.३१ जुलै २०१६**

बीड जिल्ह्यातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली आहे. सकाळी ११ वा. रेणुका माता मंदिर, पाटोदा येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी माजी आ. उषाताई दराडे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जयदत्त धस, जि. प. सभापती महेंद्र गर्जे, मेहबूब शेख तात्यासाहेब घुले, भाऊसाहेब भवर, बळीराम पोटे, रोहिदास गाडेकर, नाय्युम पठाण, राजू जाधव, शरद बामदळे, वसीम शेख, बालाजी जाधव, सोमनाथ कोरले, सुभाष अडगाळे, जब्बार पठाण, बंडू तवार, आबा ढेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात अठरा विधवा महिलांना शेळ्या, सात महिलांना पिठाची गिरणीचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलेया सर्व महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देखील देण्यात येणार आहे.

- **उस्मानाबाद वितरण कार्यक्रम : दि.१ ऑगस्ट २०१६**

उस्मानाबाद जिल्ह्यातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम राष्ट्रवादी भवन, उस्मानाबाद येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. राणा जगजितसिंग पाटील यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात बारा विधवा महिलांना शेळ्या, पाच महिलांना पिठाची गिरणी आणि तीन महिलांना पिको – फॉल मशीनचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मा. जीवनराव गोरे, वैशालीताई मोटे, डॉ नरेंद्र काळे, मनीषा राखुंडे, सुरेश देशमुख, प्रवीण यादव, मसूद शेख, रामचंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती

● **लातूर वितरण कार्यक्रम : दि.२ ऑगस्ट २०१६**

लातूर जिल्ह्यातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम दयानंद सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे व मा.जीवनराव गोरे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी डॉ. जनार्दन वाघमारे यांना विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल उपस्थितांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात तीन विधवा महिलांना शेळ्या, पंधरा महिलांना पिठाची गिरणी आणि सहा महिलांना पिको - फॉल मशीनचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य संयोजक मकरंद सावे, संजय बनसोडे, अशोक गोविंदपूरकर, बबन भोसले, प्रशांत पाटील, डी. एन. शेळके, मुर्तुझा खान, भाग्यश्री क्षीरसागर, चंदन पाटील, श्रीकांत सूर्यवंशी, निशांत वाघमारे, अरविंद कांबळे, विनोद रनसुभे, संजय सोमवंशी, डॉ. मोटे, डॉ. चव्हाण, रेखा कदम, रघुनाथ कुचेकर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

● **नांदेड वितरण कार्यक्रम : दि.३ ऑगस्ट २०१६**

नांदेड जिल्ह्यातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम कदम हॉस्पिटल, नांदेड येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी बापूसाहेब गोरठेकर आणि माजी आ. शंकरअण्णा धोंडगे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात तीन विधवा महिलांना शेळ्या, तेरा महिलांना पिठाची गिरणी आणि तीन महिलांना शिलाई मशीनचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी खा. गंगाधररावजी कुंटूरकर, डॉ. सुनील कदम, दत्ता पवार, जीवन घोगरे पाटील, प्रांजली रावणगावकर, कृष्णाती मांगनाळे, कल्पनाताई डोंगळीकर, मनपा गटनेत्या डॉ. शीला कदम, सुरेखा कदम, सविता कंठेवाड, चित्राताई लुंगारे, निर्मला सोनकांबळे,जयसिंग हंबर्डे,दत्ता पाटील तळणीकर,विनायक गव्हाणे,किशोर सूर्यवंशी,मनोरमा शेट्टे, छाया धर्माधिकारी, लता मद्रेवार, वंदना सुरनर, ज्योती धोंडगे, प्रतीक्षा आघव, सय्यद बलीगोद्दिन साकिब, वसंत सुगावे, सारिका बच्चेवार, गणेश तादलापुरकर, सुरेंद्रकुमार जयस्वाल, उत्तमराव आलेगावकर, रितू कोलंबीकर, जर्नेलसिंग गाडीवाले, दिलीप गवळी, मोहम्मदि शेख उस्मान, सय्यद मौला, प्रकाश मोराळकर, परवीन शेख यांची प्रमुख उपस्थिती होती

● **हिंगोली वितरण कार्यक्रम : दि.४ ऑगस्ट २०१६**

हिंगोली जिल्ह्यातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत 'उमेद' हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम राष्ट्रवादी भवन, हिंगोली येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी जयप्रकाश दांडेगावकर आणि आ. रामराव वडकुते यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष मुनीर पटेल हे होते. यावेळी रेखा हिवाळे, आशाबाई शिंदे, सखुबाई इंगळे, कुश्वर्ता नळगे, कलावती सवंडकर, नंदाबाई धबडगे, नंदाबाई कदम या महिलांना प्रत्येकी दोन शेळ्या देण्यात आल्या. कावेरी जाधव, शांताबाई लिंबूळे, मालता कदम, सत्यभामा गायकवाड, रेखा गलांडे, छाया जगताप, इंदुबाई चव्हाण, अंजनाबाई सारंग, चंद्रकला जाधव, रेखा सावळे या महिलांना पिठाची गिरणी, शिवचरणा घोडके, शिवकन्या साखरे, यांना पिको-फॉल मशीन तर मथुराबाई जहीरब, नंदाबाई खरात, बायसाबाई तुरुकमाने यांना शिलाई

मशीनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत हिंगोली जिल्ह्यातील या सर्व महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देखील देण्यात येणार आहे.

यावेळी बाबुराव वानखेडे, अनिल पतंगे, शिवाजी गावंडे, देविदास कऱ्हाळे, डॉ. धोंडीराम पारडीकर, विजयराव गावंडे. प्रा. गुलाब भोयर, ठाकूरसिंग बावरी, शिवाजी शिंदे, विनायक गव्हाणे, संचित गुंडेवार, राज थळपते, विलास सावंत, संजय म्हस्के, विजय आडे, विजय डोंगरे, सुजय देशमुख, सर्जेराव पाटील, पठाण इरफान, संजय दराडे रत्नमाला शिंदे, निलावती चव्हाण, सीमा सावंत, प्रतिभा टाले पाटील, सीमा राठोड, रत्नमाला चव्हाण, इंदिराबाई साखरे, कुसुमताई अवचार, शेख लतीफ शेख गयूम, अंबादासराव भोसले, राजेंद्र महागावकर, स्वप्नील गुंडेवार, संतोष गुट्टे, तात्या कदम, अमोल देशमुख, माधव कोरडे, बबलू मंगळूरकर, डी.एन. अड्कीने यांची प्रमुख उपस्थिती होती.

- **परभणी वितरण कार्यक्रम : दि. ६ ऑगस्ट २०१६**

परभणी जिल्ह्यातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत ‘उमेद’ हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम राष्ट्रवादी भवन, परभणी येथे आज आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. विजय भांबळे आणि आ. मधुसूदन केंद्रे यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. रामराव वडकुते हे होते. या उपक्रमांतर्गत परभणी जिल्ह्यातील आठ महिलांना पिठाची गिरणी, सात महिलांना शेळ्या, दोन महिलांना शेवई मशीन आणि एका महिलेला शिलाई मशीनचे वाटप करण्यात आलेयाप्रसंगी शहराध्यक्ष स्वराज परिहार, मनीषा केंद्रे, वनिता चव्हाण, सोनाली देशमुख, भावना नखाते, नंदा राठोड, विद्या पाटील, शशिकला चव्हाण, गंगाधर जवंजाळ, सिद्धांत हाके, सुरेंद्र रोडगे, विष्णू नवले, किरण सोनटक्के, संजय कदम, इम्रान हुसैनी, सुमंत वाघ, श्रीकांत देशमुख, रितेश काळे, पुंजारे गुरुजी, ओंकार वडकुते, शाम गरुड, मीरा वाघ, सलमा शेख, शामला मुळावेकर, उज्वला पाटील, ज्ञानेश्वर खटिंग, नागेश लोंढे, ईश्वर बोईसोना यांची प्रमुख उपस्थिती होती.

- **औरंगाबाद वितरण कार्यक्रम : दि.७ ऑगस्ट २०१६**

औरंगाबाद जिल्ह्यातील २५ विधवा महिलांची निवड या उपक्रमात करण्यात आलेली असून या उपक्रमांतर्गत ‘उमेद’ हा व्यवसाय साधने वितरण कार्यक्रम राष्ट्रवादी भवन, औरंगाबाद येथे आज आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. भाऊसाहेब पाटील चिकटगावकर आणि आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते व्यवसाय साधनांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कदीर मौलाना हे होते. या उपक्रमांतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील आठ महिलांना पिठाची गिरणी, आठ महिलांना शेळ्या, दोन महिलांना पिको फॉल आणि दोन महिलेला शिलाई मशीनचे आज वाटप करण्यात आले, त्यासोबतच एका महिलेला इस्त्रीचे दुकान टाकून देण्यात येणार आहे.

याप्रसंगी काशिनाथ कोकाटे, प्रदीप साळुंके, रंजना राजपूत, सुनिता साखरे, सुनिता मारग, हिरा वायकोस, सुरजितसिंग खुंगर, ख्वाजा शरीफोद्दिन, माणिकराव शिंदे, राजेश पवार, नितीन देशमुख, महेश उबाळे, सुनिता चव्हाण, मेहराज पटेल, अंकिता विधाते, प्रतिभा वैद्य, सीमा थोरात, शैलेश चौधरी, अभिषेक देशमुख, राहुल तायडे, डॉ. ज्ञानेश्वर नीळ, विनोद बनकर, विलास चव्हाण, इसाक पटेल, सोपानराव खोसे, सुशील बोर्डे, अक्षय गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश घुले यांनी केले.

❍ ❍ ❍

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे – भाग १ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस – विधिमंडळ – भाग २ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट – वाय. बी. चव्हाण – खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन – ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्री वारे – यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन – प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास – संपादक – वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन – संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन – शरदराव पवार – भाषणसंग्रह – संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा – संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक – लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल – डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण – चरित्र – लेखक – अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य – संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान – डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र – खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा – (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | ‘ई’बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक–वेधक – डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले – श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | ‘संवादिनी’ – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |

| | | |
|---|---|---|
| २९. | ‘शाळांचे प्रगतिपुस्तक’ डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| ३०. | Yashwantrao Chavhan : an Autobiography | ३९५.०० |
| ३१. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र – कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३२. | यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३३. | शिक्षणवृत्ती – डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३४. | शिक्षणकट्टा – बसंती रॉय | २००.०० |
| ३५. | वाटचाल ई–शिक्षणाची – बसंती रॉय | २००.०० |
| ३६. | हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |
| ३७. | विचारसूत्रे – संपादन : पद्मभूषण देशपांडे | २००.०० |
| ३८. | पाणीबाणी – प्रभाकर साळेगावकर | १६०.०० |
| ३९. | पर्व–प्रगतिचे, परिवर्तनाचे, पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, ऊर्दू भाषेतही उपलब्ध)खाजगी वितरणासाठी | |

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स
- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक – श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर
- ‘बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै’ माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- ‘जागर हा जाणिवांचा....’ लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- ‘कृष्णाकांठ’ : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ – http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य – http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य – http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश – http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य – http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मिळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन – http://vkrajwade.com

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
विभागीय केंद्र, औरंगाबाद

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
औरंगाबाद केंद्र
दशकपूर्ती वर्ष

# स्फूर्तिदायी

## मराठवाड्यातील आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या
## १० ज्येष्ठ सेवाव्रतींचा सत्कार सोहळा
### औरंगाबाद विभागीय केंद्र दशकपूर्ती समारंभ

शुभहस्ते : **मा. खा. शरदचंद्रजी पवार** अध्यक्ष- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**सत्कारमूर्ती :** पद्मश्री फातेमा झकेरीया (शिक्षण) ▪ माधवराव चितळे (पाणी) ▪ त्र्यंबक महाजन (नाट्य) ▪ डॉ. गंगाधर पानतावणे (साहित्य) ▪ विजयअण्णा बोराडे (जलसंधारण) ▪ डॉ. आर. बी. भागवत (वैद्यकिय सेवा) ▪ द्वारकादास लोहीया (समाजकार्य) ▪ प्रा. दिनकर बोरीकर (साहित्य व शिक्षण) ▪ नागनाथ फटाले (पत्रकारिता) ▪ डॉ. दुलारी कुरेशी (इतिहास व पर्यटन)












यशवंतराव
चव्हाण प्रतिष्ठान,
मुंबई

मिळून साऱ्या जणी
घालू गगनाला गवसणी
**यशस्विनी**
**सामाजिक अभियान**

# एक छोटासा प्रयत्न...
# नव्या उमेदीने वाटचालीसाठी...
# जीवनातील अंध:कार भेदण्यासाठी !

# उमेद

**आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिला पुनर्वसन उपक्रम**

**व्यवसाय साधने वितरण**

मार्च ते ऑगस्ट २०१६ या कालावधीत राबविलेल्या या उपक्रमाची क्षणचित्रे







**२०० महिला लाभार्थी**



















